CMYK

विनम्र अभिवादन



राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची आज जयंती

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, २६ जून २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २२८ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com





**‘कमाल की राईड थी’**

ड्रॅगन अंतराळयान २०० किमी उंचीवर पृथ्वीभोवती कक्षेत स्थापित झाल्यानंतर शुक्ला यांनी ‘कमाल की राईड थी’ अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. हे अंतराळयान गुरुवारी दुपारी ४.३० वाजता आंतरराष्ट्रीय अंतराळ केंद्रावर पोहोचेल, अशी अपेक्षा आहे. यासाठी त्याला २८ तासांचा प्रवास करावा लागणार आहे.

# शुभांशुने रचला इतिहास

| अंतराळवीरांची माहिती | कमांडर | वैमानिक | मोहीम तज्ज्ञ |
|---|---|---|---|
| | **पेगी व्हिटसन** (अमेरिका, नासाचे माजी अंतराळवीर) | **शुभांशु शुक्ला** (भारतीय वायुदलातील वैमानिक, इस्रो) | **स्लाव्होस विस्निव्हस्की** (पोलंड), **टिबोर कापू** (हंगेरी) |

**नवी दिल्ली, २५ जून**

अंतराळवीर राकेश शर्मा यांनी रशियन अंतराळयानातून प्रवास केल्यानंतर ४१ वर्षांनी बुधवारी ॲक्सिओम स्पेसच्या व्यावसायिक मोहिमेचा भाग असलेले शुभांशु शुक्ला यांनी इतर तीन जणांसह आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर अंतराळ प्रवास सुरू करीत इतिहास घडवला.

स्पेसएक्सचे फाल्कन-९ रॉकेट फ्लोरिडा येथील केनेडी स्पेस सेंटरवरून भारतीय वेळेनुसार दुपारी १२.0१ वाजता ॲक्सिओम-४ मोहिमेतील अंतराळवीरांना आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाकडे घेऊन जाण्यासाठी झेपावले. याचे प्रक्षेपण शुक्ला यांच्या लखनौतील सिटी मॉन्टेसरी स्कूलसह जगभरात झाले. शुक्ला यांच्या पालकांनीही हे ऐतिहासिक प्रक्षेपण पाहिले. प्रक्षेपणानंतर १0 मिनिटांनी अंतराळवीरांनी पृथ्वीभोवती प्रदक्षिणा घालण्यास सुरुवात केली. यासह मानवी मोहिमेच्या माध्यमातून ४१ वर्षांनंतर भारतीय अंतराळात पोहोचला. लखनौमध्ये जन्मलेले शुक्ला, नासाचे माजी अंतराळवीर व मिशन कमांडर पेगी व्हिट्सन, पोलंडचे स्लाव्होस उझनान्स्की-विस्निव्हस्की आणि हंगेरीचे टिबोर कापू हे ॲक्सिओम-४ मोहिमेचा भाग आहेत. १९८४ मध्ये तत्कालीन सोव्हिएत युनियनच्या सॅल्युट-७ अंतराळ स्थानकाचा भाग म्हणून राकेश शर्मा यांनी कक्षेत आठ दिवस घालवल्यानंतर ४१ वर्षांनी शुक्ला आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात प्रवास करणारे पहिले भारतीय अंतराळवीर ठरले. माझ्या प्रिय देशवासीयांनो नमस्कार, आपण ४१ वर्षांनी अंतराळात पोहोचलो आहोत. ही एक उत्तम राईड होती. आम्ही पृथ्वीभोवती ७.५ किमी प्रतिसेकंद वेगाने फिरत आहोत. माझ्या खांद्यावर तिरंगा कोरलेला आहे. मी तुमच्या सर्वांसोबत असल्याचे तो मला सांगत आहे, असे शुभांशु शुक्ला यांनी सांगितले. ही केवळ आंतरराष्ट्रीय अंतराळ केंद्राच्या माझ्या प्रवासाची सुरुवात नाही, तर भारताच्या मानवी अंतराळ उड्डाणाचीही सुरुवात आहे. तुम्ही प्रत्येकाने या प्रवासाचा भाग व्हावे, अशी माझी इच्छा आहे. चला, आपण एकत्र भारताच्या मानवी अंतराळ कार्यक्रमाला सुरुवात करूया, असे शुक्ला म्हणाले. कक्षेत पोहोचल्यावर अंतराळवीरांनी त्यांच्या अगदी नवीन कॅप्सुलला ‘ग्रेस’ हे नाव दिल्याचे उघड केले. राकेश शर्मा ठरले पहिले भारतीय ३ एप्रिल १९८४ रोजी कझाक सोव्हित सोशलिस्ट रिपब्लिकनमधील बायकोनूर कॉस्मोड्रोम येथून प्रक्षेपित केलेल्या सोव्हित रॉकेट सोयूझ टी-११ मधून उड्डाण करीत अंतराळात जाणारे विंग कमांडर राकेश शर्मा हे पहिले भारतीय ठरले होते.

### १४ दिवसांची मोहीम

ही मोहीम १४ दिवसांची आहे. यात ६० पेक्षा जास्त वैज्ञानिक प्रयोग केले जातील. यातील सात प्रयोग भारताचे आहे. आंतरराष्ट्रीय अंतराळ केंद्रावर जाणारे शुभांशु शुक्ला हे पहिले भारतीय राहतील. भारताने या मोहिमेसाठी ५५० कोटी रुपये खर्च केले आहे. या माध्यमातून अंतराळ क्षेत्रातील भारताची महत्त्वाकांक्षा दिसून येते.

**शुभांशु... शुभास्ते पंथानः सन्तु...!!** वृत्त पान ३

ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांनी भारतासाठी अंतराळ क्षेत्रात एक नवीन मैलाचा दगड रचला आहे. त्यामुळे देश उत्साहित आहे तसेच याबद्दल अभिमान आहे. शुक्ला यांच्यासह अमेरिका, पोलंड आणि हंगेरीतील ॲक्सिओम-४ मधील त्यांचे सहकारी अंतराळवीर सिद्ध करतात की, हे जग खरोखरच ‘वसुधैव कुटुम्बकम्’ आहे. नासा आणि इस्रातील शाश्वत भागीदारीचे प्रतिबिंब असलेल्या या मोहिमेच्या यशासाठी माझ्या शुभेच्छा.
- **द्रौपदी मुर्मू**, राष्ट्रपती



ॲक्सिओम-४ मोहिमेचे आंतरराष्ट्रीय अंतराळ केंद्राच्या दिशेने झालेल्या यशस्वी उड्डाणाचे स्वागत करतो. शुभांशू शुक्ला १४० कोटी भारतीयांच्या इच्छा, आशा आणि आकांक्षा घेऊन गेले आहेत. भारत, हंगेरी, पोलंड आणि अमेरिकेचे अंतराळवीर घेऊन जाणाऱ्या अंतराळ मोहिमेच्या यशस्वी प्रक्षेपणाचे आम्ही स्वागत करतो. ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणारे पहिले भारतीय बनण्याच्या मार्गावर आहेत.
- **नरेंद्र मोदी**, पंतप्रधान





# भीमा नदीतील विसर्गामुळे पंढरपुरात पाणी शिरण्याचा धोका

### २८ जूनपर्यंतच उजनी आणि वीर धरणातून पाण्याचा विसर्ग; सतर्कतेचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२५ जून -**

आषाढी यात्रेच्या काळात चंद्रभागेला पूरस्थिती निर्माण होवू नये यासाठी उजनी आणि वीर धरणात पाणीसाठा करण्याची क्षमता निर्माण व्हावी, यासाठी उजनी आणि वीर धरणातून बुधवारी सायंकाळी पाच वाजता ६४ हजार २१९ हजार क्युसेक इतका विसर्ग संगम येथून भीमा नदीत सोडण्यात आलेला आहे. हे पाणी एक-दोन दिवसांमध्ये पोहचून पंढरपूर शहरातील काही सखल भागात पाणी येण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

उजनी आणि वीर धरणातून येत्या २८ तारखेपर्यंतच भीमा नदीमध्ये पाण्याचा विसर्ग सोडला जाणार आहे. जेणे करुन यात्रेच्या काळात जरी पाऊस झाला तरी या दोन्ही धरणात पाणी साठविण्याची क्षमता तयार व्हावी. यासाठी प्रशासनाकडून धरणातील पाण्याचे योग्य प्रकारे नियोजन करण्यात येत असल्याची माहिती पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडून देण्यात आली आहे. दरम्यान वीर धरणातून बुधवारी (ता.२५) दुपारी चार वाजल्या पासून सोडण्यात येत असलेल्या पाण्याच्या विसर्गात कपात करण्यात आल्याचे निरा उजवा कालवा प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

दरम्यान मंगळवारीच चंद्रभागा नदीवरील जुना दगडी पूल तसेच नदी काठावरील वेगवेगळ्या गावांमधील भीमा नदीपात्रातील सुमारे सहा ते आठ बंधारे हे पाण्याखाली गेलेले आहेत. या बंधाऱ्यांवरुन होणारी सर्व प्रकारची वाहतूक सध्या प्रशासनाकडून बंद करण्यात आलेली आहे. या बरोबरच नदीच्या काठावरील सर्व गावांमधील ग्रामस्थांना सतर्कतेचा देखील इशारा देण्यात आला होता.

# आणिबाणीत संविधानाच्या भावनेचे उल्लंघन : नरेंद्र मोदी

**नवी दिल्ली, २५ जून-**

आणिबाणीच्या काळात संविधानाच्या भावनेचे झालेले उल्लंघन कोणताही भारतीय विसरू शकणार नाही, असा घणाघात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी केला. घटनात्मक मूल्य बळकट करण्यासाठी आमचे सरकार कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील हा काळाकुट्ट अध्याय आहे, असे मोदी यांनी आणिबाणीला ५0 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने ‘एक्स’वर केलेल्या पोस्टच्या मालिकेत म्हटले आहे.

संविधानात समाविष्ट असलेली मूल्ये दूर सारण्यात आली, मूलभूत अधिकारांवर गदा आणली गेली, माध्यमांचे स्वातंत्र्य संपुष्टात आले आणि मोठ्या संख्येने राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी आणि सामान्य नागरिकांना तुरुंगात डांबण्यात आले, असे त्यांनी नमूद केले. त्यावेळी सत्तेत असलेल्या काँग्रेस सरकारने जणू काही लोकशाहीला डांबून ठेवले होते, असे मोदी म्हणाले. आणिबाणी लावण्यात आली तो दिवस संविधान हत्या दिवस म्हणून साजरा केला जाईल, अशी घोषणा मोदी सरकारने मागील वर्षी केली होती. संविधानात मोठे बदल असलेली ४२ वी घटनादुरुस्ती करण्यात आली आणि जनता सरकारने ती उलटवली. ही आणिबाणी लादणाऱ्या काँग्रेस सरकारच्या धूर्त कारस्थानांचे एक उत्तम उदाहरण आहे, असे मोदी म्हणाले. ‘द इमर्जन्सी डायरीज-इयर्स दॅट फोर्ज्ड अ लीडर’ माध्यमातून मोदींच्या लोकशाहीच्या लढ्याला उजाळा देण्यात आला.

## विचारपुष्प



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तृतीय सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांचा आज तिथीप्रमाणे स्मृतिदिन


आपली संस्कृती धार्मिक सहिष्णुतेची आहे आणि विज्ञानाचा स्वीकार करूनही आपण आपली मूल्ये जपू शकतो. धर्म आणि विज्ञान यांचा संघर्ष न करता, समन्वय साधणे हे राष्ट्रनिर्माणाचे मूळ आहे.
- **बाळासाहेब देवरस**
रा. स्व. संघाचे तृतीय सरसंघचालक

## दहावीची परीक्षा वर्षातून दोन वेळा

**मुंबई** : २०२६ पासून दहावीच्या विद्यार्थ्यांना एका शैक्षणिक सत्रात दोन वेळा सीबीएसई बोर्डाची परीक्षा देता येईल. परंतु, फेब्रुवारीमध्ये पहिल्या टप्प्यात होणाऱ्या परीक्षेला बसणे त्यांच्यासाठी अनिवार्य असेल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी बुधवारी दिली. मे महिन्यात होणारा दुसरा टप्पा कामगिरीत सुधारणा करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पर्यायी असेल. जर एखादा विद्यार्थी दोन्ही टप्प्यांमध्ये बसला, तर दोन्ही टप्प्यांमधील सर्वोत्तम गुण राखले जातील, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) दहावीच्या वर्षातून दोन वेळा बोर्ड परीक्षा घेण्याच्या नियमांना मान्यता दिली आहे.







सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्त्वाचे...

### नागणेवाडी परिसरातून ३१ वर्षीय विवाहित महिलेसह तीन मुले बेपत्ता

**मंगळवेढा, दि.२५ जून-**

नागणेवाडी परिसरातून एक ३१ वर्षीय विवाहित महिला आपल्या तीन मुलासह राहते घरातून बेपत्ता झाली असल्याची तक्रार तिच्या पतीने पोलीसात दिली असून पोलीस त्या महिलेचा कसून शोध घेत आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,दि.२२ जून रोजी सकाळी ९ ते ११ दरम्यान ३१ वर्षीय विवाहित महिला आपल्या तीन मुलासह कोणास काही न सांगता निघून गेली आहे. रात्री उशीरापर्यंत सर्वत्र कुटूंबियांनी शोध घेतला मात्र ती मिळून आली नाही. तिचे वर्णन वर्ण गोरा,उंची ५.२ इंच,अंगात नेसणेस लाल रंगाचा टॉप व काळ्या रंगाची लेगीज पँट,शरीरबांधा सडपातळ, भाषा मराठी व हिंदी. सोबत १३ वर्षाची मुलगी,१० वर्षाची मुलगी, ६ वर्षाचा मुलगा असे तिघेजण सोबत असून कोणाच्या निदर्शनास आल्यास तपासिक महिला पोलीस हवालदार सुनिता चवरे (९८५०१६१८७८) या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### हुन्नूर येथे अंघोळीस गेलेल्या एकाचा पाण्यात बुडून मृत्यू

**मंगळवेढा, दि.२५ जून-**

हुन्नूर येथे एक ४० वर्षीय व्यक्ती ओढ्यात अंघोळीस गेले असता पाण्यात बुडून मयत झाल्याची घटना घडली असून संजय पांडुरंग पवार असे मृत व्यक्तीचे नाव आहे. दरम्यान या घटनेची मंगळवेढा पोलीसात नोंद झाली आहे.या घटनेची हकीकत अशी,यातील मयत संजय पांडुरंग पवार रा.हुन्नूर) हे दि.२४ जून रोजी सकाळी ७ वाजता हुन्नूर गावा लगत असलेल्या ओढ्यावर अंघोळीस गेले असता ते पाण्यात बुडून मयत झाले असल्याी खबर मयताचा भाऊ राजेंद्र पवार यांनी दिली आहे. याचा अधिक तपास महिला पोलीस हवालदार वंदना घोडके ह्या करीत आहेत.

### समाधान शिबिरांचे बार्शीत आयोजन

**बार्शी, दि. २५ जून**

महसूल विभागामार्फत बार्शी तालुक्यात २६ जून ते १६ जुलै कालावधीत तालुक्यातील ११ मंडळांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या शिबिरांमुळे नागरिकांना रहिवाशी, उत्पन्न, जातीचे दाखले, नॉन-क्रिमिलियर प्रम ाणपत्र, रेशन कार्ड सेवा, सामाजिक लाभाच्या योजना तसेच प्रलंबित फेरफार आणि तक्रारींचे निराकरण यासारख्या सुविधा एकाच ठिकाणी मिळणार आहेत. ही शिबिरे सकाळी १० ते सायं. ५ या वेळेत मंडळाच्या ठिकाणी होणार आहेत. शिबिरांचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे : बार्शी: २६ जून, सौंदरे: २८ जून, आगळगाव: ३० जून, पानगाव: १ जुलै, वैराग: ३ जुलै, सुर्डी: ५ जुलै, गौडगाव: ७ जुलै, उपळे दुमाला: ९ जुलै नारी: ११ जुलै, पांगरी: १४ जुलै व खांडवी: १६ जुलै. या शिबिरांमध्ये ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक, पोलीस पाटील, रेशन दुकानदार आणि आपले सरकार सेवा केंद्रांचे कर्मचारी उपस्थित राहतील. संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी निराधार योजना यासारख्या सामाजिक योजनांशी संबंधित सेवाही उपलब्ध असतील. नागरिकांनी आपल्या कागदपत्रांसह शिबिरात उपस्थित राहून या सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदारांनी केले आहे.

# सात एकर द्राक्षबागेचे नुकसान; तिघांविरूध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२५ जून-**

बार्शी तालुक्यातील शेलगाव (मा.) येथे शेजारील शेतकऱ्यांनी स्वतःच्या शेतात फवारलेल्या तणनाशक औषधामुळे सात एकर द्राक्ष बागेचे मोठे नुकसान झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी पीडित शेतकऱ्याने बार्शी तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, तिघांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. कृषी विभागाकडून नुकसानीची पाहणी करून पंचनामा करण्याचे काम सुरू आहे.

शेलगाव (मा.) येथील शेतकरी किसन बाबू खरसडे (वय ५०) यांची गट नंबर १२ मध्ये सात एकर द्राक्ष बाग आहे. त्यांच्या शेताच्या शेजारीच त्यांचे बंधू विलास उर्फ लक्ष्मण खरसडे यांची शेती



आहे. दि. १८ जून २०२५ रोजी सकाळी १० वाजण्यापूर्वी विलास खरसडे, उत्तरेश्वर बाबू खरसडे आणि तुषार उत्तरेश्वर खरसडे यांनी त्यांच्या शेतात मोठ्या फवाऱ्याने तणनाशक औषधाची फवारणी केली. यावेळी वाऱ्याच्या झोताने हे विषारी तणनाशक औषध किसन खरसडे यांच्या द्राक्ष बागेत पसरले. या औषधाच्या तीव्र वासामुळे आणि रासायनिक परिणामामुळे सात एकर द्राक्ष बागेच्या पानांचा रंग बदलला, फळे खराब झाली आणि झाडांना मोठा धोका निर्माण झाला आहे.

**कृषी विभागाची पाहणी सुरू :** या घटनेची माहिती मिळताच कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी शेलगाव येथे भेट देऊन नुकसानीची प्राथमिक पाहणी केली. नुकसानग्रस्त द्राक्ष बागेचा पंचनामा करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तणनाशक औषधाच्या फवारणीमुळे झालेल्या नुकसानीचे नेमके स्वरूप आणि त्याची व्याप्ती तपासली जात आहे. पंचनामा पूर्ण झाल्यानंतर अहवाल सादर करून पुढील कारवाई केली जाईल, अशी माहिती कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली. नुकसानीचे प्रमाण लक्षात घेता, पीडित शेतकऱ्याला शासकीय योजनांअंतर्गत नुकसानभरपाई मिळण्याची शक्यता आहे.

**तक्रारीनंतर तिघांवर गुन्हा**

नुकसानीची माहिती मिळताच किसन खरसडे यांनी तुषार खरसडे यांच्याशी फोनवर संपर्क साधला. मात्र, आम्ही आमच्या शेतात तणनाशक फवारले आहे, तुमचे नुकसान झाले तर आम्ही काय करू? तुम्हाला जे करायचे ते करा, असे उद्दाम उत्तर देऊन तुषार यांनी दमदाटी केल्याचा आरोप फिर्यादीत नमूद आहे. यानंतर किसन खरसडे यांनी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तातडीने कारवाई करत विलास उर्फ लक्ष्मण खरसडे, उत्तरेश्वर बाबू खरसडे आणि तुषार उत्तरेश्वर खरसडे यांच्याविरुद्ध भादंवि कलम ४२७ आणि इतर संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. सध्या पोलीस नाईक कावळे या प्रकरणाचा तपास करीत आहेत.

## सांगोल्यात श्री चौंडेश्वरी देवीचा उत्सव भक्तीभावात


**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२५ जून-**

ज्येष्ठ अमावस्येनिमित्त कोष्टी समाजाचे आराध्य दैवत श्री चौंडेश्वरी माता देवीचा उत्सव सांगोल्यात देवांग कोष्टी समाज कोष्टी गल्ली व शाकंभरी देवी चॅरिटेबल ट्रस्ट कुंभार गल्ली यांच्याकडून दि.२४ व २५ जून रोजी आयोजित करण्यात आला होता.



या उत्सवानिमित्त मंगळवार दि.२४ जून रोजी सुवासिनी भोजनाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच दि.२५ जून रोजी श्री चौंडेश्वरी माता देवीच्या मुखवट्याची सांगोला शहरातून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी सर्व समाजबांधव, भगिनी, युवक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर मिरवणुकीबाबत श्री चौंडेश्वरी माता देवी आणि दानव यांचे हे युद्ध आहे अशी आख्यायिका पूर्वीपासून सांगितली जाते. सदर मिरवणुकीची सांगता परीट समाजातील सर्व सुवासिनीमार्फत पूजा करून केली जाते. त्यादिवशी परीट समाजातील सर्व सुवासिनी दिवसभर उपवास करतात व पूजा झाल्यानंतर उपवास सोडतात.

पूजेनंतर परीट समाजातील मानकरी देवीच्या मुखवट्यासह मानकऱ्याला खांद्यावर घेऊन श्री चौंडेश्वरी माता देवीच्या मूळ मंदिरात पोहोच करतात. सदर श्री चौंडेश्वरी माता देवीचा उत्सव साजरा करण्यासाठी देवांग कोष्टी समाजाचे अध्यक्ष अवधूत कुमठेकर, उपाध्यक्ष राजकुमार दौंडे, सचिव अनिल लाटणे, संचालक अमर तारळेकर, धनंजय दौंडे, मानकरी संजय दिवटे, शाकंभरी देवी चॅरिटेबल ट्रस्ट कुंभार गल्ली सांगोला यांचे पदाधिकारी व हटगर कोष्टी समाज बांधव तसेच परीट समाजाचे गणेश पाटोळे, संतोष पाटोळे, दगडू पाटोळे, गिरीश पाटोळे, दिपक पाटोळे, उत्तम पाटोळे, सुहास पाटोळे यांनी अथक परिश्रम घेतले.



### बठाण, ब्रम्हपुरी घरकूल धारकांना ३५० ब्रास वाळू मोफत वाटप

**मंगळवेढा दि.२५ जून-**

बठाण येथे जप्त केलेल्या वाळू साठ्यामधून ब्रम्हपुरी व बठाण गावातील घरकूल धारकांना मोफत प्रती पाच ब्रास वाळू वाटप करण्यात आली असल्याचे महसूल विभागाकडून सांगण्यात आले.शासनाने गोरगरीब जनतेला घरकुलासाठी मोफत वाळू वाटप करण्याचे धोरण अवलंबले आहे. त्यानुसार प्रभारी तहसिलदार संतोष कणसे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवेढा मंडलाधिकारी धनंजय इंगोले,बठाण तलाठी संदिप पवार यांनी बठाण व ब्रम्हपुरी गावातील घरकूल धारकांना ३५० ब्रास वाळू वाटप करण्यात आल्याचे महसूल विभागाकडून सांगण्यात आले.




## मंत्रालय-विधानभवनात कामकाज करणाऱ्या करमाळ्यातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची मुंबईत स्नेहभेट

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२५ जून-**

करमाळा तालुक्यातील मंत्रालय विधानभवन येथे कामकाज करणारे अधिकारी व कर्मचारी यांचा स्नेहमेळावा मुंबईमध्ये आयोजित करण्यात आला.

आपल्या कामातील अनुभवाचा फायदा तालुक्याच्या विकासासाठी करण्याचा केला सर्वांनी निर्धार करमाळा तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते दिपक चव्हाण यांच्या संकल्पनेतून मंत्रालय-विधानभवन येथे कार्यरत अधिकारी-कर्मचारी यांचा सचिवालय जिमखाना,मुंबई येथे स्नेहभेट कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी कक्ष अधिकारी अजय साखरे यांनी तालुक्यातील सर्वांना एकत्रित आणण्याचा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद असून यातून तालुक्याच्या विकास कामासाठी निश्चित फायदा होईल असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले मंत्रालयीन पातळीवरील अनुभवाचा आपल्या तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी जास्तीत जास्त उपयोग व्हावा अशी अपेक्षा कार्यक्रमाचे संयोजक दीपक चव्हाण यांनी व्यक्त केली. आपल्या माध्यमातून गाव तसेच तालुक्यातील सामाजिक काम करण्यासाठी आपण यातून पुढाकार घेणे गरजेचे आहे असे प्रतिपादन कक्ष अधिकारी संदीप कदम यांनी केले. यावेळी सदानंद मोहिते, सुरेखा तळेकर, महेश जाधव, विजय जगताप यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी उपसचिव शाहजान मुलाणी, मंगेश चिवटे, विनोद गाडे, प्रशांत दौंड, आकाश कांबळे, अक्षय हांडे, राम नलवडे, महेश मोरे, संतोष कांबळे, दत्तात्रय शिरस्कर, प्रवीण पोळ, कल्याणी साळुंखे, रोहित मेहेर, सुजित सावंत, अक्षय शिंदे, संदीप कदम, शैलेश कानडे, दाऊद शेख, मीनाक्षी जाधव, कल्याणी देवकर, निखिल शिंदे, किशोर साळवे, गोपाळ वाघमारे यांच्यासह मंत्रालयीन अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणेश जगताप यांनी केले. सूत्रसंचालन चैतन्य नलवडे यांनी केले तर आभार गणेश घाडगे यांनी मानले.



## पो. उपनिरीक्षक अमित लबडे यांचा पोलीस आयुक्तांच्या हस्ते सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२५ जून-**

शेटफळ तालुका करमाळा येथील सुपुत्र अमित लबडे यांनी पोलीस दलातील उत्कृष्ट कामगिरी करून दाखवल्याबद्दल त्यांना पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक अमित लबडे हे पिंपरी चिंचवड येथे कार्यरत आहेत.

मुंबईतील एका गुंतागुंतीच्या प्रकरणाचा पिंपरी चिंचवड हद्दीत योग्य तपास लावून गुन्हेगाराचा शेध घेतला आहे. त्यांच्या या कार्याने पोलीस दलाची मान उंचावल्याबद्दल त्यांना वरिष्ठांकडून सन्मानित करण्यात आले. ग्रामीण भागातील एका युवा अधिकाऱ्याचे कार्यकर्तुत्व पाहून झालेल्या सन्मानाबद्दल शेटफळ ग्रामस्थ व करमाळा तालुक्यात त्यांचे विशेष कौतुक केले जात आहे.महाराष्ट्र पोलीस दलात पोलीस उपनिरीक्षक पदी विराजमान असलेले शेटफळ गावचे सुपुत्र अमित लबडे यांनी गुंतागुंतीच्या व महत्त्वपूर्ण गुन्ह्याचा तपास पिंपरी चिंचवड हद्दीमध्ये लावण्यात यश मिळविले आहे.

त्यांच्या या कामगीरीबद्दल पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे साहेब यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक अमित लबडे हे भोसरी पोलीस स्टेशन येथे कार्यरत आहेत.



## मांजरगावचे सुंदरदास मोरे यांचे स्मृतिप्रित्यर्थ
## शेतातच रक्षा विसर्जन करून स्मृतीवृक्षाचे रोपण

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२५ जून-**

मांजरगाव (ता.करमाळा) येथील सुंदरदास देवराव मोरे यांचे सोमवारी दि.२३ जून रोजी हृदयविकाराने निधन झाले. बुधवारी दि.२५ रोजी राख सावडण्याचा (रक्षाविसर्जन) विधी होता. यावेळी रक्षा इतरत्र नदीत सोडण्यासाठी घेऊन जाण्याचे टाळत शेतजमीनीतच रक्षा विसर्जन करून स्मृतीवृक्षाचे रोपण करण्यात आले.

कै.सुंदरराव हे रामसुंदर शॉपिंग सेंटरचे मालक रामहरी मोरे यांचे वडिल होत. मांजरगाव परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे. सुंदरदास मोरे यांच्या पार्थीवावर सोमवार दि. २३ जून रोजी सायंकाळी सात वाजता त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थितीत होता. बुधवार दि. २५ जून रोजी सकाळी शेतजमीनीतच रक्षा विसर्जन केले. सुंदरदास मोरे यांचे धाकटे बंधू मांजरगावचे माजी सरपंच कल्याण मोरे, जगदगुरु तुकोबाराय सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष प्रभाकर मोरे, माजी सरपंच बाळासाहेब मोरे यांनी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा एक आदर्श समाजासमोर ठेवला आहे.

## छत्रपती शाहू महाराज... लोक कल्याणकारी राजा!

२६ जून रोजी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म झाला. शाहू महाराजांनी त्यांच्या संपूर्ण जीवन कार्यात लोककल्याणाचे व समाज उद्धाराचे कार्य केले. त्यांनी केलेल्या कार्यामुळे त्यांना लोककल्याणकारी राजा असे संबोधले जाते. महाराष्ट्र शासनामार्फत त्यांचा जन्मदिन हा संपूर्ण राज्यात सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो. शाहू महाराजांनी केलेल्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक कार्याची माहिती घेतल्यानंतर त्यांना लोक कल्याणकारी राजा का? म्हटले जाते याची प्रचिती येते. छत्रपती शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंतराव जयसिंगराव घाटगे यांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागलच्या जहागीरदार घाटगे घराण्यात जयसिंगराव आणि राधाबाई या दांपत्याच्या पोटी झाला.




चौथ्या शिवाजींच्या अकाली निधनानंतर ते कोल्हापूरच्या गादीवर दत्तक गेले १७ मार्च १८८४ रोजी. छत्रपती शाहू महाराजांवर महात्मा फुले व सत्यशोधक समाजाचा मोठा प्रभाव होता. छत्रपती शाहू महाराज हे सामाजिक चळवळीच्या क्षेत्रातील महात्मा फुले यांचे खरेखुरे वारसदार होते. सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्तानला आवश्यकता आहे, असे सांगून त्यांनी कोल्हापूर संस्थानात शिक्षणासाठी सवलती जाहीर केल्या. महाराष्ट्राने छत्रपती शाहू महाराजांचा शेतकऱ्यांचा खरा राजा म्हणून गौरव केला. भारतातील वस्तीगृहाचे आद्य जनक म्हणून छत्रपती शाहू महाराजांचा गौरव केला जातो. ते कल्याणकारी राजा होते. एप्रिल १९१९ मध्ये भारतात बहुजन समाजाच्या उद्धाराचे कार्य करणाऱ्या अखिल भारत वर्षीय क्षत्रिय महासभा या संस्थेच्या कानपुर येथे भरलेल्या १३ व्या अधिवेशनात शाहू महाराजांना त्यांच्या कार्याबद्दल राजर्षी ही पदवी बहाल करण्यात आली.

ग्रामीण भागातून शहरी भागात शिकण्यास येणाऱ्या विविध जाती-धर्माच्या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जातीची वस्तीगृह स्थापन शाहू महाराजांनी केली. तर सन १९०१ मध्ये मराठा विद्यार्थ्यांसाठी विक्टोरिया मराठा बोर्डिंग ची स्थापना कोल्हापूर येथे केली. तर नाशिक येथे उदोजी विद्यार्थी वस्तीगृह उभारून शहरी भागात विद्यार्थ्यांच्या राहण्याची व्यवस्था केल्याने त्या गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे शक्य झाले. सन १९०२ मध्ये शाहू महाराजांनी राज्यातील मागासवर्गीयांसाठी प्रशासकीय सेवा मध्ये ५० टक्के जागा राखीव ठेवल्या. तसेच महाराजांनी १५ नोव्हेंबर १९०६ किंग एडवर्ड मोहमेडन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. सन १९०७ मध्ये मिस क्लार्क बोर्डिंग हाऊस ची स्थापना अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी करून त्या विद्यार्थ्यांच्या राहण्याची व्यवस्था केली. सन १९११ मध्ये कोल्हापूर संस्थानात जाहीरनामा काढून त्यानुसार १५ टक्के विद्यार्थ्यांना नादारी देण्याची घोषणा करून गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची दारे खुली केली.

शाहू महाराजांनी १९११ मध्ये शिक्षक प्रशिक्षण व शिक्षकांसाठी मेरीट प्रमोशन योजना राबवले. तर १९१७ मध्ये आदेश काढून माध्यमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. व कोल्हापूर संस्थानातील गोरगरीब घरातील मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. १४ फेब्रुवारी १९१९ पाटील शाळा व त्याला जोडून तलाठी वर्ग सुरू करण्याचा जाहीरनामा काढला.

शाहू महाराजांनी सन १९१७ मध्ये विधवा विवाहाचा कायदा करून पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता दिली तर १९१८ मध्ये आंतरजातीय विवाहास मान्यता देणारा कायदा केला व समाजातील अनिष्ठ चाली-रीती वर हल्ला चढवला. १९१८ मध्ये महार वतने रद्द करून जमिनी रयतवारी ने करून दिल्या व वेठबिगारी प्रथा कायद्याने बंद केली व १९२० मध्ये माणगाव अस्पृश्यता निवारण परिषदेचे आयोजन केले. छत्रपती शाहू महाराज यांनी व्यवसाय निर्बंध दूर करून अस्पृश्यांना व्यवसाय स्वातंत्र्य दिले. जातिभेदास तीव्र विरोध केला महाराजांच्या या सर्व लोक कल्याणकारी कार्यामुळे खरेखुरे लोककल्याणकारी राजा होते. पददलित व मागासवर्गीयांची उन्नती हेच छत्रपती शाहू महाराजांनी जीवितकार्य मानले. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही अशी घोषणा त्यांनी केली. उदार विचारप्रणालीचा राजा होते. राज्य सोडावे लागले तरी बेहत्तर पण मागासलेल्या प्रजेच्या सेवेचे व्रत सोडणार नाही, असे शाहू महाराजांनी ठासून सांगितले. कामगारांनो संघटित व्हा व आपले हक्क प्राप्त करून घ्या असा संदेश त्यांनी दिला. क्श ुरी र झळपस. ईीं वशोलीरींळल झळपस. असे गौरवोद्गार भाई माधवराव बागल यांनी शाहू महाराजांबद्दल काढले. तर थोर समाज सुधारक विठ्ठल रामजी शिंदे शाहू महाराजा बद्दल म्हणाले की, शाहू राजा नुसता मराठा नव्हता ब्रह्मतोतर ही नव्हता. तो नव्या युगातील सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष होता. तो महाराष्ट्राच्या विकासाचा स्वाभाविक तरंग होता.

**- सुनील सोनटक्के,**
जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर

## घरगुती गॅसचा स्फोट होऊन मुलगी ठार

**मंगळवेढा दि.२५ जून-**

नंदेश्वर-झरेवाडी परिसरात घरगुती गॅसचा स्फोट होवून एक दोन वर्षाची मुलगी ठार झाली तर अन्य चार जण गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी सोलापूर येथे शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे पोलीस सुत्रांकडून सांगण्यात आले. बुधवार दि.२५ रोजी दुपारी २.३० वाजता नंदेश्वर झरेवाडी परिसरात गंगथडे कुटूंबियाचा शिरसी येथे हॉटेल व्यवसाय असून ते शेव बनवत होते. या दरम्यान गॅसची पाईप लिकेज होवून गॅसचा मोठा स्फोट झाला. यामध्ये दोन वर्षाची श्रेया दादासो गंगथडे हिचा या घटनेत मृत्यू झाला. तर दादासो विष्णू गंगथडे,मोनाली दादासो गंगथडे,अनुजा दादासो गंगथडे, स्वरा दादासो गंगथडे,सुनिता राहुल गंगथडे आदी या घटनेत गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना उपचारासाठी सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे वृत्त आहे. या घटनेची खबर मिळताच मंगळवेढ्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे, नंदेश्वर बीटचे पोलीस हवालदार कोष्टी आदींनी सदर घटनास्थळी भेट देवून मृत्यू व जखमींची विचारपूस केली.

# स्वप्न की सत्य लवकरच कळणार...

### एक जुलैपासून काही भागात तीन दिवसाआड पाणीपुरवठा

### दुहेरी जलवाहिनीतून १७० एमएलडी पाणी उपसा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जून-**

उजनी - सोलापूर दुहेरी जलवहिनीची चाचणी पूर्ण झाली आहे. एकूण चार पंप कार्यान्वित करण्यात आले असून पूर्ण क्षमतेने १७० एमएलडी पाणी उपसा होत आहे. एक जुलैपासून शहरातील काही भागात होणार तीन दिवसाआड पाणीपुरवठा होईल, अशी माहिती म हापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

सोलापूर शहराच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्प मानला जाणाऱ्या उजनी- सोलापूर दुहेरी जलवाहिनीच काम पूर्ण झाले आहे. त्यानंतर त्याची चाचणी प्रक्रियाही पूर्ण करण्यात आली आहे. दरम्यान, नियोजित १७० एमएलडी पाणी उपसाही पूर्ण क्षम



तेने झाला आहे. फ्लो मीटरच्या माध्यम ातून हा पाणीपुरवठा तपासण्यात आला आहे. यापूर्वी दोन विद्युत पंपावर पाणी उपसा करण्यात येत होता सध्या सर्व चार पंप कार्यान्वित करण्यात आले आहेत. पूर्ण क्षमतेने हे पंप कार्यरत आहेत, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सांगितले. येत्या एक जुलैपासून सोलापूर शहरातील काही भागात तीन दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. ज्या ठिकाणी पाच दिवसाआड पाणीपुरवठा आहे त्या ठिकाणी चार दिवसाआड तर चार दिवसाआड पाणीपुरवठा असलेल्या भागात तीन दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा प्रयत्न राहणार आहे. पाणीपुरवठ्यात एक दिवस कमी करण्यासाठी प्रयत्न आहेत असे महापालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे यांनी स्पष्ट केले.

### तुटलेले ड्रेनेज झाकणे बदलण्यासाठी ३० लाखांची तरतूद

सोलापूर शहरातील रस्त्यावरील ड्रेनेज चेंबरची झाकणे तुटलेली आहेत. यामुळे वाहतुकीसाठी मोठ्या प्रमाणात अडथळा येत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून येत आहेत. त्या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी अशा झाकणांचा सर्वे करण्याचे आदेश सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांना दिले होते. त्यानुसार चौबे यांनी झोन कार्यालयाकडून आकडेवारी मागवली आहे. तुटलेली झाकणे बदलण्यासाठी ३० लाखाच्या निधीची तरतूद करण्यात येत आहे, असे सार्वजनिक आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे यांनी सांगितले.

तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर | गुरुवार, २६ जून २०२५






# शुभांशु....शुभास्ते पंथान: सन्तु...!!

**भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला ड्रॅगन स्पेसक्राफ्टमधून अंतराळाकडे रवाना झाले आहेत. एक्सिओम मिशन ४ अंतर्गत हे यान अमेरिकेतील फ्लोरिडा येथील केनेडी स्पेस सेंटरमधून सोडण्यात आले. या मोहिमेत शुभांशुंसोबत अमेरिका, पोलंड आणि हंगेरीचे अंतराळवीरही सहभागी झाले आहेत. ही घटना भारतासाठी अनेक अर्थांनी ऐतिहासिक ठरणार आहे. कारण १९८४ मध्ये राकेश शर्मा रशियन स्पेसक्राफ्टद्वारे अंतराळात गेले होते. तर शुभांशु हे भारताचे पहिले अंतराळवीर ठरणार आहेत.**

**आपत्कालीन बॅकअपही सज्ज**

अशा सूटमध्ये बॅकपॅक यंत्रणाही असते, जी आपत्कालीन प्रसंगी ऑक्सिजन पुरवते आणि कार्बन डायऑक्साइड बाहेर टाकते. जर काही बिघाड झाला, तर हे बॅकअप जीव वाचवू शकतात.

**शुभांशुच्या बॅगेत आहे तरी काय?**

शुभांशुचे मिशन दोन आठवडे चालणार आहे. शुभांशु शुक्ला यांनी आपल्या बॅगेत काही वस्तू स्वत:च्या आवडीच्या म्हणून ठेवल्या आहेत. ते सोबत काही आवडते गोड पदार्थ घेऊन गेले आहेत. त्यांच्याजवळ खाण्यासाठी भरपूर अन्न आहे. याशिवाय ते आंब्याचा रस, गाजराचा शिरा आणि मुगाच्या डाळीचा शिराही सोबत घेऊन गेले आहेत.

शुभांशु यांनी मिठाईसोबतच एक लहानचा टेडी जवळ बाळगला आहे. ज्याला त्यांनी जॉय असे नाव दिले आहे. विशेष म्हणजे जॉय हा पाचवा चालक दल सदस्य मानला गेला आहे. तो फक्त साथीदार नाही तर हे मिशन सुरू झाल्यानंतर मायक्रोग्रॅव्हिटीमध्ये पोहोचल्याचा एक संकेतही असेल.

**भरारी घेण्यापूर्वी ऐकले 'स्वदेस'चे गाणे**

अंतराळातून झेप घेण्यापूर्वी शुभांशु शुक्ला यांनी हृतिक रोशनच्या सिनेमातील गाणे ऐकल. शुभांशु शुक्ला यांनी शाहरुख खानच्या 'स्वदेस' या सिनेमातील गाणे अवकाश भरारी घेण्यापूर्वी ऐकल्याची माहिती एका क्रू मेंबरने दिली आहे. फ्लोरिडा येथून त्यांनी फाल्कन-९ या अंतराळ यानाने उड्डाण घेतले. अंतराळ यानात जाण्यापूर्वी त्यांनी त्यांचे आवडते 'यूँ ही चला चल राही' हे गाणे ऐकले.

**लाँच डे प्लेलिस्ट**

अंतराळवीर जेव्हा मोहिमेवर जातात. तेव्हा त्यापूर्वी ते कुटुंबीयांना भेटून त्यांचा निरोप घेतात. त्यानंतर आपले आवडते गाणं ते ऐकतात, ही नासाची परंपरा आहे. यालाच 'लाँच डे प्लेलिस्ट' म्हटले जाते.

संगीतामुळे मन:शांती मिळते. तणाव कमी होतो. अंतराळवीरांना रिलॅक्स करण्यासाठी आणि त्यांचे मोहिमेवर लक्ष केंद्रित करण्यासाठी ही परंपरा असल्याचे म्हटले गेले आहे. नासाच्या या मोहिमेत शुभांशु शुक्ला भारताचे प्रतिनिधी म्हणून काम करत आहेत. त्यांच्यासोबत आणखी तीन अंतराळवीर या मोहिमेवर आहेत. भारताचे पहिले अंतराळवीर राकेश शर्मा यांनी ३ एप्रिल १९८४ साली स्पेस मिशन सोवियत संघाच्या मदतीने केले होते. त्यानंतर शुभांशू शुक्ला हे दुसरे भारतीय अंतराळात जात आहे. एक वर्षाच्या कठोर मेहनतीनंतर अंतराळ मोहिमेसाठी त्यांची निवड करण्यात आली आहे. याआधी हे मिशन सात वेळा टळले आहे. बऱ्याचदा समोर आलेल्या तांत्रिक बिघाडानंतर अखेर आयएसएसचे ज्वेज्दा मॉड्यूल उड्डाणासाठी तयार करण्यात आले. अनेक वर्ष अंतराळ संस्था यावर काम करत होती. नासाच्या कॅनडी स्पेस सेंटरवरून फाल्कन- ९ ने यशस्वी अवकाशाकडे उड्डाण घेतले आहे.



अवकाशात उड्डाण करण्यापूर्वी अवकाशयात्रींनी दिलेली पोझ



## पत्नीसाठी पाठविला भावनिक संदेश

'ॲक्सिऑम-४' मोहिमे अंतर्गत अंतराळ यानाच्या उड्डाणाआधी शुभांशु शुक्ला यांनी त्यांच्या पत्नीसाठी एक भावनिक संदेश लिहिला. त्यात त्यांनी म्हटले, आयुष्याच्या प्रवासातील माझी अद्भूत भागीदार असलेल्या कामना शुक्लाचे विशेष आभार मानतो. तुझ्याशिवाय हे काहीच शक्य नव्हते आणि तू नसतीस तर या कशालाच किंमत नसती. कधीकधी तुमचे जवळचे लोक तुमच्यासाठी असे काही त्याग करतात की आपल्याला त्याची कल्पनाही नसते, किंवा आपल्याला ते त्याग समजतही नाहीत. मात्र, ते आपल्यावरील प्रेमापोटी सगळे करत असतात. मी तुमच्या प्रत्येकाचा आभारी आहे. ■


## किती आहे शुभांशुच्या सूटची किंमत?



अंतराळवीरांना दिले जाणारे स्पेससूट हे केवळ कपडे नसतात, तर ते एक प्रकारचे चालते-फिरते अंतराळयानच असते. अमेरिकेची अंतराळ संस्था नासा तयार करत असलेले स्पेससूट हे याचे उत्तम उदाहरण आहे. याची किंमत जवळपास १ अब्ज डॉलर, म्हणजेच ८,३५५ कोटी रुपये आहे. हे सूट इतके महाग असतात. कारण ते -१५० ते +१२० पर्यंत तापमान सहन करू शकतात. अंतराळातील सूक्ष्म धुळीपासून ते घातक किरणांपर्यंत, अनेक धोके टाळण्यासाठी ते तयार केलेले आहेत.

**सूटमध्ये काय काय असतं?**

या स्पेससूटमध्ये ऑक्सिजन, तापमान नियंत्रण यंत्रणा, कार्बनडायऑक्साइड बाहेर टाकणारी प्रणाली, पिण्याचे पाणी, एअर कंडिशनिंग आणि अगदी इनबिल्ट टॉयलेटही असते. एकंदरच, या सूटमध्ये अंतराळवीरांचं संपूर्ण जग सामावलेलं असतं. ■



## कोण काय म्हणाले?

**वडील शंभू शुक्ला** : त्याला नागरी सेवेत जायचे होते. मात्र, इंटर होताच त्याची एनडीएसाठी निवड झाली. त्याने जे क्षेत्र निवडले त्यात तो कायम यशस्वीच राहिला आहे. पंतप्रधान मोदींनी जेव्हा त्याचे आणि आमचे अभिनंदन केले तेव्हा म्हटले की, तुमचा मुलगा हिरा आहे. त्याक्षणी मुलाचा अत्यंत अभिमान वाटला.

**शिक्षक नागेश्वर शुक्ला** : म्हणाले की , तो लहानपणापासूनच एक कुशाग्र बुद्धीचा विद्यार्थी होता. अतिशय शिस्तप्रिय आणि अभ्यासाच्या बाबतीत काटेकोर असणारा हा मुलगा राहिला. केवळ गणित, विज्ञानच नव्हे तर त्याला प्रत्येक विषय आवडायचा.

**बहिणींना अभिमान** : शुभांशुची शाळा लखनौ सिटी मॉन्टेसरी स्कूल येथे त्याच्या सन्मानार्थ जणू एक मिनी स्पेस सेंटरच उभारले होते. येथे होणाऱ्या कार्यक्रमात त्याच्या दोन्ही बहिणी सहभागी झाल्या होत्या. त्या म्हणाल्या की, तो फक्त आमचा भाऊ नाही तर देशाचा गौरव आहे. ■

**अंतराळात करणार योग...**

शुभांशु शुक्ला यांनी अंतराळात जाताना सोबत नेणाऱ्या सर्व वस्तू अस्सल भारतीयच आहे. विशेष म्हणजे, ते अंतराळात योगासने करणार आहेत. योगाची जगाला आठवण करून देण्यासाठी शुभांशुने योग करण्याचे ठरवल्याचे समजते.

(वृत्तसंस्था)



अमेरिकेतील फ्लोरिडा अवकाशतळावरून यानाने यशस्वी झेप घेतल्यानंतर भारताचा अवकाशवीर शुभांशु शुक्लाच्या कुटुंबीयांनी आनंद व्यक्त केला

## भारतीय अन्नपदार्थांवर अंतराळात पहिल्यांदाच चाचणी

### शुभांशुच्या आग्रहामुळे नासाने दिली परवानगी

भारतीय अंतराळ संस्था अर्थात् इस्रो आणि डीआरडीओ यांनी अनेक वर्षांच्या संशोधनानंतर अंतराळवीरांसाठी अंतराळात नेले जाऊ शकणारे अन्न तयार करण्यात यश मिळवले. मात्र प्रत्यक्षात याचा वापर अंतराळ मोहिमांमध्ये झालेला नाही. हे अन्नपदार्थ खूप मसालेदार असल्याचे सांगत अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था नासाने त्यांना अंतराळात नेण्यास परवानगी दिली नव्हती. शुभांशु याच्या आग्रहामुळे भारतीय अन्नपदार्थ अंतराळात नेण्याची परवानगी देण्यात आली.

भारतीय अन्नपदार्थांवर चाचणी करून आगामी अंतराळ मोहिमांसाठी याचा वापर करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

नासाची स्पेस फूड लॅब आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात मोहिमांसाठी अन्नाचे नमुने तयार करून पाठवते. यात कोरडे, गोठलेल्या अन्नाचा समावेश असते, जे पॅकिंग केलेले असते. पेये, बिस्किटे, अन्न हे पावडर स्वरुपात असते २०२७ मध्ये इस्त्रोच्या गगनयान मोहिमेत यातील अनेक प्रकारच्या अन्नाचा समावेश राहणार असल्याचे इस्त्रोने सांगितले.

**२४ तासांत १६ वेळा सूर्योदय, सूर्यास्त**

आंतरराष्ट्रीय अंतराळ केंद्राशी जोडण्यासाठी यानाला २८ तास लागणार आहेत. तत्पूर्वी पुढील २४ तासांत हे यान १६ वेळा पृथ्वीला प्रदक्षिणा घालणार आहे. त्यामुळे एका दिवसांत हे अंतराळवीर १६ वेळा सूर्योदय व १६ वेळा सूर्यास्त पाहतील. शुक्ला हे या मोहिमेचे सारथ्य करत असून आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात ते १४ दिवस राहणार आहे. ■

## शुभांशु अंतराळात करणार प्रयोगांची सप्तपदी

### भारताच्या पेचात मानाचा तुरा, अंतराळ यानाचे सारथ्य लीलया पेलणार

राकेश शर्मा यांच्यानंतरचे भारताचे दुसरे अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला 'ॲक्सिऑम-४' मोहिमेअंतर्गत तीन इतर सहकाऱ्यांसह फ्लोरिडा येथील केनेडी स्पेस स्टेशन येथून बुधवारी आयएसएस अर्थात आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाकडे रवाना झाले. अंतराळवीरांना सुरक्षितपणे पोहोचवण्यासाठी आयएसएसमध्ये अंतराळयान डॉक करण्याची आणि कॅप्सूलला कोणत्याही प्रकारची समस्या आल्यास अंतराळयान नियंत्रित करण्याची जबाबदारी शुभांशुवर आहे. विशेष म्हणजे यानाचे सारथ्य शुभांशुकडे आहे.

२८ तासांच्या प्रवासानंतर ड्रॅगन हे अंतराळ यान आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात पोहोचल्यानंतर १४ दिवसांच्या मुक्कामात शुभांशु सात प्रयोग करणार आहे. भारताच्या गगनयान मोहिमेला आणि मानवी जीवनासाठी या संशोधनाचा मोठा फायदा होणार आहे. यासाठी त्यांनी सोबत विविध बियाणे, शैवाळ आणि रोपटे सोबत नेले आहे, यावर तो प्रयोग करणार आहे. इस्रोने दिलेल्या माहितीनुसार शुभांशु आयएसएसमध्ये राहून काही प्रसंगी भारतीय विद्यार्थ्यांसोबत संवाद साधणार आहे.

**अवकाशात शेती करण्यासाठी संशोधन**

**प्रयोग-१ : सहा पिकांच्या बियाण्यांची चाचणी** : शुभांशु सहा प्रकारच्या बियाणांसह आयएसएसमध्ये गेला. त्याच्या १४ दिवसांच्या प्रवासादरम्यान, तो सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात या बियाण्यांच्या वाढीबद्दल महत्त्वाची माहिती गोळा करेल. याचा उद्देश भविष्यात अवकाशात शेतीसाठी पर्याय शोधणे आहे.

**प्रयोग-२ : जेवणासाठी शैवाळाचा वापर** : शुभांशुने सूक्ष्म शैवाळ म्हणजेच मॉसचे तीन प्रकार सोबत नेले असून तो त्यांचा वापर अन्न, इंधन आणि कमी गुरुत्वाकर्षणाच्या परिस्थितीत दीर्घकालीन मोहिमांमध्ये जीव वाचवण्यासाठी पर्याय म्हणून करेल.

**प्रयोग-३ : जीवाश्मांच्या सुरक्षिततेवर प्रयोग** : टार्डिग्रेड्स अर्थात् एक प्रकारचा लहान जीव जो अत्यंत कठीण परिस्थितीत स्वतःला सामान्य ठेवू शकतो यावर शुभांशु चाचण्या करणार आहे. याद्वारे अंतराळातील धोकादायक वातावरणात कोणते जीवाणू सुरक्षित राहू शकतात हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला जाईल.

**प्रयोग-४: स्नायूंच्या परिणामावर संशोधन** : शून्य गुरुत्वाकर्षणात मानवांमध्ये स्नायूंचे वस्तुमान कसे कमी होते आणि ते कसे हाताळता येते हे समजून घेण्याचा प्रयत्न केला जाईल. आगामी दीर्घकालीन मोहिमांसाठी हे अतिशय महत्त्वाचे संशोधन ठरणार आहे.

**प्रयोग-५ : डोळ्यांची क्षमता तपासणार** : सूक्ष्म गुरुत्वाकर्षणाचा डोळ्यांवरील परिणाम यावर देखील अभ्यास केला जाईल. या संशोधनात, अंतराळवीरांच्या डोळ्यांच्या हालचालीवर अंतराळात किती प्रमाणात परिणाम होतो हे शोधले जाईल.

**प्रयोग-६ : पिकांची पौष्टिक गुणवत्ता** : मोहिमेत काही बियाण्यांचे अंकुर वाढवण्याचा प्रयत्न केला जाईल. त्यांच्या पोषक तत्त्वांचे देखील मोजमाप केले जाईल, पृथ्वीवर आणि शून्य गुरुत्वाकर्षणावर पिकांच्या पोषणातील फरक समजून घेणे याचा उद्देश आहे. यामुळे अंतराळवीरांना पृथ्वीवरून अन्नपदार्थ सोबत नेण्याची आवश्यकता राहणार नाही. तेथेच पिकांची लागवड केली जाईल.

**प्रयोग-७ : सायनोबॅक्टेरियाचा वापर** : अवकाशात अन्न, पाणी आणि ऑक्सिजनची उपलब्धता मोठी समस्या आहे. शास्त्रज्ञ दीर्घकाळापासून आयएसएसवर याची व्यवस्था करण्याचा प्रयत्न करत आहेत. युरिया आणि नायट्रेटमध्ये सायनोबॅक्टेरिया वापरून शून्य गुरुत्वाकर्षणावर अन्न आणि ऑक्सिजन एकाच वेळी तयार करण्यावर शुभांशु संशोधन करेल. हा सर्वात कठीण प्रयोग असेल. ■



यानाने उड्डाण करताच लखनौ येथील एका शाळेतील विद्यार्थ्यांनी अंतराळयात्रींचे अभिनंदन केले



# आजपासून अकरावी प्रवेशाला सुरुवात

### विद्यार्थ्यांच्या पसंतीनुसार महाविद्यालयाची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जून-**

अनेक तांत्रिक अडचणीनंतर अकरावी प्रवेशासाठी पाच जूनपर्यंत प्रवेशअर्ज भरून घेण्यात आले होते. त्यानंतर गुरूवार २६ जूनपासून प्रवेशप्रक्रीया होत आहे. पहिल्या टप्यात संस्था कोट्यातील प्रवेशप्रक्रिया मुदत सोमवार १६ जून रोजी संपली आहे.

अकरावी प्रत्यक्ष प्रवेशाला गुरुवार २६ जूनपासून सुरुवात होत आहे. जे विद्यार्थी पहिल्या फेरीत प्रवेश घेण्यास इच्छुक नसतील त्या विद्यार्थ्यांनी संबंधित महाविद्यालयांना लेखी कळविण्याच्या सूचना माध्यमिक शिक्षण विभागाने दिल्या आहेत. दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी यंदा प्रथमच ऑनलाईन प्रवेशप्रक्रिया राबविण्यात आली. सुरूवातीस प्रवेश अर्ज भरताना विद्यार्थ्यांना अनेक अडचणी आले होत्या. त्यानंतर पाच जूनपर्यंत अर्ज भरण्याची मुदत संपल्यानंतर १२ ते १६ जून दरम्यान पहिल्या टप्यात संस्था अधिकारातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आले.

त्यानंतर २६ जूनपासून मेरीटनुसार प्रवेश सुरू होत आहे. संस्थाअंतर्गत प्रवेशाची मुदत संपल्यामुळे मेरीटच्या विद्यार्थ्यांना आवडीनुसार महाविद्यालय मिळाल्यानंतर प्रवेश निश्चिती होणार आहे. प्रवेश प्रक्रियापासून वंचित विद्यार्थ्यांनाही प्रवेश देता येणार आहे.

**नकार दिलेले विद्यार्थी दुसऱ्या यादीसाठी पात्र**

पहिल्या प्रवेश यादीत नाव आल्यानंतर विद्यार्थी प्रवेश घेण्यास इच्छुक नसल्यास संबंधित महाविद्यालयात जाऊन लेखी नकार द्यावा लागणार आहे. त्यानंतर त्या जागी दुसऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार आहे. तसेच पहिल्या यादीत नकार दिलेला विद्यार्थी दुसऱ्या यादीसाठी पात्र ठरणार आहे.

# वारीतील सुविधा पाहणी; पालकमंत्र्यांची मंत्रालयीन टीम पंढरीच्या मैदानात

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २५ जून-**

संताच्या सर्व पालखी मार्गावरील भाविकांना देणारे येणारे सुविधांचा कामे अंतीम टप्प्यात आली असून राज्याचे ग्राम विकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांची मंत्रालयातील टीम ग्राऊंडवर पाहणी साठी आली आहे. या टीमने पालखी मार्गावर अंतीम टप्प्यात असलेले कामाचे प्रगतीवर समाधान व्यक्त केले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी प्रत्येक पालखी मार्गासाठी जबाबदार विभाग प्रमुख नेमले आहेत. तासनतास प्रत्येक बाबींचा आढावा घेऊन कामांची अंमलबजावणी केली जात आहेत. सोलापूर जिल्हा परिषदेचे वतीने पाच प्रमुख पालखी मार्गावरील कामे वेगवान गतीने सुरू असतानाच अंतीम टप्प्यात असलेली कामे पाहणी करणेसाठी राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांच्या टीमने आज संत निवृत्तीनाथ महाराज पालखी मार्ग संत एकनाथ महाराज पालखी मार्ग व निळोबाराय महाराज पालखी मार्गावरच्या मुक्कामाच्या ठिकाणी तसेच विश्रांतीच्या ठिकाणी भाविकांच्या सुविधांची पाहणी केली बिटरगाव व रावगाव येथील वेगवेगळ्या सुविधांच्या पाणी बरोबरच ग्रामविकास विभागाने मंजूर केलेल्या रस्त्याची कामे सुरू असून या कामांची देखील पाहणी विशेष कार्यकारी अधिकारी दादासाहेब कांबळे यांनी केली. रावगाव ता. करमाळा येथील संत निवृत्तीनाथ महाराजांच्या पालखी तळावरील रस्त्याचे कामांची पाहणी टीम ने करून समाधान व्यक्त केले. विशेष कार्यकारी अधिकारी दादासाहेब कांबळे, विशेष कार्यकारी अधिकारी महादेव घुले यांनी दोन्ही पालखी मार्गाचा धावता दौरा केला. त्यांचे समवेत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, जिल्हा परिषदेचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, गटविकास अधिकारी सुशील संसारे, करमाळा गटविकास अधिकारी डॉ. अमित कदम व इतर अधिकारी उपस्थित होते. भाविकांच्या निवास व्सवस्थेची पाहणी , शौचालय व स्नानगृह तसेच ग्रामविकास विभागातून मंजूर केलेल्या रस्त्याच्या कामांची पाहणी केली.

**तीन पालखी तळाची पाहणी**

जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी खडूस येथील उभे रिंगण तसेच पिराची कुरुल येथील पालखीतळ तसेच भंडी शेगाव येथील पालखीतळाची पाहणी करून विविध सुविधांची पाहणी केली महिलांसाठी असलेला हिरकणी कक्ष तसेच महिला साठी स्नानगृहाची व्यवस्था व इतर कामांची पाणी आज उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी करून त्यांनी पुढील सूचना दिल्या.

**जर्मन हँगर निवास; कामे अंतीम टप्प्यात**

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावर भंडी शेगाव येथील पालखीतळावर जर्मन हँगर चे काम अंतिम टप्प्यात आले असून या ठिकाणी ५००० पेक्षा अधिक भाविकांची निवासाची व्यवस्था या ठिकाणी करण्यात आली आहे या ठिकाणी मोबाईल चार्जिंग च्या सुविधा सह महिलांसाठी पुरुषांसाठी शौचालय तसेच हिरकणी कक्षाची देखील या ठिकाणी व्यवस्था करण्यात आलेली आहे

**प्रमुख १० पालखी मार्गाच्या नियोजनासाठी २१ पालक अधिकारी : सीईओ जंगम**

सोलापूर जिल्ह्यात विविध मार्गावरील १० प्रमुख पालखी मार्गावरील संताचे पालखी सोहळे व भाविक येतात. या पालखी मार्गावर भाविकांना देणेत येणारे सुविधांसाठी २१ जिल्हा स्तरावरील अधिकारी , विभाग प्रमुख व गटविकास अधिकारी यांची नियुक्ती करणेत आली असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली. निवास व्यवस्था, हिरकणी कक्ष, स्नानगृह , पिण्याचे पाण्याची व्यवस्था, आरोग्य सेवा याबरोबरच मदत केंद्र उभारण्यात आली आहेत. दररोज या नोडल अधिकारी यांचा आढावा घेणेत येतो. असेही सिईओ कुलदीप जंगम यांनी सांगितले.

# पनाश टॉवर प्रकरण; चौघांचे खुलासे प्राप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जून-**

विजापूर रोडवरील बहुचर्चित १७ मजली पनाश टॉवर प्रकरणी चौकशी अहवाला नंतर बजावलेल्या नोटीसीचा खुलासा करण्यासाठी त्या आजी-माजी १२ अधिकाऱ्यांना दिलेली मुदत संपली आहे. दरम्यान, केवळ चार जणांनी याबाबत खुलासा सादर केला आहे, अशी माहिती महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी दिली.

विजापूर रोडवरील बहुचर्चित १७ मजली पनाश टॉवर प्रकरणाची चौकशी पूर्ण होऊन त्याचा अहवाल महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांना सादर करण्यात आला. या प्रकरणी अखेर २७ मे २०२५ रोजी महापालिकेच्या संबंधित १२ आजी-माजी अधिकारी-कर्मचाऱ्यांना नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी या नोटीसा बजावल्या होत्या. पनाश टॉवर प्रकरणाला पुढील कार्यवाहीसाठी ब्रेक लागल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतर महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी या प्रकरणाची फाईल पुन्हा उघडली. या संदर्भातील सविस्तर माहिती घेतल्यानंतर त्यांनी या प्रकरणाची चौकशी लावली होती आणि चौकशी अधिकारी म्हणून महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांची नियुक्ती केली होती. त्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी केली. चौकशी दरम्यान, या प्रकरणातील तक्रारदार भाजपाचे माजी नगरसेवक प्रभाकर जामगुंडे यांचे म्हणणे नोंदवून घेतले. याप्रकरणी चौकशीअंती उपायुक्त आशिष लोकरे आणि उपसंचालक नगररचना मनीष भिष्णूरकर यांनी अहवाल आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांना सादर केला होता. पनाश प्रकरण हाताळणारे १२ आजी-माजी अधिकारी-कर्मचारी असून यामध्ये सहा अधिकारी निवृत्त आणि काहींनी स्वेच्छा निवृती घेतली आहे. तर ४ अधिकारी-कर्मचारी हे सध्या महापालिकेत कार्यरत आहेत. या पनाश संबंधित अधिकाऱ्यांना नोटीस बजावण्याचे आदेश आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सामान्य प्रशासन विभागाचे नियंत्रण अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांना दिले होते. त्यानुसार अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी सर्व प्रक्रिया रितसर पार पाडून नोटिसा बजावल्या होत्या. खुलासा करण्यासाठी दहा दिवसाची मुदत दिली होती. त्यानंतर पुन्हा पंधरा दिवसाची मुदतवाढ दिली होती. ती मुदत ही संपली आहे. आत्तापर्यंत ४ जणांनी याबाबतचा खुलासा सादर केला आहे.

याप्रकरणी सोलापूर अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, तत्कालीन अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे, तत्कालीन नगर अभियंता (निवृत्त) सुभाष सावस्कर, लक्ष्मण चलवादी (निवृत्त), सध्याचे सहायक अभियंता रामचंद्र पेंटर, नागनाथ बाबर, म ोहन कांबळे (निवृत्त), एस. व्ही. जाधव, श्रीकांत खानापुरे, दीपक भादुले, अब्दुल चंदरकी, झाकीर हुसेन नायकवाडी आदी आजी-माजी अधिकारी-कर्मचाऱ्यांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# असून खोळंबा...

आजच्या डिजिटल युगात सरकार विविध क्षेत्रांत तंत्रज्ञानाचा वापर करून कार्यक्षमता वाढविण्याचा प्रयत्न करीत आहे. विविध विभागांना आणि नागरिकांना त्याचा फायदाही होत आहे. 'सरकारी काम आणि सहा महिने थांब' ही ओरड त्यामुळे इतिहासजमा झाली आहे. त्याच योजनेचा पुढचा भाग म्हणजे राज्य परिवहन विभागामार्फत सर्व वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट (एचएसआरपी) बसवण्याची सुरू केलेली मोहीम. या उपक्रमाचा उद्देश वाहनांची ओळख निश्चित करणे, चोरी रोखणे आणि वाहनधारकांचे संरक्षण सुनिश्चित करणे हा आहे. परंतु या मोहिमेला गालबोट लागले आहे, कारण अनेक नागरिकांची बनावट संकेतस्थळांच्या जाळ्यात अडकून मोठी फसवणूक होत आहे. यामुळे वाहनधारकांचे पैसेही वाया जात असून, त्यांच्या हाती नंबर प्लेट येणेही दुरापास्त झाले आहे. संकेतस्थळावरील नोंदणीमध्येही घोळ होत आहेत. कुणाकडून कमी तर कुणाकडून जादा पैसे आकारले जात आहेत. अनेकदा संकेतस्थळ उघडण्यामध्ये अडचणी येत असून, विभागाच्या संकेतस्थळाशी समानता असलेल्या संकेतस्थळांवर चुकीनेही गेलात तर मोठा आर्थिक फटका बसत आहे. राज्य सरकार सायबर सिक्युरिटी कायद्याची कठोर अंमलबजावणी करीत असताना बनावट संकेतस्थळांमुळे सामान्य नागरिकांची होणारी फसवणूक ही गंभीर बाब आहे. यामुळे केवळ आर्थिक नुकसानच होत नसून नागरिकांचा सरकारी यंत्रणेवरील विश्वासही ढासळतो आहे.

राज्यात १ एप्रिलपासून सर्व वाहनांना एचएसआरपी नंबर बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिक सध्या यासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करीत आहेत. पण याचाच गैरफायदा सायबर भामटे घेत आहेत. सायबर चोरट्यांनी ६ बनावट वेबसाईट तयार केल्या असून, नंबरप्लेट नोंदणीच्या नावाखाली ते नागरिकांना गंडा घालत आहेत. सरकारने या बनावट वेबसाईट्सपासून सावधान राहण्याचे आवाहन केले आहे, पण तितक्याने लोकांना दिलासा थोडाच मिळणार आहे. बनावट संकेतस्थळांचा सुळसुळाट झाला असून, या वेबसाईट्स अधिकृत संकेतस्थळाची हुबेहूब नक्कल करीत असल्याने सामान्य नागरिकच नव्हे तर टेक्नोसॅव्ही म्हणवून घेणाऱ्या पिढीतील लोकही त्यात अलगद अडकत आहेत. या संकेतस्थळांवर नोंदणी केल्यावर वाहनधारकांच्या खात्यातून पैसे तर वळते होतात, पण नंबर प्लेट वेळेवर पोहोचत नाही किंवा मिळतच नाही.

या बाबत कानोसा घेतला असताना जनतेमध्ये परिवहन विभागाच्या अधिकृत वेबसाईटबाबत माहितीचा अभाव असल्याची बाब पुढे येत आहे. कोणती वेबसाईट खरी आणि अधिकृत, याबाबत बरेच नागरिक अनभिज्ञ दिसतात. लोकांमध्ये तंत्रज्ञानाबाबत नसलेली जागृती हे देखील यामागचे एक कारण आहे. त्यामुळे अनेकदा गूगल सर्चवर येणाऱ्या पहिल्या लिंकवर क्लिक करून नागरिक फसवणुकीच्या विळख्यात अडकत असल्याच्या तक्रारी येत आहेत. काहींनी याबाबत माध्यमांमध्येही धाव घेतली आहे. असमान दर आकारणीच्या समस्येचाही नागरिकांना फटका बसत आहे. यासाठीचे दर निश्चित असतानाही, जादा पैसे घेऊन नागरिकांची लूट होते आहे. अधिकृत संकेतस्थळ वारंवार डाऊन होणे किंवा लोड न होणे, त्यामुळे नागरिक बनावट संकेतस्थळांच्या पर्यायांकडे वळत असल्याचे दिसत आहे. एचएसआरपीसाठीची मुदत सरकारने ३१ मार्च आणि नंतर ३० जूनपर्यंत वाढवून दिली होती. पण सहा महिन्यांचा कालावधी लोटूनही यो योजनेला मिळालेला अल्प प्रतिसाद आणि नोंदणीची संथगती बघता ही मुदत १५ ऑगस्टपर्यंत वाढवून देण्यात आली आहे. नंबर प्लेट बसवून देणाऱ्यांची संख्या तुलनेने कमी असून, यामध्ये तांत्रिक अडचणींनाही सामोरे जावे लागत आहे. उपराजधानी नागपूरचा विचार करता येथे २२ लाखांवर वाहनांना एचएसआरपी बसविण्याची गरज असताना आजतागायत २० टक्क्यांवरही हा आकडा गेलेला नाही. प्रशासनाने सांगितल्यानुसार वाहनधारकांना https://transport.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन 'अप्लाय एचएसआरपी'वर क्लिक करायचे आहे. झोनची निवड करून 'ऑर्डर एचएसआरपी'वर क्लिक केल्यानंतर वाहनाची माहिती टाकायची आहे. या प्रक्रियेनंतर जवळचे केंद्र निवडायचे आहे. ज्या तीन कंपन्यांना नंबरप्लेटचे कंत्राट मिळालेले आहे, त्यांनी राज्यात कुठेही नोंदणी शक्य असल्याचे सांगितले असले तरी, त्यात घोळ होत असून, नागरिकांचा उगाच खोळंबा होत आहे. विभागातील अधिकारीच सांगताहेत की त्यांच्याकडे दुचाकीसाठी ५३१ रुपयांऐवजी ९०० रुपये आकारल्याच्या तक्रारी आल्या आहेत. कारसाठी नागरिकांना १२०० रुपयांपेक्षा अधिक रुपये भरल्याच्याही तक्रारी आहेत. एचएसआरपीसाठी ऑनलाईन नोंदणी करताना इन्शुरन्स, पीयूसी आणि आरसी बूक अपडेट करावे लागणार का, याबाबत परिवहन विभागाने कुठलेही स्पष्ट निर्देश दिलेले नाहीत. पण दंडाची रक्कम वाचविण्यासाठी अनेक जण आरटीओ कार्यालयाच्या परिसरात चकरा मारताना दिसत आहेत. या परिस्थितीमुळे 'प्रवाशांच्या सेवेसाठी' असे ब्रीदवाक्य असलेल्या परिवहन विभागाच्या योजनेबद्दल 'असून खोळंबा' अशी स्थिती निर्माण झाली आहे. एकंदरीत नागरिकांच्या मनात सरकारच्या मोहिमेबाबत नाराजी निर्माण झालेली आहे. सरकारला नागरिकांना दिलासाच द्यायचा असेल तर ही बनावट संकेतस्थळे कायमची बंद करायला हवीत. तशी यंत्रणा सरकारजवळ आहे. फक्त सरकारला त्या यंत्रणेचा वापर करण्याची इच्छाशक्ती हवी. राज्य परिवहन विभागाची जबाबदारी ही केवळ नंबर प्लेट लागू करण्यापुरती मर्यादित नाही. नागरिकांची फसवणूक होऊ नये याची पूर्ण काळजी घेणे ही देखील त्यांची जबाबदारी आहे. एकेका शहराची फसवणूक झालेल्या नागरिकांची आकडेवारी गोळा केली तर राज्यभरात ही संख्या हजारोंच्यावर जाईल. तथापि, सध्याच्या परिस्थितीत वादग्रस्त आणि बनावट संकेतस्थळांवर कार्यवाही करण्यात विभाग निष्क्रिय असल्याचे चित्र दिसते. ही निष्क्रियता फसवणुकीला प्रोत्साहन देणारी ठरत आहे.

सरकारने ताबडतोब या सायबर गुन्हेगारीला आळा घालून ती करणाऱ्या आरोपींना हुडकून काढायला हवे. बनावट संकेतस्थळांवर तत्काळ प्रतिबंध घालणे हा देखील उपाय असू शकतो. राज्य सायबर सुरक्षा यंत्रणांशी समन्वय करून बनावट संकेतस्थळे तत्काळ बंद केली जावीत. गुगल आणि अन्य सर्च इंजिन्सवर अशा संकेतस्थळांच्या जाहिराती देखील बंद केल्या जाव्यात. राज्य सरकारने अधिकृत वेबसाईट्सचा प्रचार, प्रसार सर्वत्र करावा. वाहन तपासणी केंद्र, आरटीओ कार्यालय, पेट्रोल पंप, वृत्तपत्रे, रेडिओ, दूरदर्शन, सोशल मीडिया आदी सर्व माध्यमांतून जाहिराती देऊन जनजागरण करायल हवे. सध्या प्रत्येक मोबाईलच्या रिंगपाठोपाठ सायबर गुन्हेगारीपासून सावध राहण्याचे आवाहन करणारा संदेश दिला जातो. त्यातून बऱ्याच मोठ्या प्रमाणात लोकांमध्ये जागृती आली आहे. यासोबतच पथनाट्यांच्या माध्यमातून अशा संकेतस्थळांबाबत सावध राहण्याचा संदेश दिला जाऊ शकतो. एचएसआरपीसाठी ठरावीक शुल्क आहे हे नागरिकांना सांगणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्व अधिकृत वेबसाईट्सवर, केंद्रांवर आणि पोलिस ठाण्यांमध्ये दरपत्रक लावले जावे. डिजिटल माध्यमातून साक्षरतेचा प्रचार केला जायला हवा. एचएसआरसी बुक कसे करावे? याविषयी व्हिडीओ ट्युटोरियल, स्टेप-बाय-स्टेप मार्गदर्शिका बनवून यूट्युब, व्हॉट्सॲप व फेसबुकवर प्रसारित केली असली तरी त्या लिंकचा जास्तीत जास्त युवा वर्गात प्रचार, प्रसार झाल्यास त्याचे चांगले परिणाम समोर आल्याशियाय राहणार नाही. वाहन तपासणी केंद्रांवर क्यूआर कोड लावून नागरिकांना अधिकृत संकेतस्थळावर नेणारी सोपी प्रणाली निर्माण करावी. राज्य सरकार सध्या केंद्राच्या सोबतीने विकास कामे आणि कार्यक्षमतेमध्ये वेगाने अग्रेसर होत आहे. त्यातून लोककल्याणाचे स्वप्न देखील साकार होत आहे. मात्र सर्वसामान्यांच्या सायबर फसवणुकीमुळे शासनाच्या प्रतिमेला तडे जात आहेत. परिवहन विभागाच्या मंत्र्यांनी आपल्या विभागाची कार्यक्षमता सिद्ध करताना याकडेही बारकाईने लक्ष दिल्यास सरकारबाबत विनाकारण निर्माण होणारी अनास्था दूर होण्यास मदत होईल.


## तंत्रवेध

# क्वांटम कॉम्प्युटिंगची भन्नाट संकल्पना

**डॉ. दीपक शिकारपूर**

संगणक म्हणजे काय याबाबतच्या कल्पना सतत बदलत आहेत. तीस वर्षांपूर्वी असलेली मेनफ्रेम संगणकाची क्षमता आता ५जी स्मार्टफोनमध्ये काही वर्षांत येईल. अनेक विकसक नवनवीन कल्पना राबवून व्यवसाय, जीवन, व्यापार, उद्योग, सरकारी कामकाज अशा अनेक बाबीत अभिनव प्रोग्राम्स/ॲप्स निर्माण करत आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या जगात आपण वेगाने प्रगती करीत आहोत. एके काळी केवळ विज्ञानकथांमध्ये पाहिले जाणारे तंत्रज्ञान आता प्रत्यक्षात येत आहे. आज आपण अशा एका तंत्रयुगात आहोत जिथे संगणक प्रणालीने आपले जीवन व्यापून टाकले आहे. पारंपरिक संगणक अनेक समस्यांवर कार्यक्षमतेने उपाय शोधतो, परंतु काही गुंतागुंतीच्या समस्या सोडवण्यासाठी आणखी उच्च क्षमता आवश्यक आहे. अशा परिस्थितीत क्वांटम कॉम्प्युटिंग ही एक क्रांतिकारी संकल्पना म्हणून उदयास आली आहे. ही संगणक प्रणाली क्वांटम भौतिकशास्त्रावर आधारित आहे आणि पारंपरिक संगणकांपेक्षा लाखोपट वेगवान आणि कार्यक्षम ठरू शकते. कालचे सुपर कॉम्प्युटर आता नवीन स्वरूपात येत आहेत. त्याचेच नवीन नाव आहे क्वांटम कॉम्प्युटिंग. हे एक वेगाने उदयाला येणारे तंत्रज्ञान आहे. ते शास्त्रीय संगणकांसाठी अत्यंत गुंतागुंतीच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी क्वांटम मेकॅनिक्सच्या नियमांचा उपयोग करते. ही यंत्रे अर्ध्या शतकाहून अधिक काळ चालत आलेल्या शास्त्रीय संगणकांपेक्षा खूप वेगळी आहेत. क्वांटम संगणकाची संकल्पना सर्व प्रथम १९८२ मध्ये नोबेल पारितोषिक विजेते भौतिकशास्त्र रिचंड फेयनमॅन यांनी मांडली. ज्याप्रमाणे संगणकाने मानवी जीवनात आमूलाग्र बदल घडवले, त्याचप्रमाणे क्वांटम कॉम्प्युटिंग भविष्यात अनेक क्षेत्रांमध्ये अभूतपूर्व बदल घडवण्याची क्षमता ठेवते.

हे तंत्रज्ञान केवळ पारंपरिक संगणकांच्या मर्यादा ओलांडून जटिल समस्या सोडवण्यास मदत करेल असे नाही, तर ते संशोधन, विकास आणि नवनवीन शोधांनाही चालना देईल. क्वांटम कॉम्प्युटर क्यूबिट्स वापरतात. क्यूबिट्स क्वांटम यांत्रिकीच्या नियमांवर आधारित असतात आणि त्यांच्यामध्ये सुपरपोझिशन आणि एंटँगलमेंट या दोन महत्त्वाच्या संकल्पना असतात. एंटँगलमेंट म्हणजे दोन किंवा अधिक क्यूबिट्स अशा प्रकारे जोडले जातात की, एका क्यूबिटची स्थिती बदलल्यास दुसऱ्या क्यूबिटची स्थितीही तत्काळ बदलते. यामुळे अत्यंत जटिल समस्या सोडवण्यासाठी प्रचंड समांतर प्रक्रिया करणे शक्य होते. साधे उदाहरण म्हणजे जसे साधा संगणक एका वेळी एक पुस्तक वाचेल आणि मग दुसऱ्या पुस्तकाकडे वळेल, पण क्वांटम कॉम्प्युटर एकाच वेळी ग्रंथालयातील सगळी पुस्तके वाचायला घेईल. या क्वांटम नियमांमुळे क्वांटम कॉम्प्युटर



पारंपरिक संगणकांना लागणाऱ्या दशके किंवा शतकांच्या तुलनेत काही मिनिटांमध्ये किंवा सेकंदात अत्यंत गुंतागुंतीच्या गणिताच्या समस्या सोडवू शकतात. क्वांटम संगणक प्रणालीमुळे माहितीची देवाणघेवाण, साठवण, माहिती प्रक्रिया सुरक्षितरीत्या करता येईल. यामुळे हॅकिंगसारखे प्रकार रोखता येतील. क्वांटम संगणकाच्या माध्यमातून अतिगुंतागुंतीचे गणिती सिद्धांत साठवले जाऊ शकतील. संगणकीय मॉडेलच्या आधारे वैद्यकीय आजारावरील कारणे शोधता येतील. क्वांटम कॉम्प्युटिंगची शक्ती वापरणाऱ्या संस्था जगातील काही मोठ्या समस्यांचे निराकरण करण्यात मदत करू शकतात आणि औषध संशोधनापासून जागतिक कृषी, संरक्षण आणि अनेक क्षेत्रांमध्ये प्रगती करू शकतात. पर्यावरणक्षेत्रात हवामानात होणारे बदल टिपून त्यातील भूतकाळातील नियमांनुसार भविष्यातील निष्कर्ष म्हणजे हवामानाचे अंदाज काढणे महत्त्वाचे असते. त्यामुळे हे अंदाज जितके बरोबर येतील, तितकी मदत मानवजातीला होईल. चक्रीवादळ, अतिवृष्टी, भूकंप या नैसर्गिक आपत्तीला आपण अस्मानी संकट मानतो. त्यात दरवर्षी प्राणहानी व कोट्यवधी मालमत्तेचे नुकसानही होते. या ठिकाणी भविष्यातील क्वांटम संगणक खूप मदत करू शकतील. संगणकाचे सध्याचे तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्तेशी संबंधित समस्यांचे निराकरण करण्यासाठी, अतिउच्च संगणकीय संसाधने वापरतात. त्यासाठी प्रचंड मोठे विदा (डेटा) विश्लेषण करायची गरज असते. हे प्रकरण प्रचंड वेळखाऊ आणि खर्चीक आहे. क्वांटम कॉम्प्युटरमध्ये सध्याच्या कॉम्प्युटरच्या तुलनेत लक्षणीयरीत्या कमी संगणकीय संसाधनांसह समस्या सोडवण्याची क्षमता आहे. यामुळे अधिक कार्यक्षम कृत्रिम बुद्धिमत्तेचे प्रोग्राम्स तयार होऊ शकतात, या तंत्राचे अनेक क्षेत्रांना दीर्घकालीन फायदे आहेत.

आरोग्यक्षेत्रात हे तंत्रज्ञान औषध शोध, जिनोमिक्स आणि वैयक्तिक आरोग्यसेवांना लक्षणीयरीत्या गती देऊ शकते. उत्पादन क्षेत्रासाठी ते पुरवठा साखळी व्यवस्थापन, खर्च कमी करणे आणि एकूण कार्यक्षमता सुधारणे हे उद्दिष्ट साध्य करू शकते. सध्या अनेक वाहनांवर जीपीएसद्वारे वाहन हालचाल व्यवस्थापन माहिती मिळवली जाते. अनेक सीसीटीव्ही कॅमेरे चलतचित्रे रेकॉर्ड करतात. पण, हे सर्व पाहणे आणि त्यावर निर्णय घेणे मानवाच्या क्षमतेबाहेरचे आहे. इथेच उच्च तंत्रज्ञानक्षम माहिती पृथक्करण महत्त्वाचे आहे. माहितीचे तत्काळ पृथक्करण हा कृत्रिम बुद्धिमत्तेचा पाया आहे. ही माहिती अनेक स्वरूपात असू शकते. २०२३ मध्ये आपल्या देशातही या विषयावर मंथन सुरू झाले. भारत एक नवीन झेप घेण्यासाठी आणि क्वांटम तंत्रज्ञानामध्ये जगाचे नेतृत्व करण्यासाठी सज्ज झाला आहे. राष्ट्रीय क्वांटम मिशनची आता निर्मिती करण्यात आली आहे. अशा प्रकारे मिशनच्या स्वरूपात क्वांटम तंत्रज्ञानाच्या विकासासाठी कार्यक्रम जाहीर करणारा भारत हा सातवा देश ठरला आहे. अमेरिका, चीन, कॅनडा, ऑस्ट्रिया, फिनलंड आणि फ्रान्स या देशांनी यापूर्वीच अशा मोहिमा सुरू केल्या आहेत. सुपरकंडक्टिंग आणि फोटोनिक तंत्रांसारख्या विविध प्लॅटफॉर्म्सवर आठ वर्षांमध्ये पन्नास ते एक हजार भौतिक क्यूबिट्स क्षमतेचा, मध्यम क्वांटम संगणक विकसित करणे हे नवीन मिशनचे उद्दिष्ट आहे. २०२३-२४ ते २०३०-३१ या आठ वर्षांच्या कालावधीत क्वांटम मिशनवर सहा हजार ६५ कोटी खर्च केले जातील. देशातील दोन हजार किलोमीटरच्या परिक्षेत्रातील ग्राऊंड स्टेशन्समधील उपग्रह आधारित सुरक्षित क्वांटम कम्युनिकेशन, इतर देशांसोबत लांब पल्ल्याचे सुरक्षित क्वांटम कम्युनिकेशन, दोन हजार किलोमीटरपेक्षा जास्त अंतराचे आंतरशहर क्वांटम नेटवर्क हे मिशनचे इतर पैलू आहेत. हे मिशन आण्विक यंत्रणा आणि अणुघड्याळांमध्ये उच्च संवेदनशीलतेसह सुसज्ज मॅग्नोमीटर विकसित करण्यात मदत करेल. क्वांटम उपकरणे तयार करण्यासाठी सुपरकंडक्टर, नवीन सेमीकंडक्टर आणि टोपोलॉजिकल सामग्रीच्या डिझाईनमध्येदेखील हे मदत करेल. मिशनअंतर्गत क्वांटम कॉम्प्युटिंग, क्वांटम कम्युनिकेशन, क्वांटम सेन्सिंग आणि मेट्रोलॉजी, क्वांटम सामग्री आणि उपकरणे या क्षेत्रात चार केंद्रे स्थापन केली जातील.

क्वांटम कॉम्प्युटिंग हे एक असे तंत्रज्ञान आहे, जे आपल्या भविष्याची दिशा बदलू शकते. हे केवळ वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रगतीचे प्रतीक नाही, तर मानवाच्या सर्वांत मोठ्या समस्या सोडवण्याची क्षमता असलेले एक शक्तिशाली साधन आहे. औषधनिर्माण, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, हवामान बदल आणि सामग्री विज्ञान यासारख्या अनेक क्षेत्रांमध्ये ते क्रांती घडवून आणेल.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नीलेश जोशी**

# समुपदेशकाची आत्महत्या

काही घटना समाजमन सुन्न करणाऱ्या असतात. त्यात कोणाचा आकस्मिक मृत्यू असतो, तर कुणी ध्यानीमनी नसताना केलेली आत्महत्या असते. त्यातही जो भावनिक आधार देतो, मनोचिकित्सा करून समुपदेशन करतो अशा व्यक्तीची आत्महत्या म्हणजे या समस्येने किती गंभीर रूप धारण केले आहे याची जाणीव करून देते. हा विषय पुन्हा चर्चेत आला तो अकोल्यातील मानसोपचार समुपदेशक असलेले डॉ. जावरकर यांच्या आत्महत्येने. गत २०-२२ वर्षांपासून डॉ. जावरकर हे अकोल्यातील सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञाकडे समुपदेशक म्हणून काम करीत होते. नेहमी सकारात्मक विचार मांडणारे, रुग्णांच्या समस्या समजून घेऊन त्यांना मानसिक आधार देणारे डॉक्टर यांनी स्वतःच आत्महत्या करावी इतक्या तणावात ते होते का असा प्रश्न चर्चिला जात आहे. खरं म्हणजे धक्कादायक ठरावी अशी ही काही पहिली आत्महत्या नव्हे. या पूर्वी देखील समाज प्रबोधन करणाऱ्या, प्रथितयश व्यक्तींनी केलेली आत्महत्या अनेक प्रश्न निर्माण करणारी ठरली. त्यावेळी सुद्धा या विषयावर अनेकदा चर्चा झाली. प्रत्येक आत्महत्येची विविध कारणे असली तरी मनमोकळ्या संवादाचा अभाव ही प्रमुख बाब प्रत्येक घटनेनंतर समोर आली आहे.

'स्टुडंट सुसाईड - ऑन एपिडेमिक स्विपिंग इंडिया' यांनी मध्यंतरी नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या आकडेवारीच्या आधारावर एक अहवाल प्रसारित केला होता. ज्यात विद्यार्थ्यांच्या आत्महत्येसंदर्भात धक्कादायक आकडेवारी समोर आली. या अहवालानुसार देशात २०२१ मध्ये एकूण तब्बल १ लाख ६४ हजार, तर २०२२ मध्ये १ लाख ७० हजार आत्महत्या झाल्याचे म्हटले. तर याच अहवालात ६ हजार ६५४ वरून १३ हजार ४४ इतर वाढ विद्यार्थ्यांच्या आत्महत्येत झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. दुर्दैवाने सर्वाधिक आत्महत्येचे प्रमाण महाराष्ट्रात असल्याचे या अहवालात म्हटले आहे. एकीकडे शिक्षणाचे हब असणाऱ्या राजस्थान येथील कोटामधील आत्महत्या चर्चेत असल्या तरी या रांगेत राजस्थानचा १० क्रमांक आहे. तर याच अहवालाच्या आधारे भारतात सरासरी दररोज ४५० आत्महत्या होतात. ही आकडेवारी चिंताजनक म्हणावी लागेल. त्यातही अनेक घटना पोलिस दप्तरी नोंद होत नसल्याने ती संख्या या अहवालात नाही.

आत्महत्येच्या घटनांमागे त्या व्यक्तीला आलेले अपयश, नकारात्मक विचार, अथवा मृत्यूचे भय असल्याचे बोलले जाते. पण शेवटी आत्महत्या ही एक कृती आहे. त्यात केवळ एका व्यक्तीचाच नव्हे तर संपूर्ण कुटुंबाचा बळी जातो. त्यामुळे आत्महत्या रोखण्यासाठी विशेष प्रयत्न झाले पाहिजे. यात मुख्यतः मानसिक आरोग्याबाबतची काळजी आवश्यक आहे. एखादी व्यक्ती आत्महत्येबाबत बोलत असेल किंवा कुणाजवळ व्यक्त होत असेल तर त्या व्यक्तीचे म्हणणे गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. नैराश्याचे चिन्ह ओळखणे आणि वेळीच हस्तक्षेप करणे महत्त्वाचे आहे. तर एखाद्या व्यक्तीच्या वागणुकीत बदल आढळल्यास त्याच्याशी मनमोकळा संवाद साधून त्याच्या मनात काही वाईट विचार तर नाहीत ना याची विचारणा करायला हवी.

मानसोपचार तज्ज्ञांच्या मते अनेकदा असे दिसून येते की, त्या व्यक्तीला त्याच्याबद्दल सहानुभूती प्रेम असणाऱ्याची गरज असते. ज्याच्याजवळ तो मनमोकळा संवाद साधू शकतो. स्वाभाविकच संवादातून मार्ग निघून आत्महत्या टळल्याची अनेक उदारणे आहेत. मुळात आत्महत्येसारखा वाईट विचार मनात आल्यानंतर संवादाच्या अभावाने त्याचे कृतीत रूपांतर होत असल्याचे तज्ज्ञांचे निरीक्षण आहे. भारतीय संस्कृतीत कुटुंब हे संवादाचे सर्वांत सशक्त माध्यम म्हटले जाते. पण गत काही वर्षांमध्ये ढासळत असलेल्या कुटुंब व्यवस्थेमुळे अनेक गंभीर समस्या समोर येत आहेत. संयुक्त कुटुंब पद्धतीत एकाच घरात समवयस्क असलेली ८-१० मुले-मुली यांचे बहीण-भावाचे घट्ट नाते तर असायचेच त्यापेक्षाही अधिक त्यांची मैत्री असायची. दुर्दैवाने ही व्यवस्था कमकुवत झाल्याने नात्यातील घट्टपणा आणि मैत्रीतील ओलावा या दोन्हीही बाबींना आज ही पिढी मुकली आहे.

स्वाभाविकच कुटुंबातच होणारा मोकळा मैत्रीपूर्ण संवाद देखील थांबला. समाजात देखील सतत वाढत असलेल्या स्पर्धेतून आणि भौतिक सुखाच्या हव्यासातून निरपेक्ष मित्रांची संख्या कमी होत असल्याचे चित्र आहे. म्हणूनच विविध समस्या बळावत आहेत. ज्या दिवशी कुटुंबातील संवाद वाढेल, निरपेक्ष प्रेम करणाऱ्या मित्रांची संख्या वाढेल त्या दिवशी आत्महत्येसारखा वाईट विचार कुणाच्याही मनाला शिवणार नाही.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

# लालूप्रसाद पुन्हा राजदचे राष्ट्रीय अध्यक्ष

**श्यामकांत जहागीरदार**

बिहारचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री आणि राष्ट्रीय जनता दलाचे सर्वेसर्वा लालूप्रसाद यादव यांची राजदच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी तेराव्यांदा अविरोध निवड झाली. हा एक विक्रम म्हटला पाहिजे. लालूप्रसादांनी राजकारणात असे अनेक विक्रम केले आहेत. चारा घोटाळ्यात तुरुंगात जायची वेळ आल्यावर पत्नी राबडीदेवींच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ घालणे, हा असाच एक विक्रम होता. १९९७ मध्ये लालूप्रसादांनी जनता दलातून बाहेर पडत राष्ट्रीय जनता दलाची स्थापना केली. तेव्हापासून म्हणजे तब्बल २८ वर्षांपासून राजदचे अध्यक्षपद त्यांच्याकडेच आहे. घराणेशाही असलेल्या पक्षात यापेक्षा वेगळे काही होणे अपेक्षितही नसते.

५ जुलैला पाटण्यात होणाऱ्या राजद राष्ट्रीय परिषदेच्या अधिवेशनात ७८ वर्षीय लालूप्रसाद अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारणार आहेत. यावर्षाअखेर बिहार विधानसभेची निवडणूक होणार असल्यामुळे या निवडीला महत्त्व आले आहे. राजदच्या नावातील पहिले अक्षर राष्ट्रीय असले, तरी तो पूर्णपणे प्रादेशिक पक्ष आहे. बिहार आणि काही प्रमाणात झारखंडमध्ये या पक्षाचे अस्तित्व आहे. लालूप्रसाद म्हटले की, सर्वांना बिहारमधील बहुचर्चित चारा घोटाळ्याची आठवण येते. चारा घोटाळ्यात लालूप्रसादांना तुरुंगवासाची शिक्षा झाली आहे. सध्या ते प्रकृतीच्या कारणावरून जामिनावर बाहेर आहेत. गेल्या काही महिन्यांपासून लालूप्रसाद यांचे कुटुंब वेगवेगळ्या कारणांनी चर्चेत आहे. लालूप्रसादांनी आपले ज्येष्ठ पुत्र तेजप्रताप यादव यांची पक्षविरोधी कारवाया केल्याच्या आरोपावरून पक्षातून आणि कुटुंबातूनही हकालपट्टी केली. आता तेजप्रताप यादव आपल्या जिवाला धोका असल्याचा आरोप करीत आहेत. तेजप्रतापांचा इशारा लालूप्रसाद आणि तेजस्वी यादव यांच्या काही निकटवर्तीयांवर आहे. बिहार विधानसभा निवडणुकीसाठी राजदने तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केले आहे. त्यामुळे पक्षातील सतासंतुलन राखण्यासाठी तसेच तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रिपदावर विराजमान करण्यासाठी लालूप्रसादांनी पुन्हा एकदा पक्षाची सूत्रे आपल्याकडे घेतली आहेत. लालूप्रसादांची तब्येत आता पहिलेसारखी राहिलेली नाही. राजदच्या उमेदवारांचा प्रचार करण्यासाठी ते राज्यात किती दौरे करू शकतील, याबाबतही साशंकता आहे. तरीसुद्धा लालूप्रसादांनी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्षपद स्वतःकडे घेतले आहे, नव्हे त्यांना ते स्वतःकडे घ्यावे लागले. तसे केले नसते तर राजदमध्ये फूट पडण्याची शक्यता नाकारता येत नव्हती.

२५ जून १९७५ ला तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणिबाणी लागू केली होती. आणिबाणीत मिसाचा कायदा लागू करण्यात आला होता. आणिबाणीचे स्मरण म्हणून मिसा काळात झालेल्या आपल्या पहिल्या कन्येचे नाव लालूप्रसादांनी 'मिसादेवी' असे ठेवले होते. या मिसादेवी आता राज्यसभेच्या सदस्य आहेत. १९७५ मध्ये लागू झालेल्या आणिबाणीला नुकतीच ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. तेजस्वी यादवला राजदने पहिल्यांदाच मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केले असे नाही. याआधी २०२० च्या विधानसभा निवडणुकीतही राजदने तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केले होते. राजदच्या प्रचारात लालूप्रसाद यादव आणि त्यांच्या पत्नी तसेच राज्याच्या माजी मुख्यमंत्री राबडीदेवी यांची छायाचित्रे वापरण्यात आली होती. निवडणुकीच्या प्रचारात भाजपा आणि जनता दल संयुक्तने लालू आणि राबडीदेवी यांच्या भ्रष्टाचाराचा मुद्दा उपस्थित करीत तेजस्वी यादववर जोरदार हल्ला चढवला होता. हा मुद्दा आपल्याला अडचणीत आणणार, हे लक्षात आल्यानंतर तेजस्वी यादव यांना प्रचारातून लालूप्रसाद आणि राबडीदेवी यांची छायाचित्रे हटवण्याचा निर्णय घ्यावा लागला होता. मात्र त्याचा काही फायदा झाला नाही. राजदला निवडणुकीत बहुमत मिळाले नाही आणि मुख्यमंत्रिपदाने तेजस्वी यादव यांना पुन्हा हुलकावणी दिली. बिहारचे राजकारण देशात सर्वांत बेभरवशाचे आहे. येथील राजकारणात मित्र आणि शत्रू यांची समीकरणे इतक्या वेगात बदलतात की, लोकांना विचार करायलाही वेळ मिळत नाही. बिहारमध्ये सर्वाधिक वेळा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतलेल्या नितीशकुमार यांनी एकदा नाही तर दोनदा भाजपाची साथ सोडून राजदसोबत आघाडी करत राज्यात सरकार स्थापन केले होते. या सरकारमध्ये नितीशकुमार मुख्यमंत्री तर तेजस्वी यादव उपमुख्यमंत्री झाले होते. मानसिक आरोग्य चांगले नसलेले लालूप्रसादांचे दुसरे पुत्र तेजप्रताप यादवही या मंत्रिमंडळात आरोग्यमंत्री होते.

त्यावेळी बिहारच्या राजकारणात ही चाचा-भतिजाची जोडी खूप चर्चेत होती. नितीशकुमार यांना राष्ट्रीय राजकारणात जाण्याची आणि पंतप्रधान होण्याची स्वप्नेही पडू लागली होती. बिहारच्या राजकारणातून बाहेर पडत राष्ट्रीय राजकारणात जाण्याची आणि तेजस्वी यादव यांच्या हातात बिहारची सूत्रे देण्याची घोषणाही नितीशकुमार यांनी तेव्हा करून टाकली होती. त्यावेळी या घोषणेला जदयुतूनच विरोध झाला होता. शरद पवारांच्या राजकारणासारखे बिहारमध्ये नितीशकुमारांचे आहे. त्यामुळे तेजस्वी यादवला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करून काही महिने होत नाही, तोच नितीशकुमार यांनी कोलांटउडी मारत राजदला सत्तेपासून वंचित केले आणि भाजपाच्या पाठिंब्याने राज्यात पुन्हा सरकार स्थापन केले. नितीशकुमारांनी धोका दिल्यामुळे लालूप्रसाद संतप्त झाले. यावेळी काही झाले तरी तेजस्वीला मुख्यमंत्री करण्याच्या निर्धाराने नव्या दमाने राजकारणात सक्रिय होण्याचा निर्णय त्यांनी घेतला आणि त्यासाठीच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्षपद स्वतःकडे घेतले. तेराव्यांदा पक्षाचे अध्यक्ष झाल्यामुळे राजदच्या अध्यक्षपदाची तेरवी लालूप्रसादांकडे आली, असे म्हणायला हरकत नाही. आता लालूप्रसाद बिहारच्या राजकारणात काही चमत्कार करू शकतील का, तेजस्वीला मुख्यमंत्रिपदावर बसवू शकतील का? या प्रश्नांच्या उत्तरासाठी आपल्याला आधी बिहार विधानसभेची निवडणूक होऊ द्यावी लागेल.

बिहार विधानसभेची निवडणूक भाजपा नितीशकुमार यांच्या संयुक्त जनता दलासोबत लढवणार आहे. चिराग पासवान यांचा जनशक्ती पक्षही रालोआसोबत आहे. दुसरीकडे राजद आणि काँग्रेस आघाडी निवडणुकीच्या रिंगणात राहणार आहे. एकेकाळी बिहारच्याच नाही तर राष्ट्रीय राजकारणातही लालूप्रसादांचा प्रभाव होता. डॉ. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वातील संपुआच्या पहिल्या मंत्रिमंडळात पाच वर्षे त्यांनी रेल्वेमंत्रिपद भूषविले होते. पण आता राष्ट्रीय राजकारणातून लालूप्रसादांचा प्रभाव पूर्णपणे ओसरला असला, तरी बिहारच्या राजकारणात तो काही प्रमाणात कायम आहे. त्यामुळे आपली परंपरागत व्होट बँक असलेल्या मुस्लिम आणि यादव समाजाला संदेश देण्यासाठी तसेच तेजस्वी यादवच्या बाजूने वातावरण निर्मिती करण्यासाठी लालूप्रसादांनी स्वतःची शारीरिक आणि मानसिक स्थिती चांगली नसतानाही राजदचे राष्ट्रीय अध्यक्षपद स्वतःकडे घेतले आहे. याचा कितपत परिणाम होतो, हे विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतरच स्पष्ट होणार आहे.

९८८१७१७८१७

### हिट ॲण्ड रन : नागपुरातील लोकांना झाले तरी काय?

नुकतेच वृत्तपत्रामध्ये वाचण्यात आले की, काही दिवसांपूर्वी रात्री सुभाषनगर जवळील श्री गजानन महाराज मंदिराजवळ एका एक काळ्या रंगाच्या कारने मजुराला चिरडले. कारचालक फरार. पोलिस तपास सुरू आहे. असाच एक प्रसंग सुमारे दोन महिन्यांपूर्वी प्रतापनगर दुर्गा मंदिराजवळ, मेन रोडवर भर दिवसा घडला. स्कूटरने जाणाऱ्या एका वयस्कर महिलेला कारचालकाने धडक दिली आणि पळून गेला. खरे तर हा रहरदरीचा रस्ता, परंतु बघे बघतच राहिले. असंवेदनशीलता, दुसरे काय? तिचे मेजर ऑपरेशन करावे लागले. सीसीटीव्ही फुटेज अजूनही मिळत नाही. या रस्त्यावरील बहुतांश दुकानात सीसीटीव्ही आहेत. कशातच घटना कैद होत नाही. पोलिस तरी काय करणार? एखादा माणूस हेल्मेट घालून नसला की कसे सीसीटीव्हीमध्ये येते आणि अशा घटनांच्या वेळी मात्र सीसीटीव्ही काहीच कामाचा नाही, हे कसे? तसेच नागपुरात सिग्नल तोडून पळणाऱ्यांनी उच्छाद मांडला आहे. कदाचित हीच मंडळी हिट ॲण्ड रनसाठी कारणीभूत असतील. या वाईट वृत्तीला आळा घातलाच पाहिजे. प्रत्येक चौकात ट्रॅफिक पोलिस नसणे हेही अतिशय गंभीर आहे. वरील दोन्ही हिट ॲण्ड रन प्रकरणामधील कार आणि चालक सापडलेच पाहिजे आणि या घटनांना आळा घालण्यासाठी जनआंदोलनाची गरज आहे.

**राजेंद्र बेनोडेकर**/८४२२०९९९२५

### आणिबाणीतील संघ स्वयंसेवकांचे योगदान

दि. २५ जूनच्या तरुण भारतात रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह हो. वे. शेषाद्री यांच्या विचारपुष्पात संघ स्वयंसेवक व त्यांच्या कुटुंबीयांच्या आणिबाणीतील योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. अटक न झालेले स्वयंसेवक व त्यांच्या कुटुंबीयांना त्याकाळात काम करताना अनेक अडचणी येत होत्या. अनेकजण त्यांना टाळत होते. अपमानही होत होता. भूमिगत काम करताना पैसाही खर्च करावा लागत असे. तसेच काही सरकारी कर्मचाऱ्यांनीही महत्त्वपूर्ण योगदान दिले. उदा. तत्कालीन डी. वाय. एस. पी. श्री द्रविड, मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. मारवाह या सर्वांच्या योगदानाचा आणिबाणीविरुद्ध लढ्यात महत्त्वपूर्ण वाटा आहे. निरपेक्ष देशभक्तीचे हे उदाहरण म्हणता येईल.

**डॉ. आनंद फडके**/९४२२१०८३८२

## वाचक पत्रे

### लाडकी बहीण योजनेतील आर्थिक अडथळे दूर व्हावे

महाराष्ट्रात गेल्या अकरा महिन्यांपासून लाडक्या बहिणींची चर्चा होत आहे. निमित्त होते राज्यातील विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची घोषणा. विधानसभा निवडणुकीआधी महायुतीने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची घोषणा केली आणि त्याची अंमलबजावणी सुरू केली. दर महिन्याला दीड हजार रुपये पात्र लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात जमाही होत आहेत. परंतु ऐन निवडणुकीच्या काळात दीड हजार रुपयांऐवजी २१०० रुपये देण्याची घोषणा महायुतीच्या नेत्यांनी केली, तर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी थेट तीन हजार रुपये लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात जमा करणार असे सांगितले. महाविकास आघाडीला लाडक्या बहिणींनी नाकारले. परंतु लाडक्या बहिणी महायुतीसाठी गेमचेंजर ठरल्या. राज्यात महायुतीला सत्ता स्थापनेचा बहुमान मिळाला. मात्र विधानसभा निवडणुकीत दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्याची वेळ आली तेव्हा कळले राज्याच्या तिजोरीत खडखडाट आहे. दीड हजार रुपये देणे शक्य नाही तर २१०० रुपये कुठून द्यायचे, असा प्रश्न महायुतीच्याच नेत्यांना सतावू लागला. मात्र लाडक्या बहिणींसमोर मान खाली घालण्याची वेळ आल्याचे समजताच कसेबसे दीड हजार रुपये बहिणींच्या बँक खात्यात जमा केले जात आहेत. परंतु कधीपर्यंत लाडक्या बहिणींना पैसे द्यायचे, सगळ्याचे सोंग आणता येते पण पैशाचे नाही, हे महायुतीच्या लक्षात येताच पैशांची पळवापळवी सुरू झाल्याचे दिसते.

जुलै २०२२ पासून लाडक्या बहिणींचा मुद्दा राजकारणाचा भाग झाला आहे. लाडकी बहीण योजना बंद करण्याची घोषणा केली गेली, तर राज्यातील महिला व विरोधकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल अन् योजना सुरूच ठेवायची झाली, तर पैशांची जमवाजमव कुठून करायची. धरलं तर चावतंय सोडलं तर पळतंय अशी बिकट अवस्था झाली आहे. अलिकडेच अजित पवार गटाचे नेते तसेच अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी २१०० रुपये पात्र महिलांना देणार असे कोणी म्हटले नाही, असा घूमजाव केला होता. राज्यात महायुतीचे सरकार सत्तेत आल्यापासून महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असा सामना रंगला आहे. सत्तेत कोणी असो, ज्यांच्या मतांवर निवडून आलो त्यांचे आपण काहीतरी देणे लागतो याचा विचार आतातरी सर्वपक्षीय नेत्यांनी करणे गरजेचे आहे.

**मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१**
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...

### छायाचित्रकार रामदास काटकर यांना वसुंधरा मित्र पुरस्कार जाहीर

**सोलापूर, दि. २५ जून-**

किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव गुरुवार (दि. २६) पासून सुरु होत आहेत. यंदाच्यावर्षीचा वसुंधरा मित्र पुरस्कार छायाचित्रकार रामदास काटकर यांना जाहीर झाला आहे. तसेच, प्रवीण तळे यांनाही वसुंधरा मित्र पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. शनिवारी (दि. २८) सकाळी ११ वाजता कुमठे येथील एमपीएम महाविद्यालयात पुरस्कार वितरण सोहळा होईल. यावेळी 'किर्लोस्कर' प्लान्टहेड संतोष गुमास्ते, इनोव्हेशन इंजिनिअर उमाकांत निखरे, संस्थेचे प्रमुख जयकुमार माने, चित्रपट महोत्सवाचे दिग्दर्शक वीरेंद्र चित्राव यांची प्रमुख उपस्थिती असेल. वन, पर्यावरण, वन्यजीव संवर्धन व संरक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी त्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्यकरणाऱ्यांना 'वसुंधरा सन्मान व वसुंधरा मित्र' पुरस्कार देऊन गौरविण्या येते. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप असते. या महोत्सवाची सुरवात गुरुवारी (दि. २६) गोपाळपूर येथील 'स्वेरी' महाविद्यालयात होणार आहे. याप्रसंगी संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे प्रमुख मानकरी शिवाजी महाराज मोरे यांना यावर्षीचा 'वसुंधरा सन्मान' पुरस्कार देऊन गौरविण्यात येईल. तसेच, अस्तित्व समाज विकास व संशोधन संस्थेस वसुंधरा मित्र पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.



### राजर्षि छत्रपती शाहू महाराज जयंती निमित्त आज पार्क चौकात समता दिंडी

**सोलापूर दि. २५ जून-**

राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांचा जन्मदिवस २६ जून हा प्रतिवर्षी ''सामाजिक न्याय दिन'' म्हणून साजरा करण्यात येतो. त्याअनुषंगाने सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालय सोलापूर यांच्या वतीने गुरुवार २६ जून रोजी सकाळी ९.०० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क चौक येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर कार्यक्रमात पोवाडे, पथनाट्य, संविधान जनजागृती इ. सादरीकरण करण्यात येणार आहे. राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर (पार्क) चौक येथून डफरीन चौक-जुना एम्प्लॉयमेंट चौक मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन सात रस्ता सोलापूर पर्यत समता दिंडीचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर समता दिडींमध्ये विदयार्थ्यांनी, सामाजिक संस्था व संघटना तसेच नागरिकांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सहायक आयुक्त समाज कल्याण सुलोचना सोनवणे यांनी केले आहे.

### मंगळवेढ्यात संजय गांधी विभागाचा कार्यभार कविता पुरी यांनी स्विकारला

**मंगळवेढा दि.२५ जून-**

मंगळवेढा तहसिलमधील संजय गांधी विभागात नव्याने सहाय्यक महसूल अधिकारी म्हणून कविता पुरी यांची नियुक्ती झाली असून त्यांनी नुकताच आपल्या पदाचा कार्यभार स्विकारला आहे. दरम्यान कार्यभार स्विकारल्यानंतर प्रसार माध्यमांशी बोलताना त्यांनी निराधार लोकांना आपण तत्परतेने न्याय देणार असल्याचे सांगितले. येथील सहाय्यक महसूल अधिकारी गुणवंत वाघमोडे यांची नुकतीच पंढरपूर येथे बदली झाल्याने त्यांना कार्यमुक्त करण्यात आले आहे. सोलापूर येथे करमणूक विभागात कार्यरत असलेल्या कविता पुरी यांची मंगळवेढा संजय गांधी विभागाकडे बदली झाली आहे. त्या मुळच्या सोलापूरच्या असून २००७ मध्ये त्यांची निवड मंडळामार्फत शासकीय सेवेत नियुक्ती झाली आहे. आत्तापर्यंत त्यांनी माढा,करमाळा, उत्तर सोलापूर आदी ठिकाणी उत्तमरित्या सेवा बजावली आहे.



### सोलापूर विद्यापीठात अंमली पदार्थ विरोधी जागरूकता कार्यशाळा

**सोलापूर, दि. २५ जून-**

सायबर क्राईम पोलीस स्टेशन, पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर तर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर येथे एनसीसी कॅडेट्ससाठी सायबर गुन्हे जागरूकता प्रशिक्षण आणि अंमली पदार्थ विरोधी जागरूकता कार्यशाळा यशस्वीरित्या पार पडली. सायबर क्राईम पोलीस स्टेशन सोलापूर शहरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीशैल गजा, हवालदार मच्छिंद्र राठोड, पी.सी. अश्विनी लोणी, सचिन अंबालगी आणि सायबर तज्ञ अविनाश पाटील यांनी १०००+ एनसीसी कॅडेट्सना (मुले आणि मुली) संबोधित केले. या सत्रांमध्ये सुरक्षित डिजिटल सवयींना चालना देणे आणि तरुण कॅडेट्सना जागरूक, सायबर-जागरूक नागरिक बनण्यासाठी सक्षम बनविणे यावर लक्ष केंद्रित केले गेले.

# सावधान! पुढे धोका आहे...

# डीपीला सुरक्षा देणारे लोखंडी अँगल्सच असुरक्षित

## नागरिकांच्या सुरक्षेसाठी निर्माण केलेले लोखंडी अँगल ठरतायत मृत्यूचा सापळा

## महावितरणने शहरातील प्रत्येक डीपी आणि ट्रान्सफॉर्मर भोवती केले होते लोखंडी अँगलचे सुरक्षाकवच; मात्र निकृष्ट दर्जाच्या कामामुळे पितळ पडले उघडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ जून-**

महावितरण कंपनीच्या वतीने शहरातील विविध डीपी आणि ट्रान्सफॉर्मर यांच्या सुरक्षेसाठी गेल्या काही दिवसांपूर्वी लोखंडी अँगलचे सुरक्षा कवच बनवण्यात आले होते. मात्र काहीच दिवसानंतर हेच लोखंडी सुरक्षा कवच असुरक्षित झालेले दिसत आहे. शहरातील व्हीआयपी रोडवरील पटवर्धन चौक येथिल डीपी आणि ट्रान्सफॉर्मर भोवती असलेल्या लोखंडी अँगलचा पुरता बोजवारा उडालेला आहे. येथील लोखंडी अँगलचे फाउंडेशन निकृष्ट दर्जाचा बनवण्यात आल्याने, सदरचे पिवळ्या रंगाचे लोखंडी अँगल उखडून निघालेले दिसत आहेत. हे अँगल कधी आणि केव्हा ते येणाऱ्या जाणाऱ्या व्यक्तींच्या अंगावर पडतील याचा काही नेम नाही.



**महावितरण कंपनीने उभारलेले लोखंडी अँगलचे सुरक्षाकवच तुटून पडण्याच्या स्थितीत आले असून याकडे महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांचे व ठेकेदारांचे दुर्लक्ष होत आहे.**

दरम्यान,उत्सवप्रिय म्हणून ओळखले जाणाऱ्या सोलापूर शहरांमध्ये विजेचा धक्का लागून मृत्युमुखी पडलेल्या अनेक घटना गेल्या काही वर्षांमध्ये घडल्या होत्या. विविध जयंती उत्सवामध्ये तसेच काही कारणास्तव रस्त्यालगत असणाऱ्या डीपी आणि ट्रान्सफॉर्मर याला स्पर्श झाल्याने आबालवृद्धसह अनेकांचा दुर्देवी मृत्यू झाला. नागरिकांनी याचे खापर महावितरण प्रशासनावर फोडले होते. शहरात अशा घटना वारंवार घडत गेल्याने अखेर महावितरणाने शहरातील विविध डीपी आणि ट्रान्सफॉर्मर ज्या ज्या ठिकाणी उभारले गेले आहेत. त्या त्या ठिकाणी लोखंडी अँगलचे सुरक्षा कवच बनवण्याचे काम काज गेल्या वर्षात हाती घेण्यात आले. मात्र या सुरक्षा कावचला घरघर लागलेली आहे. निकृष्ट दर्जाचे बांधकाम आणि फाउंडेशन केल्याने उभारण्यात आलेली लोखंडी अँगल कधी जमीन दोस्त होतील, हे सांगता येत नाही. अशा परिस्थितीत पुन्हा एकदा नागरिकांचा तसेच वाहनधारकांचा जीव धोक्यात आलेला आहे.

महावितरण कंपनीने शहरातील डीपी आणि ट्रान्सफॉर्मर भवती सुरक्षा कवच बनवण्याचे टेंडर मक्तेदाराला दिले. परंतु मक्तेदाराने निकृष्ट पद्धतीचे काम केल्याचे समोर आलेले आहे. अनेक ठिकाणी फाउंडेशन तसेच वीट बांधकामाची गुणवत्ता तपासली गेली नाही. त्याचे परिणाम या पद्धतीने आता समोर येताना दिसत आहेत. शहरातील काही लोखंडी अँगल अशा पद्धतीच्या सुमार कामामुळे जीविताला धोका निर्माण करणारे ठरत आहेत. सदरची बाब गंभीर असून याकडे महावितरण कंपनीने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे बनले आहे. अन्यथा पुन्हा एकदा निष्पाप जीवाचा बळी गेल्याशिवाय राहणार नाही. असा सूर आता स्थानिक नागरिकांमधून आणि वाहनधारकांमधून उमटताना दिसत आहे.

#### महावितरणच्या अधीक्षक अभियंता यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही

महावितरणचे अधीक्षक अभियंता सुनील माने यांच्याशी या संदर्भात दूरध्वनीवरून संपर्क साधला असता, त्यांनी संपर्क साधला नाही. त्यामुळे या गंभीर प्रश्नावर उपाययोजनात्मक कार्य करणे आवश्यक बनले आहे.

#### या प्रकरणी महावितरण कंपनीने लोखंडी अँगलचे केलेले काम निकृष्ट दर्जाचे

सरकारने महावितरण कंपनी स्थापित करून खाजगीकरण केले आहे. या कामावरून दिसून येते की, सदरचे सुरक्षा कवचचे काम मक्तेदाराने निकृष्ट पद्धतीने केले आहे. शहरातील अशा विविध लोखंडी सुरक्षा कवचची पाहणी करणे गरजेचे आहे. बांधकामाची तसेच फाउंडेशनची गुणवत्ता सुधारणे आवश्यक आहे. अन्यथा दुर्दैवी घटना पुन्हा एकदा घडू शकते. यासाठी महावितरण कंपनी तसेच प्रशासनाने लक्ष द्यावे.

**-देविदास गायकवाड, अध्यक्ष डी ब्लॉक काँग्रेस कमिटी**

# सोलापुरात भाजपला धक्का

## शोभा बनशेट्टी यांचा एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश

**सोलापूर, दि. २५ जून-**

सोलापूरच्या राजकारणात आणखी एक मोठी बातमी समोर आली असून भारतीय जनता पार्टीला धक्का देत माजी महापौर शोभा बनशेट्टी यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. बुधवारी सायंकाळी मुंबईमध्ये हा प्रवेश झाला.



यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बनशेट्टी परिवाराचे स्वागत केले. नुकतेच शिवसेनेत दाखल झालेले माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, आमदार नारायण पाटील, लोकसभा संपर्कप्रमुख महेश साठे, महिला आघाडीच्या नेत्या अनिता माळगे, प्रियांका परांडे, श्रीशैल बनशेट्टी यांची प्रमुख उपस्थिती होती विशेष म्हणजे या प्रवेशावेळी काँग्रेसचे नेते अशोक निम्बर्गी यांची उपस्थिती चर्चेचा विषय ठरत आहे.

भारतीय जनता पार्टी कडून महापौर राहिलेल्या शोभा बनशेट्टी यांनी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टी कडून शहर उत्तर मध्ये उमेदवारी मागितली होती परंतु पक्षाने पुन्हा विजयकुमार देशमुख यांना उमेदवारी दिल्याने त्यांनी बंडखोरी केली तेव्हापासून त्या राजकारणातून लांब दिसून आल्या. दरम्यान अचानक त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केल्याने अनेकांना जोरदार धक्का दिला आहे. या प्रवेशात माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, जिल्हा महिला आघाडीच्या अनिता माळगे यांचा वाटा असल्याचे बोलले जाते.

# अक्कलकोटला आज काँग्रेस कार्यकर्त्यांचा मेळावा

■ **सुशीलकुमार व प्रणिती शिंदेसह खासदार विशाल पाटील, सतेज पाटील यांची उपस्थिती**

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि.२५ जून**

अक्कलकोट तालुक्यातील राजकीय उलथापालथीनंतर गुरुवार २६ जून रोजी दुपारी एक वाजता प्रियदर्शनी सांस्कृतिक सभागृहात काँग्रेस कार्यकर्त्यांचा भव्य मेळावा आयोजित केला असून या मेळाव्यास माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, खासदार प्रणिती शिंदे, माजी मंत्री सतेज पाटील, खासदार विशाल पाटील उपस्थित राहणार असल्याची माहिती काँग्रेसचे तालुकाध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील यांनी दिली.



तालुक्यात काँग्रेस पक्षाला दीर्घ परंपरा लाभली असून हा पक्ष पुन्हा एकदा वैभवाकडे वाटचाल करणार असून या मेळाव्यातून काँग्रेसची एकसंध ताकद जनतेसमोर उभी राहण्यासाठी मागील दहा बारा दिवसापासून गावभेट दौरा कार्यकर्त्यांत चैतन्य निर्माण होण्यासाठी श्री. पाटील यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्यावतीने राबवला गेला आहे. या दौऱ्याच्या माध्यमातून कार्यकर्त्यांशी आणि जनतेशी थेट संवाद साधला गेला आहे. येत्या काही महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार असल्याने काँग्रेसची पुढील भूमिका काय असणार याची घोषणा या मेळाव्यात होण्याची शक्यता आहे. नवीन कार्यकर्त्यांना संधी मिळाल्यानंतर श्री. पाटील हे मोठे शक्तिप्रदर्शन करणार आहेत .या मेळाव्यास काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष अँड.नंदकुमार पवार, सोलापूर शहराध्यक्ष चेतन नरोटे, काँग्रेस नेते अश्पाक बळोरगी, माजी नगराध्यक्ष डॉ. सुवर्णा मलगोंडा, सातलिंग शटगार, अरुण जाधव आदी उपस्थित राहणार आहेत.

# सोलापूर विद्यापीठाच्या प्रतीक उग्राल यास भारत सरकारचे दोन लाखांचे पारितोषिक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जून-**

भारत सरकारच्या (MOSP) Statistics and Programme Implemenetation या मंत्रालयातर्फे घेण्यात आलेल्या Data Visualisation Hackathon या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या संगणकशास्त्र संकुलातील संख्याशास्त्र अधिविभागाचा प्रतीक राजेश उग्राल हा विद्यार्थी प्रथम आला आहे. या स्पर्धेसाठी देशातील विविध नामांकित संस्थेतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या या स्पर्धेमध्ये सहभागींनी नॅशनल सॅम्पल सर्वे ऑर्गनायझेशन (NSSO) सारख्या राष्ट्रीय संस्थांनी गोळा केलेल्या डेटाचे संख्याशास्त्रीय विश्लेषण करून सुलभ आकलनासाठी सदरचा डेटा चित्ररूपात सादर करावयाचा होता. प्रतीक उग्राल या विद्यार्थ्याने



महागाईचा कल (Inflation Trends) संख्याशास्त्रीय पद्धतीने अभ्यास करून यावरील सादरीकरण मंत्रालयाला पाठविले होते. प्रतीकच्या सादरीकरणाला प्रथम क्रमांक मिळाला असून बक्षिसाचे स्वरूप प्रमाणपत्र व दोन लाख रुपये असे आहे. या सादरीकरणासाठी प्रतीकला संख्याशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापक चंद्रकांत गार्डी, ख़ुशी खडलोया, निकिता गाटे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यापीठाचे मा.कुलगुरु प्रा. प्रकाश महानवर, मा. प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे तसेच संगणकशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. राजीवकुमार मेंते, डॉ. ज्योती माशाळे, डॉ. अशोक शिंदे, डॉ. श्रीराम राऊत, प्रा. विकास घुटे यांनी प्रतीकचे अभिनंदन केले.

**मध्य रेल्वे**
**खुली निविदा सूचना**

**खुली निविदा सूचना क्रमांक : KWV-PO-BG-WW-SS-1 दिनांक : 18/06/2024. कामाचे नाव :** ०१ वर्षासाठी एसएस वॅगनमधील वॅगनच्या वेल्डिंग आणि गॅस कटिंगच्या कामाचे आउटसोर्सिंगचे काम. **अंदाजे किंमत :** रु. 6908000/-. **निविदा फॉर्मची किंमत (रु.) :** शून्य. ईएमडी (रु.) 138200/-. **पूर्ण कालावधी :** 12 महिने. वरील ई-निविदा सादर करण्याची वेळ आणि तारीख **12/07/2025** रोजी **दुपारी 2 वाजेपर्यंत असेल.** ई-निविदेचा संपूर्ण तपशील रेल्वेच्या अधिकृत वेबसाइट **http://www.ireps.gov.in** वर उपलब्ध आहे. APEX-194

रेल्वे फाटक को बंध स्थिति में पार करना मना है

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-टेंडर सूचना**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, मध्य रेल्वे, सोलापूर येथील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, जनरल, खालील कामांसाठी रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट **www.ireps.gov.in** वर प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. **निविदा क्रमांक:** SUR/L/T/2025/08 **कामाचे नाव:** सोलापूर विभागातील ताज सुलतानपूर रेल्वे स्थानकावरील प्रसारित क्षेत्र, पिण्याच्या पाण्याची सुविधा, सीजीएस रूम, व्यापारी कक्ष, हमाल कक्ष, टॉलेटसह स्टोअर रूम, अॅप्रोच रोड, ओएच/यूजी टँक, विद्यमान सीओपीमध्ये सुधारणा यांच्या विकासाशी संबंधित कामाचा विद्युत सामान्य सेवा भाग. **अंदाजे किंमत:** 47,38,674.58 **बोली सुरक्षा:** रु.94,800.00 **पूर्णता: ऑफरची** 12 **महिने वैधता:** 60 दिवसांची **तारीख आणि वेबसाइटवर निविदा बंद होण्याची वेळ:** 18/07/2025 15.00 वाजता. बिड सुरक्षा खर्च **www.ireps.gov.in** वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे भरला जाईल.

**वरिष्ठ विभागीय निवडक. अभियंता (सामान्य)**
Apex-61 **मध्य रेल्वे, सोलापूर**

अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-टेंडर सूचना**

**निविदा सूचना क्रमांक GEM/2025/B/6349464**
**दिनांक 23/06/2025**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने डीआरएम(M)'s चे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून सीलबंद निविदा मागवत आहे. **कामाचे नाव त्याच्या परिसरासह:** सोलापूर विभागात डेपो तपासणी, साइडिंग तपासणी आणि ब्रेकडाउन/असामान्य डेरेलमेंटसाठी एडीएमई/एसयूआर साठी नॉन-एसी एसयूव्ही भाड्याने घेण्याचे कंत्राट काम ज्याचे मासिक धावणे 2000 किमी आहे. **निविदा प्रणाली:** सिंगल पॅकेट सिस्टम. **कामाची अंदाजे किंमत:** रु. 10,32,000/- **निविदा फॉर्मची किंमत:** एनआयआय **निविदा फॉर्म जिथून खरेदी करता येईल त्या कार्यालयाचा पत्ता:** डीआरएम(M)'s चे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर. **जमा करावयाची बक्षीस रक्कम:** रु. 20,640/- **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** काम सुरू झाल्यापासून दोन वर्षे. **निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ:** 14.07.2025 दुपारी 4.00 वाजता. **निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ:** 14/07/2025 दुपारी 4.30 वाजता. **वेबसाइट तपशील आणि सूचना फलक असलेले ठिकाण जिथे निविदाची संपूर्ण माहिती पाहता येईल.:** WWW.GeM.gov.in

Apex-60 **सीनियर डीएमई/सोलापूर**

अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दि.कि.अ.नं. ७१/२०२४
पुढील नेमली ता.११/७/२०२५
नि-२७

**बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधिश सो.क. स्तर यांचे न्यायालयात**

**सुधाकर वसंत उर्फ उत्तम भोसले,** वगैरे - **अर्जदार**
**विरुध्द**
**दयानंद वसंत भोसले,** वगैरे - **सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदार सा.वाला यांचे एकाच घराण्याचे असून त्यांचे पुर्वहक्कदार बोधला गेनू भोसले हे ता. २६/१/१९७४, सुंदराबाई बोधला भोसले या दि.२८/०३/१९५३ रोजी, चांगदेव चोधला भोसले हे दि. २३/०८/१९४५ रोजी, शेंवताबाई चांगदेव भोसले या दि२३/३/१९७६ रोजी, सुखदेव बोधला भोसले हे ता. २६/७/१९९८ रोजी, बचाबाई सुखदेव भोसले या दि. २५/०३/१९८५ रोजी, व वसंत उर्फ उत्तम चांगदेव भोसले हे २४/१/२०२१ रोजी मयत झालेले आहेत यातील अर्जदार सा.वाला हे त्याचे कायदेशीर वारस असून अर्जदार व सा.वाला यांना त्यांचे कायदेशीर अडचणीचे निवारणा करीता वारस हेअरशिप प्रमाणपत्राची गरज भासली असे कथन करुन अर्जदारानी ते वर नमूद मयताचे वारस/हेअरशिप प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज आणलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने, कथनांसंबंधाने वा अन्य कोणाचे कांही कायदेशीर हक्क हितसंबंध, आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस संबंधीतानी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमले मे. कोर्टात स्वतः वा माहितगार अॅडव्होकेट मार्फत हजर होवून आपले म्हणणे, हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचेही तक्रारी, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे पुढील योग्य ते हुकूम होतील. हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे तारीख ३१/५/२०२५.

सही/- वरिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय क. स्तर, बार्शी
कोर्टाचा शिक्का
सही/- सहा.अधिक्षक, दिवाणी न्यायालय क.स्तर, बार्शी

**जाहीर घोषणा**

तमाम लोकांना विशेषतः मौजे चिंचगांव, ता. माढा जि.सोलापूर येथील व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर घोषणेव्दारे कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन :** डि|| सोलापूर सब डि|| व ता. माढा पैकी मौजे चिंचगांव ता. माढा येथील जमीन गट नं. ४९ यांसी क्षेत्र २१ हे. ३० आर, पो.ख ०४ हे. १०, असे एकुण २५ हे. ४० आर, आकार ०३ रु. ३० पैसे ही मिळकत समस्त कामगार रखवालदार या नावाने असुन ती मिळकत ही भोगवटदार वर्ग २ ची अशी आहे. तथापि, सदरची मिळकत ही सर्जेराव तुकाराम माने (बेरड), निवृत्ती बापु माने (बेरड), बाबा बापु माने (बेरड), मनोहर बापु माने (बेरड), शामराव बापु माने (बेरड), तंगु दत्ता चव्हाण, छबाबाई दत्ता चव्हाण हे इसम सदरची मिळकत सध्या वहिवाटीत असुन सदरची मिळकतीमध्ये असणारे समस्त कामगार रखवालदार हे नाव कमी करुन सदर सर्जेराव तुकाराम माने (बेरड), निवृत्ती बापु माने (बेरड), बाबा बापु माने (बेरड), मनोहर बापु माने (बेरड), शामराव बापु माने (बेरड), तंगु दत्ता चव्हाण, छबाबाई दत्ता चव्हाण यांचे नाव कब्जेदार सदरी व्हावे म्हणून सदर सर्जेराव तुकाराम माने यांनी तहसिलदार साहेब तहसिल कार्यालय, माढा ता. माढा, जि. सोलापूर यांचेकडे रितसर अर्ज/प्रस्ताव दाखल केलेला आहे. सदर प्रस्ताव चौकशीकामी मंडळ अधिकारी म्हैसगांव, तहसिल कार्यालय, माढा या कार्यालयांकडे प्रलंबित आहे. तथापि, वर नमुद मिळकतीबाबत सहधारक, लगतचे धारक किंवा अन्य कोणाचीही, कसलीही हरकत असल्यास ही जाहीर घोषणा प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसांचे आत आपली तक्रार ही लेखी व पुराव्याचे कागदपत्राव्दारे मे. उपविभागीय अधिकारी साहेब, माढा विभाग कुर्डुवाडी, मे. तहसिलदार साहेब माढा अथवा मे. जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्याकडे नोंदवाव्यात. जर वरिल मुदतीत कोणाचीही कसलीही लेखी हरकत अगर लेखी तक्रार आली नाही अथवा दाखल झाली नाही तर वर नमुद मिळकतीवरील कब्जे सदरी असलेले समस्त कामगार रखवालदार हे नांव कमी करुन सर्जेराव तुकाराम माने (बेरड), निवृत्ती बापु माने (बेरड), बाबा बापु माने (बेरड), मनोहर बापु माने (बेरड), शामराव बापु माने (बेरड), तंगु दत्ता चव्हाण, छबाबाई दत्ता चव्हाण यांची नांवे कब्जेदार सदरी दाखल होणेबाबतची पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी. मुदती नंतर येणाऱ्या हरकतीचा वा तक्रारीचा कोणताही विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**ही जाहीर घोषणा दिली. असे तारीख २६/०६/२०२५**

**सही/-**
**(अॅड अनुप बंडोपंत वस्त्रे)**
**बी.ए.एल.एल.बी. अॅडव्होकेट**
**श्रीराम नगर, माढा ता. माढा जि. सोलापूर**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

पुढील नेमलेली तारीख २४/०७/२०२५
दिवाणी किरकोळ अर्ज नं. ७२/२०२५
नि.५

**बार्शी येथील मे. अति. जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयात**

**चि. युवराज किसन डिडुळे, वय - १३ वर्षे**
धंदा शिक्षण, अ.पा.क. आजी **शांताबाई**
**महादेव डिडुळे, वय - ६७ वर्षे,**
धंदा शेती/घरकाम,/घरकाम,
रा. सुदर्शन नगर, गल्ली नंबर २, पिंपळे गुरव, पुणे शहर, पुणे — **अर्जदार**
**विरुध्द**
**महाराष्ट्र शासन** -- **सामनेवाला**

ज्या अर्थी अज्ञान अर्जदाराचे नावावरील डि. सोलापूर सब डि.व ता. करमाळा पैकी मौजे वडाचीवाडी येथील जमीन गट नं. ७३ पैकी अर्जदार नंबर १ शचे मालकीची संपूर्ण जमीन याचे क्षेत्र ०१ हे.१२ आर. आकार ०१ रु.७० पैसे यासी चतुः सिमा पुर्वेस - निलावती वाघ यांची जमीन, दक्षिणेस महादेव डिडुळे यांची जमीन, पश्चिमेस भिवराज बोबडे यांची जमीन, उत्तरेस - तुकाराम वाघ यांची जमीन येणेप्रमाणे चतुः सिमापुर्वक वर्णनाची बागायत जमीन आतील तद्ंगभुत वस्तुसह. येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत ही यातील अर्जदार यांनी यांना वहिवाटण्यास सोईच्या नसल्यामुळे सदरच्या मिळकती विक्रीस काढून त्याबाबत अर्जदाराचे अ.पा.क. आजी शांताबाई महादेव डिडुळे यांनी व्यवहार ठरवलेला आहे. तथापी, जमीन मालक हे अज्ञान असलेने सदर व्यवहारास मा. जिल्हा न्यायालयाची परवानगी आवश्यक आहे. सदर कृती योग्य असून व अज्ञानाचे हिताची आहे असे कथन करून अर्जदाराचे वतीने त्याचे पालनकर्ता आजी यांनी या मे. कोर्टात अज्ञानाची मिळकत विक्री करणेस परवाणगी मागणेचा अर्ज आणलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांच्या वरील मागणी, कथनांसंबंधाने कोणाचे काही हरकती, आक्षेप असल्यास वा सदर मिळकतीत अन्य कोणाचे काही हक्क अधिकार असलेस संबंधीतांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर पुढील नेमली तारखेस या मे. कोर्टात स्वतः अगर वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे, हरकती, तकारी सादर कराव्यात. मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास मा. न्यायालयाचे प्रकरणी पुढील यथायोग्य आदेश होतील. हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे राहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्यानिशी प्रसिध्दी केले असे. ता. २४/०६/२०२५

कोर्टाचा शिक्का
**सही/-**
**अधिक्षक जिल्हा न्यायालय, बार्शी**
**(अति.जि. व सत्र न्या. बार्शी)**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

कि. अर्ज ६७/२०२५
नि-५

**बार्शी येथील मे. सि. ज. ज्यु. डि. सो. यांचे कोर्टात**

**रमेश शिवलिंग आलमलकर,**
वयं - ८५ वर्षे, धंदा- कांही नाही,
रा. २४६०, अर्जदार खुरपे बोळ, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**
**विरुध्द**
**कोणी नाही** - **सा.वाला**

**अर्ज - मुंबई रेग्यूलेशन अॅक्ट VII of १८२७ प्रमाणे वारस दाखला मिळणेबाबत -**

ज्या अर्थी, यातील अर्जदार याचा सख्खा भाऊ शामुलिंग शिवलिंग अलमलकर हा अविवाहीत होता. तो दि.१३/०२/९८ रोजी बार्शी येथे मयत झालेला आहे. मयत शामुलिंग शिवलिंग अलमलकर यांना यातील अर्जदार हेच जवळचे व कायदेशीर वारस आहेत. सदर कामातील अर्जदाराचे शिवाय मयत शामुलिंग शिवलिंग अलमलकर यांना जवळचे दुसरे कोणीही कायदेशीर वारस नव्हते व नाहीत. मयत शामूलिंग शिवलिंग अलमलकर याचे नांवे समाईकांत अ) याचा सि.स.नं. २४६०/ब याचे क्षेत्रफळ ११.९० चौ.मी. आहे. ब) याचा सि.स.नं. २४६०/क याचे क्षेत्रफळ २६.५० चौ.मी. आहे. क) याचा सि.स.नं. २४६०/ड यांचे क्षेत्रफळ १३.३० चौ.मी. आहे. सदरहू तिन्ही जागा एकास एक लगत असून याचे क्षेत्रीत क्षेत्रफळ ५७.७० चौ.मी. आहे. ही घरजागा मिळकत आहे. यातील अर्जदार यांची सदर मिळकतीचे रेकॉर्डला मयत शामुलिग शिवलिंग अलमलकर यांचे पश्चात रेकॉर्डला वारस हक्काने नोंद होणेसाठी अर्जदार हे जवळचे कायदेशीर वारस (Legal heirs) आहेत असे जाहीर होवून त्याप्रमाणे अर्जदार यांचे नांवे (heriship Certificate) मिळणेसाठी अर्जदारांचा प्रस्तुतचा अर्ज आहे.

त्या अर्थी,सदर अर्जदार यांचे व्यतिरीक्त मयत शामुलिंग शिवलिंग अलमलकर यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता. ०४/०८/२०२५ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

कळावे हे प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सहीशिक्कयानिशी दिले. ता. २३/०६/२०२५.

कोर्टाचा शिक्का
**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर बार्शी**
**ता. बार्शी**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
https://epaper.dainiktarunbharat.com/

# पार्क स्टेडियम एमसीएला देण्यास उपसमिती बैठकीत शिक्कामोर्तब

## तिकीट विक्रीच्या नफ्यातील २० टक्के हिस्सा एमसीए महापालिकेला देणार; ॲडव्हेंचर पार्क, बाबा गाडी महिनाभरात होणार सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जून -**

इंदिरा गांधी स्टेडियम (पार्क) महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन ला एमसीए तीस वर्षाच्या मुदतीवर चालविण्यास देण्यास महापालिकेच्या उपसमिती बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आला आहे. ॲडव्हेंचर पार्क आणि हुतात्मा गार्डनसाठी मक्तेदार निश्चित करण्यात आले आहेत. महिनाभरात ॲडव्हेंचर पार्क सुरू होईल, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

सोलापूर स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत शहरात पार्क स्टेडियम,ॲडव्हेंचर पार्क विकसित करण्यात आले होते. दरम्यानच्या काळात या दुरुस्तीवर महापालिकेचा खर्च होत होता. पार्क स्टेडियम वर देखभाल दुरुस्तीसाठी मोठ्या प्रमाणात सोलापूर महापालिकेचा खर्च होत होता. यामध्ये महापालिकेला वर्षाला सुमारे ७० लाख रुपये तोटा सहन करावा लागत होता. दरम्यान, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनने पार्क स्टेडियम चालविण्यास देण्याच्या मागणीचा प्रस्ताव महापालिकेला सादर केला होता. त्यावर आजच्या महापालिकेच्या उपसमितीच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला. पार्क स्टेडियम चालविण्यासाठी एमसीएला देण्याचा निर्णय झाला आहे. वर्षाला एमसीए या स्टेडियमच्या देखभाल दुरुस्तीवर एक कोटीचा खर्च करणार आहे. तसेच महापालिकेला दरवर्षी एक लाख रुपये देणार आहे. पार्क स्टेडियम आणि जिम्नेशियम हे दोन्हीही एमसीए चालविणार आहे. तीस वर्षासाठी हा करार करण्यात येत आहे. त्याचबरोबर पार्क स्टेडियमवर व्यवसायिक मॅचेस झाल्यानंतर त्याच्या तिकीट विक्रीच्या नफ्यातील २० टक्के



हिस्सा एमसीए महापालिकेला देणार आहे. आवश्यक त्या सोयी सुविधाही एमसीए कडून पार्क स्टेडियमवर करण्यात येणार आहेत. पीसीएमसी च्या धरतीवर ही कार्यवाही केली आहे. नाईट मॅचेस सुरू करण्याचा एमसीएचा प्रयत्न राहणार आहे, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन कडून पार्क स्टेडियमवर प्रादेशिक प्रशिक्षण अकॅडमी सुरू करण्यात येणार आहे. यामुळे इतर जिल्ह्यातूनही खेळाडू येथे येतील. त्याचबरोबर स्थानिक खेळाडूंनाही मोठी सोय होणार आहे, असेही महापालिका आयुक्तांनी सांगितले. ॲडव्हेंचर पार्क, सिद्धेश्वर तलाव परिसरातील वॉकिंग ट्रॅक , बाबा गाडी याचाही मक्तेदार निश्चित करण्यात आला आहे. या ठिकाणी आवश्यक ती देखभाल दुरुस्ती आणि सोयी सुविधांचा खर्च मक्तेदाराकडून करण्यात येणार आहे. दरमहा ७५ हजार रुपये संबंधित मक्तेदार महापालिकेला देणार आहे. येत्या महिनाभरात ॲडव्हेंचर पार्क सुरू करण्यात येणार आहे. दिवाळीपर्यंत टप्प्याटप्प्याने हा संपूर्ण प्रकल्प लोकांसाठी उपलब्ध होणार आहे. हुतात्मा गार्डनचाही मक्तेदार निश्चित करण्यात आला असून या संपूर्ण परिसराची देखभाल दुरुस्तीचा खर्चही संबंधित मक्तेदार करणार आहे. या ठिकाणी अतिरिक्त खेळण्याचे साहित्य आणि इतर सोयी सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. साधारण साहित्य वापराकरिता कोणत्याही शुल्क लागणार नाही मात्र इतर व्यवसायिक खेळणी व साहित्याला शुल्क घेण्यात येईल. हुतात्मा गार्डन आणि ॲडव्हेंचर पार्कसाठी तीन वर्षाचा मक्ता देण्यात येत आहे, असेही आयुक्त यांनी सांगितले.

### स्मार्ट सिटी कामांच्या देखभाल दुरुस्तीसाठी नोडल अधिकारीपदी उपायुक्त आशिष लोकरे

सोलापूर शहरात स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत झालेल्या विविध विकास कामांच्या देखभाल दुरुस्तीसाठी नोडल अधिकारी म्हणून उपायुक्त आशिष लोकरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या संदर्भातली आवश्यक ती सर्व जबाबदारी उपायुक्त लोकरे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे, असेही महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले.

---

# आयडीयल स्कूलमध्ये ‘सेल्फ डिफेन्स‘चे धडे

■ **मुलांमुलींमध्ये आत्मविश्वासाची नवी ऊर्जा : नेताजी पवार**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ जून-**

येथील आयडीयल इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये विदयार्थी व विद्यार्थिनीसाठी प्रमुख मार्गदर्शक नेताजी पवार आणि त्यांच्या तज्ज्ञ टीमने एक दिवसीय सेल्फ डिफेन्स धडे दिले.

या कार्यशाळेचे उद्दिष्ट मुला-मुलींना आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी शारीरिक व मानसिक तयारी करून घेणे हे होते. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना विविध स्वसंरक्षण तंत्रे शिकवली. त्यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे



विद्यार्थ्यांना आत्मरक्षणाच्या महत्त्वपूर्ण गोष्टींचे प्रात्यक्षिक करून दाखवले. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व धाडस निर्माण झाले. श्री. पवार यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांनी स्वसंरक्षण तंत्रज्ञानाचे महत्त्व समजून घेऊन ते आत्मसात करण्याचे आवाहन केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सचिन चव्हाण व सचिवा ज्योती चव्हाण हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन क्रीडा शिक्षक रवींद्र चव्हाण व रविराज माने यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत व सत्कार मुख्याध्यापिका उर्मिला कटप यांच्या हस्ते करण्यात आले.

---

# विहान क्रिकेट क्लबची विजयी सलामी

■ **जे.टी. कुलकर्णी स्मृती करंडक शांभवी चषक क्रिकेट**

**सोलापूर, दि. २५ जून-**

राजवीर हिरेहब्बूच्या (६३ धावा, २ बळी) अष्टपैलू खेळामुळे विहान क्रिकेट क्लबने केपीसीसी संघाचा ३७ धावांनी पराभव करीत १४ वर्षांखालील शांभवी चषक क्रिकेट स्पर्धेची विजयी सलामी दिली. राजवीर सामन्याचा मानकरी ठरला.

शांभवी कन्स्ट्रक्शनने पुरस्कृत केलेली ही स्पर्धा सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे माजी खजिनदार व ज्येष्ठ क्रीडा पत्रकार जे. टी. कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ जुळे सोलापूर येथील भंडारी मैदानावर आयोजित केली आहे. बुधवारी झालेल्या सलामीच्या सामन्यात



विहान क्रिकेट क्लबने केपीसीए संघाचा ३७ धावांनी पराभव केला. विहान क्रिकेट क्लबने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना सर्व बाद १६५ धावा केल्या. त्यांच्या राजवीर हिरेहब्बू याने ६३ धावा केल्या. त्याला प्रतीक लांडगे १९ व प्रतीक डिग्गे याने १७ धावा करीत साथ दिली. केपीपीसीसी संघाकडून महेंद्र याने ३० धावात तीन, ओम साई याने २९ धावात दोन बळी टिपले. विजयी १६६ धावांचे लक्ष्य गाठणाऱ्या केपीसीसी संघाचा डाव १२८ धावांत आटोपला. त्यांच्या रुद्र हुले २४, अप्पू स्वामी १७ व अंसाकील याने १६ धावा केल्या. विहानकडून रणजीत लांडगेने ३१ धावांत व अर्णव लोखंडेने १० धावांत प्रत्येकी तीन बळी टिपले. हिरेहब्बूने २६ धावात व अथर्व हिरापुरे याने १४ धावात प्रत्येकी दोन गडी बाद केले.

---

### महत्त्वाचे

**भारतीय कनिष्ठ पुरुष हॉकी संघाला तिसरे स्थान**

**बर्लिन** : भारतीय कनिष्ठ पुरुष हॉकी संघाने बुधवारी येथे सुरू असलेल्या चार राष्ट्रांच्या हॉकी स्पर्धेत तिसऱ्या स्थानासाठीच्या लढतीत ऑस्ट्रेलियाचा २-१ असा पराभव केला व तिसरे स्थान मिळविले. रोहितने ४५ व्या मिनिटाला भारताला बरोबरी साधून दिली, तर अजित यादवने चौथ्या चरणात ५२ मिनिटाला गोल करून विजय निश्चित केला. त्याआधी, कर्णधार टोबी मॅलनने ऑस्ट्रेलियाला आघाडी मिळवून दिली होती. पहिल्या सत्रात दोन्ही संघांमध्ये चुरशीची लढाई झाली, सुरुवातीच्या दोन सत्रात दोन्ही संघांना गोल करण्यात यश आले नाही. दोन्ही बाजूंनी मजबूत बचावात्मक रचना आणि शिस्तबद्ध खेळामुळे गोल करण्याच्या संधींचे रूपांतर होऊ शकले नाही आणि तिसऱ्या सत्रातही गोलची बरोबरी झाली. ऑस्ट्रेलियाच्या टोबी मॅलनने ४० व्या मिनिटाला मैदानी गोल केला. ■

# झेल सोडणे, तळाची फळी कोसळणे महागात पडले : गिल

♦ **लीड्स, २५ जून**

भारताच्या कसोटी कर्णधार म्हणून आपल्या पहिल्याच सामन्यात शुभमन गिलला कठीण सुरुवातीचा सामना करावा लागला कारण त्याचा संघ इंग्लंडविरुद्ध हेडिंग्ले, लीड्स येथे ३७१ धावांचे मोठे लक्ष्य राखण्यात अपयशी ठरला.

भारतीय संघाने पाच शतके आणि सामन्यावर सुरुवातीला मजबूत नियंत्रण असूनही, इंग्लंडने उल्लेखनीय मुसंडी मारली, लक्ष्याचा यशस्वी पाठलाग केला व भारताला हृदयद्रावक पराभव पत्करावा लागला.

आपल्या आक्रमक बॅझबॉल



दृष्टिकोनासाठी ओळखल्या जाणाऱ्या इंग्लंडने पुन्हा एकदा चौथ्या डावात धावांचा यशस्वी पाठलाग करून आपली लवचिकता सिद्ध केली. इंग्लंडने तीन वर्षांत दुसऱ्यांदा भारताविरुद्ध ३७० पेक्षा अधिक धावसंख्येचा यशस्वीपणे पाठलाग केला, यावेळी गिलच्या कर्णधारपदाच्या पदार्पणातच इंग्लंडने खेळी केली.

या सामन्यात भारताने महत्त्वाच्या क्षणी अनेक झेल सोडले व सलग दोन तळाच्या फळीतील फलंदाजांनी आपला कामगिरी चोखपणे बजावली नाही. भारताच्या अव्वल फळीतील फलंदाजांनी लढाऊ कामगिरी केली, परंतु सर्वात महत्त्वाच्या क्षणी तळाची फळी कोसळली. याउलट, इंग्लंडच्या तळाच्या फळीने चांगली कामगिरी केली व संघाला लक्ष्य गाठून देण्यास मदत केली.

सामन्यानंतर बोलताना, गिलने संघाच्या प्रयत्नांची कबुली दिली परंतु त्यांना खेळाचे नुकसान करणाऱ्या क्षेत्रांकडे लक्ष वेधण्यास मागेपुढे पाहिले नाही. एका शानदार कसोटी सामन्यात भारताला विजयाची संधी होती. मात्र आम्ही झेल सोडले व आमच्या तळाच्या फळीने योगदान दिले नाही यामुळे आम्हाला पराभव पत्करावा लागला, असे गिल म्हणाला. आम्ही काल त्यांना ४३० धावा देण्याचा विचार करत होतो, परंतु आम्ही शेवटचे काही फलंदाज स्वस्तात गमावले. आजही, आम्ही चांगली सुरुवात केली, पण आमच्या मनाप्रमाणे झाली नाही. या अशा गोष्टी घडतात, परंतु आम्हाला त्यात सुधारणा करावी लागेल. पहिल्या डावातील घसरगुंडी हानीकारक असल्याचे गिलने मान्य केले. ◂(वृत्तसंस्था)

### बुमराह केवळ तीन सामन्यातच खेळेल

♦ **लीड्स, २५ जून**

भारत-इंग्लंड कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात पराभव झाला असला तरी भारतीय संघ व्यवस्थापन एकमेव योद्धा जसप्रीत बुमराहला इंग्लंडविरुद्ध तीनपेक्षा जास्त कसोटी खेळण्यासाठी दबाव आणणार नाही, असे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी ठामपणे सांगितले.

बुमराह हेडिंग्ले येथे इंग्लंडच्या फलंदाजांना सातत्याने आव्हान देणारा एकमेव भारतीय गोलंदाज होता. दुखापतग्रस्त बुमराहच्या वर्कलोड व्यवस्थापनाचा भाग म्हणून, व्यवस्थापनाने त्याला पाचपैकी तीन कसोटी सामन्यांमध्ये खेळवण्याचा निर्णय घेतला होता. चार सामने शिल्लक असताना ही योजना बदलत नाही. ‘नाही, आम्ही योजना बदलणार नाही. आमच्यासाठी त्याच्या वर्कलोडचे व्यवस्थापन करणे अधिक महत्त्वाचे आहे. ◂(वृत्तसंस्था)



# चोप्राने जिंकली गोल्डन स्पाईक

**८५.२९ मीटरची सर्वोत्तम कामगिरी**

♦ **ऑस्ट्रावा, २५ जून**

दोन वेळचा ऑलिम्पिक पदक विजेता नीरज चोप्राने ८५.२९ मीटरच्या सर्वोत्तम कामगिरीसह ऑस्ट्रावा गोल्डन स्पाईक २०२५ स्पर्धेत भालाफेक जिंकली.

नीरजने या प्रतिष्ठित स्पर्धेत एक थ्रो शिल्लक असताना विजय मिळवला. त्याचा ८५.२९ मीटरचा सर्वोत्तम प्रयत्न सहा फेऱ्यांनंतर अबाधित राहिला. या हंगामात त्याने आणखी एक विजेतेपद पटकावले. काही दिवसांपूर्वी पॅरिस डायमंड लीग स्पर्धेत विजय मिळवल्यानंतर नीरजचे हे एका महिन्यातील हे दुसरे जेतेपद आहे.

हरयाणाच्या २७ वर्षीय नीरजने तिसऱ्या प्रयत्नांत सर्वोत्तम प्रयत्न केले व प्रथम क्रमांक पटकावला, दक्षिण आफ्रिकेचा डौ स्मित ८४.१२ मीटरसह व ग्रॅनाडाचा ॲण्डरसन पीटर्स ८३.६३ मीटरसह अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या स्थानावर राहिले.

**जिंकूनही नीरज असमाधानी**

नीरज चोप्राने झेक प्रजासत्ताकमध्ये पहिल्यांदाच गोल्डन स्पाइक जिंकले असेल, परंतु तो आपल्या कामगिरीवर समाधानी नव्हता.

मी जिंकलेल्या ट्रॉफीवर मी खूप खूश आहो, परंतु माझ्या कामगिरीवर फारसा खूश नाही, असे नीरज म्हणाला.

नीरज चोप्राची पुढील स्पर्धा ५ जुलै रोजी बंगळुरू येथील एनसी क्लासिकमध्ये होईल व तिथे ॲण्डरसन पीटर्स व थॉमस रोहलर देखील स्पर्धा करतील अशी अपेक्षा आहे. ◂(वृत्तसंस्था)

---

# भारताच्या ९ वर्षीय आरितने कार्लसनला बरोबरीत रोखले



♦ **नवी दिल्ली, २५ जून**

दिल्लीचा नऊ वर्षीय आरित कपिल याने एका आघाडीच्या ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर झालेल्या अर्ली टायटल्ड ट्युजडे बुद्धिबळ स्पर्धेत प्रथम विश्वमानांकित मॅग्नस कार्लसनला बरोबरीत रोखले. आरित विजयाच्या जवळपास पोहोचला होता, परंतु थोडक्यात त्याचा विजय हुकला.

अलिकडील ९ वर्षांखालील राष्ट्रीय बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेचा उपविजेता असलेल्या आरितने पाच वेळा विश्वविजेत्याच्या तोडीस तोड चाली खेळात बरोबरी साधली. त्याने कार्लसनला विजयाची संधीच दिली नाही.

**थोडक्यात हुकला विजय**

पण वेळ संपत असताना व त्याच्या घड्याळात केवळ काही सेकंद शिल्लक असताना आरित कपिल आपल्या आघाडीचे रूपांतर करू शकला नाही आणि अखेर त्याने दोन प्यादाविरुद्ध रूक एंडगेममध्ये बरोबरी साधली.

आरितने जॉर्जियातील हॉटेलमधून हा डाव खेळला, तो सध्या १० वर्षांखालील जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत विजेतेपदासाठी झुंजत आहे. आरितने पहिल्या दोन डावांमध्ये विजय मिळवले असून आता तो आपला तिसरा सामना खेळेल.

दरम्यान, भारताच्या व्ही. प्रणवने ११ पैकी १० गुणांसह अर्ली टायटल्ड ट्युजडे विजेतेपद पटकावले. अमेरिकन ग्रॅण्डमास्टर हान्स मोके निमन व कार्लसन दोघांनीही ९.५ गुणांसह अंतिम फेरी गाठली, परंतु निमनने टायब्रेकमध्ये दुसरे स्थान मिळवले. ◂(वृत्तसंस्था)




# शूटिंग लीग ऑफ इंडियासाठी ४०० हून अधिक खेळाडूंची नोंदणी

♦ **नवी दिल्ली, २५ जून**

आगामी भारताच्या पहिल्या नेमबाजी लीगमध्ये (एसएलआय) बरीच उत्सुकता निर्माण झाली असून आतापर्यंत ४०० हून अधिक खेळाडूंनी या स्पर्धेसाठी आधीच नोंदणी केली आहे, असे आयोजक नॅशनल रायफल असोसिएशन ऑफ इंडियाने (एनआरएआय) बुधवारी सांगितले.

भारत, कझाकस्तान, रशिया, इराण, हंगेरी, क्रोएशिया, अझरबैजान, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, ग्रेनाडा, इटली, ऑस्ट्रेलिया, ऑस्ट्रिया, सर्बिया, अमेरिका, स्पेन, थायलंड, जर्मनी, झेक प्रजासत्ताक, नॉर्वे, सॅन मारिनो आणि रोमानिया येथील नेमबाजांनी या लीगसाठी नोंदणी केली आहे व ही संख्या वाढतच आहे.

आम्हाला मिळालेल्या प्रचंड प्रतिसादामुळे आणि नोंदणींच्या संख्येमुळे आम्हाला खरोखर आनंद झाला आहे.भारताच्या शूटिंग लीगसाठी आमच्या दृष्टिकोनाचे हे एक मजबूत प्रमाण आहे. आमचा उद्देश नेहमीच एक जागतिक दर्जाचे व्यासपीठ तयार करणे आहे व नेमबाजांच्या पुढच्या पिढीला प्रेरणा आहे, असे एनआरएआयचे अध्यक्ष श्री. कलिकेश नारायण सिंह देव म्हणाले. नोंदणी प्रक्रिया जुलैच्या मध्यापर्यंत खुली आहे.

एसएलआयचा पहिला हंगाम २० नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ दरम्यान होणार आहे. या लीगमध्ये पिस्तूल (१० मीटर, २५ मीटर), रायफल (१० मीटर, ५० मीटर ३ पोझिशन्स) आणि शॉटगन (ट्रॅप आणि स्कीट) या मिश्र सांघिक स्पर्धांचा समावेश असेल.

लीग टप्प्यात दोन पूलमध्ये विभागलेल्या या स्पर्धेत किमान सहा संघ सहभागी होतील. खेळाडूंची निवड केली जाईल आणि त्यांना चार स्तरांमध्ये गटबद्ध केले जाईल- एलिट चॅम्पियन, वर्ल्ड एलिट, नॅशनल चॅम्पियन आणि ज्युनियर आणि युथ चॅम्पियन - जेणेकरून अनुभव आणि उदयोन्मुख प्रतिभेचे स्पर्धात्मक मिश्रण सुनिश्चित होईल. ◂(वृत्तसंस्था)

### खेलो इंडिया विद्यापीठ क्रीडा जयपूरमध्ये

♦ **नवी दिल्ली, २५ जून**

खेलो इंडिया विद्यापीठ क्रीडा स्पर्धेची (केआययूजी) पाचवी आवृत्ती नोव्हेंबर महिन्यात जयपूरमध्ये होणार असून यामध्ये ४ हजारहून अधिक विद्यार्थी सहभागी होण्याचीा अपेक्षा आहे, अशी घोषणा क्रीडा मंत्री मनसुख मांडविय यांनी बुधवारी केली.

पूर्णिमा विद्यापीठ आणि राजस्थान विद्यापीठ संयुक्तपणे २५ वर्षांखालील बहु-क्रीडा खेळांचे आयोजन करणार आहे. या स्पर्धेमध्ये २०० हून अधिक विद्यापीठे सहभागी होतील. मागील आवृत्त्यांप्रमाणे, केआययूजी २०२५ कार्यक्रमात किमान २० विषयांचा समावेश असेल.

नोव्हेंबर २०२५ मध्ये राजस्थानमध्ये खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धा होणार आहेत हे जाहीर करताना मला अत्यंत आनंद होत आहे.

हे गेम्स २५ वर्षांखालील खेळाडूंसाठी आहेत आणि या वर्षी मे महिन्यात बिहारमध्ये झालेल्या १८ वर्षांखालील खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेनंतर होतील, असे मांडवीय यांनी म्हटले आहे. देशातील सर्वोत्तम प्रतिभेला आकर्षित करणाऱ्या आमच्या असंख्य खेळाडूंना प्रभावित करण्यासाठी हे खेळ उत्तम संधी देतात, असे ते म्हणाले.◂(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### वारीच्या पार्श्वभूमीवर नातेपुते बसस्टॅन्डवर मॉक ड्रिल

**नातेपुते, दि. २५ जून-**

प्रत्यक्ष आपत्कालीन परिस्थितीत जलद, सुरक्षित आणि कार्यक्षमतेने कसे कार्य करावे हे सर्वांना माहित आहे याची खात्री करण्यासाठी नातेपुते पोलीस स्टेशनकडून वारीच्या अनुषंगाने दहशतवादी हल्ल्याच्या वेळी करण्यात येणाऱ्या कारवाईबाबत व उपाय योजना बाबत नातेपुते बस स्टँड परिसर येथे उपविभागीय पोलीस अधिकारी अकलूज यांच्या मार्गदर्शनाखाली मॉकड्रिल घेण्यात आली. मॉकड्रिल करिता पोलीस स्टेशनचे सपोनि बसवेश्वर जकीकोरे, पोलीस उपनिरीक्षक विक्रांत दिघे सह स्टाफ, क्यू. आर. टी. पथक, आर.सी.पी.पथक, बीडीडीएस पथक ग्रामीण, उपजिल्हा रुग्णालय वैद्यकीय पथक, अग्निशमक पथक असे संयुक्त मॉकड्रिल घेण्यात आले. हे मॉकड्रिल दुपारी घेण्यात आले होते.



### अण्णाकाकांनी अनुयायी नव्हे कार्यकर्ते तयार केले : अॅड. मिरासदार

**माळशिरस, दि. २५ जून-**

अण्णाकाकांनी अनुयायी न करता कार्यकर्ते तयार केले आज त्यांनी निर्माण केलेल्या सर्व संस्थाचे रुपांतर वटवृक्षात झाले असल्याचे प्रतिपादन येथील विविध संस्थांचे मार्गदर्शक कै. विष्णूपंत विठ्ठलराव कुलकर्णी तथा अण्णा काका यांच्या १४ व्या पुण्यतिथी निमित्त गोपाळराव देव प्रशालेत रक्तदान, वृक्षारोपण आणि मोफत आरोग्य शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना संस्थेचे अध्यक्ष अॅड. माधव मिरासदार यांनी केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नातेपुते ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. संतोष खडतरे, श्री हनुमान शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष मिलिंद कुलकर्णी, कार्यवाहक रामचंद्र दोशी, सहकार्यवाह राजाराम ढाले, संचालक संतोष कुलकर्णी, सुभाष शिंदे,धनंजय मस्के, रामचंद्र सिद, नंदकुमार घाडगे, एम पी कुलकर्णी, डॉ. सुभाष देशमाने, अॅड. आप्पासाहेब वाघमोडे, नगरसेवक रघुनाथ चव्हाण, सुरेश टेळे, दादा शिंदे, कैलास वामन, पांडुरंग वाघमोडे उपस्थित होते. पुण्यस्मरणानिमित्त शंकरराव मोहिते-पाटील ब्लड बँकेच्या वतीने घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात १२९ जणांनी रक्तदान केले. मान्यवरांच्या हस्ते समीर गांधी कला महाविद्यालय येथे वृक्षारोपण करण्यात आले. व्यावसायिकांना सीए शाशिल गांधी व अमित दोशी यांचे वतीने आयकर व गुंतवणूक बाबत मार्गदर्शन करण्यात आले. वैद्य महेश कुलकर्णी व वरूण कुलकर्णी यांच्या वतीने मोफत ९२ रुग्णांची मोफत आयुर्वेद चिकित्सा व रोगनिदान तपासणी व उपचार, डॉ. किशोर बागडे यांच्यावतीने ५० रुग्णांची मोफत कान व श्रवणदोष तपासणी उपचार, डॉ. अशोक बागनवर यांचे वतीने ५५ रुग्णांची दंतचिकित्सा तपासणी, डॉ. आप्पासाहेब टेळे यांचे वतीने १२० रुग्णांची डोळे तपासणी, ग्रामीण रुग्णालयाच्या डॉक्टर मयुरा काळे यांचे किशोरवयीन मुलींच्या आरोग्य समस्या व उद्बोधन मार्गदर्शन, शंकरराव मोहिते पाटील ब्लड बँकेच्या वतीने बारावीच्या ८५ मुलींची रक्तगट व हिमोग्लोबिन तपासणी तसेच ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. संतोष खडतरे व डॉ.सुंदर गायकवाड यांनी वयाच्या ४० नंतरची मोफत १५७ जणांची रक्त तपासणी करण्यात आली. गोपाळराव देव प्रशालेचे मुख्याध्यापक धनंजय केसकर, समीर गांधी कला महाविद्यालयाचे प्रा. देविदास गेजगे, इंग्लिश मीडियमच्या प्रा. अपर्णा इनामदार व मारुतीनाना कुलकर्णी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका कांता कांबळे व समन्वयक राहुल राजमाने यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन शशिकांत चंदनशिवे यांनी तर आभार मुख्याध्यापिका कांता कांबळे यांनी केले.

### उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश मोरे यांचा पदभार रखडला

**सोलापूर, दि. २५ जून-**

सोलापूर जिल्हा परीषदेच्या ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून आठ दिवसापूर्वी धुळेचे गटविकास अधिकारी गणेश मोरे यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर दुसऱ्या दिवशी त्यांच्या कार्यालयासमोर त्यांचे नामफलकही लावण्यात आले. मात्र संध्याकाळी नामफलक काढून ठेवण्यात आल्याने त्यांच्या पदभाराविषयी संभ्रमावस्था दिसून येत आहे. तत्कालीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी ईशाधीन शेळकंदे यांची बदली झाल्यानंतर रिक्त असणाऱ्या जागेवर गणेश मोरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र आठ दिवसानंतरही पदभार प्रक्रीया होत नसल्याने उलटसुलट चर्चा सुरू आहे. याबाबत कार्यालयाशी संपर्क साधल्यानंतर लवकरच पदभार घेणार असल्याचे सांगितले.

## निधन वृत्त...

### लक्ष्मी सातपुते



**श्रीपूर, दि. २५ जून-**

येथील लक्ष्मी बापू सातपुते (वय ५५) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, सुना, नातवंडे, सासू असा परिवार आहे. त्या कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्यात सिव्हिल खात्यात टेंपररी महिला मजूर म्हणून कामास होत्या.

# रिंगण सोहळ्यासाठी सर्व यंत्रणांनी दक्ष रहावे

## जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या सूचना

## आषाढीच्या पार्श्वभूमीवर पंढरपुरात बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २५ जून-**

आषाढी शुद्ध एकादशी सोहळा ६ जुलै २०२५ रोजी होणार असून, या सोहळ्यासाठी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याचे ३० जून तर जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याचे १ जुलै रोजी सोलापूर जिल्ह्यात आगमन होणार आहे. तसेच अन्य पालखी सोहळ्यासोबत येणाऱ्या वारकरी भाविकांची पालखी मार्गावर, तळांवर तसेच रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये यासाठी सर्व यंत्रणांनी दक्ष राहावे. वारी कालावधीत प्रत्येक विभागाला देण्यात आलेली जबाबदारीने व समन्वयाने व्यवस्थित पार पाडावी, अशा सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्या.



आषाढी यात्रा पूर्वतयारी बाबत केबीपी कॉलेज पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम, अतिरिक्त जिल्हाधिकारी मोनिकासिंह ठाकूर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदिप कोहिनकर, प्रांताधिकारी अमित माळी, तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशील संसारे, मुख्याधिकारी महेश रोकडे तसेच पालखी सोहळ्यासाठी नियुक्त नोडल अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद म्हणाले, पालखी मार्गावर व तळांवर गेल्या वर्षी नियुक्त अधिकाऱ्यांना कोणत्या ठिकाणी अडचणी निर्माण झाल्या त्या अडचणी पुन्हा यावर्षी येणार नाहीत याची दक्षता घेऊन आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. भक्ती सागर ६५ एकर, वाखरी पालखी तळ या ठिकाणी पाणी वाटपाचे व्यवस्थित नियोजन करावे यासाठी चार ते पाच ठिकाणी निश्चित करून स्वयंसेवकाची नियुक्ती करावी. वाळवंटात हात गाडीवाले व मोकाट जनावरे येऊ नये यासाठी पोलीस प्रशासन व नगरपालिकेने योग्य ती दक्षता घ्यावी. तसेच सुलभ शौचालय स्वच्छ करण्यासाठी सक्शेन व सेटिंग मशीन वाहनांना विशेष वाहन म्हणून घोषित करण्यात आले आहे. या वाहनांना जाण्यासाठी कॉरिडॉर तयार करण्यात येणार असून यासाठी संबंधित नियुक्त अधिकाऱ्यांनी पोलीस प्रशासनाच्या संपर्कात राहावे मानांच्या पालखी सोहळ्या समवेत नियुक्त करण्यात आलेल्या नोडल अधिकाऱ्यांनी पालखी सोहळा प्रमुखांच्या संपर्कात राहावे. मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम म्हणाले, वारकरी भाविकांच्या सुविधेसाठी चार्जिंग पॉइंट स्टेशन वेगवेगळ्या ठिकाणी लावावे जेणेकरून एकाच ठिकाणी गर्दी होणार नाही. सुलभ शौचालयाकडे जाणाऱ्या रस्त्यांवर चिखल होणार नाही याची दक्षता घ्यावी. पाण्याचे टँकर भरण्याच्या ठिकाणी अखंडित वीज पुरवठा ठेवावा पालखी सोहळे मुक्कामाच्या ठिकाणी येण्यापूर्वी स्वच्छ असावीत तसेच पालखी सोहळे गेल्यानंतर तात्काळ त्या ठिकाणची स्वच्छता करण्यात यावी अशा सूचना केल्या. अतिरिक्त जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर म्हणाल्या, आषाढी यात्रा सोहळ्यासाठी पालखी मार्गावर तसेच शहरात वारकरी भाविकांच्या सुविधेसाठी २७ आपत्कालीन केंद्र स्थापन करण्यात येणार आहेत. चंद्रभागा नदीपात्रात आवश्यक त्या उपकरणासह प्रशिक्षक पथक तैनात करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी जिल्हा नगर प्रशासन अधिकारी वीणा पवार यांनी आषाढी यात्रा कालावधीत नगरपालिका प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या स्वच्छता, पाणीपुरवठा सुलभ सौचालय उपलब्धता निर्जंतुकीकरण आधी बाबतची माहिती दिली.



## चंद्रशेखर विद्यालयात गरजू विद्यार्थिनींना सायकल वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २५ जून-**

श्रीपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने चंद्रशेखर विद्यालयातील गरजू विद्यार्थिनींना कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंतराव कुलकर्णी यांच्या हस्ते सायकलींचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी आरपीआयचे तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, मौला पठाण, आरपीआयचे जिल्हा सचिव भारत आठवले, स्मारक समितीचे संदीप घाडगे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास आरपीआयचे युवक प्रदेश उपाध्यक्ष किरण धाईंजे, माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, आरपीआयचे जिल्हा संघटक तुकाराम बाबर, जिल्हा सचिव भारत आठवले, मौला पठाण, नगरसेवक प्रकाश नवगिरे, संतोष कुमठेकर, प्रविण साळवे, बापूसाहेब पोळके, पत्रकार बी. टी.शिवशरण, राजाभाऊ सुरवसे, समाधान लांडगे, गौतम आठवले, जिगरबाज ग्रुपचे संस्थापक राजरत्न नाईकनवरे, शैलेश शेंडगे, नागेश काटे, भगवान भोसले, प्राचार्य पांडुरंग पांडुरंग बनसोडे, उपमुख्याध्यापक गवळी उपस्थित होते.

## आषाढी यात्रा : कर्मचाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २५ जून-**

आषाढीसाठी दि. ६ जुलै रोजी मुख्यमंत्री व मानाचे वारकरी यांच्या हस्ते सपत्नीक श्रींची शासकीय महापूजा आयोजित करण्यात आली आहे. या यात्रेला मोठ्या प्रमाणात वारकरी भाविकांची गर्दी असते. सदर यात्रा शांततेत व नियोजनबध्द पध्दतीने पार पाडणेकामी आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने मंदिर समितीच्या कर्मचा-यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.



आषाढी यात्रा २०२५ निमित्त मोनिका सिंह-ठाकूर, अप्पर जिल्हाधिकारी तथा इन्सिडेंट कमांडर यांनी दिलेल्या सूचनेनुसार अग्निशमन, प्रथमोपचार, Causality Carrying Method d Safe Evacuation बाबत श्रीसंत तुकाराम भवन येथे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. दिपप्रज्वलन मंदिर समितीच्या सदस्या शकुंतलाताई नडगिरे यांच्या हस्ते करण्यात आले. संभाजी कारले यांनी अग्निशमन तसेच बीमल नथवाणी, योगेश परदेशी व संतोष शेलार यांनी Causality Carrying Method Safe Evacuation बाबत प्रशिक्षण व प्रात्यक्षिक दिले. यावेळी मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, वसंत पिचारे तसेच सर्व खातेप्रमुख उपस्थित होते. मंदीर समिताचे सुमारे २५० कर्मचारी, स्वयंसेवक उपस्थित होते.

## सामाजिक न्याय विभागाकडून ११ कोटी ८५ लाख निधीची तरतूद

समता, न्याय, एकात्मता
महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय विभाग

| सन | विकास कामे | मंजूर केलेला निधी |
|---|---|---|
| २०२१-२२ | ३३५ | २ कोटी ६६ लाख |
| २०२२-२३ | ४७५ | ४ कोटी १८ लाख |
| २०२३-२४ | ५२७ | ५ कोटी |
| एकूण | १,३३७ | ११ कोटी ८४ लाख ९० हजार |

स्थानिक स्तरावरून विकासकामे सुचवली गेल्यास व त्याला लोकप्रतिनिधींकडून मागणी झाली की अशा कामांची यादी जिल्हाधिकारी यांच्यासमोर ठेवली जाते. त्यांच्याकडून तत्वतः मान्यता मिळाली की वरिष्ठ कार्यालयाला अहवाल सादर केला जातो. मंजूर कामे शासकीय यंत्रणेकडून पूर्ण करून घेतली जातात.

**- सुलोचना सोनवणे- महाडिक,**
**सहाय्यक आयुक्त, सामाजिक न्याय विभाग**

### 3 वर्षात विकास कामांना चालना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ जून-**

शासनाच्या सामाजिक न्याय विभागाकडून शहर व ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्तीत रस्ते, पाणीपुरवठा यासह अन्य विविध विकासकामांसाठी मागील तीन वर्षात १ हजार ३३७ कामांना मंजुरी दिली आहे. यासाठी ११ कोटी ८४ लाख ९० हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

शहर- जिल्ह्यातील महापालिका, नगरपरिषद, नगरपालिका, नगरपंचायत आणि ग्रामपंचायतीच्या हद्दीतील अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्तीत पाणीपुरवठा, मलनिस्सारण, पोहोच रस्ते, अंतर्गत रस्ते, गटार बांधणे, स्मशानभूमीचा विकास, पथदिवे, पर्जन्य पाण्याचा निचरा, सार्वजनिक सुलभ शौचालय, ग्रंथालय किंवा अभ्यासिका, व्यायाम शाळा आदी कामांसह रहिवाशांची गरज व त्यांच्या मागणीनुसार १ हजार ३३७ कामे तीन वर्षात मंजूर केली आहेत. यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या वतीने मंजूर केलेल्या कामांसाठी ११ कोटी ८४ लाख ९० हजार रूपयांची तरतूद केली आहे. या प्राप्त निधीमुळे वंचित घटकातील नागरिकांच्या वसाहतीत नवीन विकासकामे होत आहेत. मात्र, लोकप्रतिनिधींनी सूचवलेल्याच कामांना जिल्हाधिकारी स्तरावरून तत्वतः मंजुरी मिळते. या नव्या कामांमुळे जिल्ह्याच्या विकासात भर पडली आहे.

## जिल्ह्यात आठ केंद्रावर दहावी, बारावी पुरवणी परीक्षा

### दहावीसाठी १,४६५ तर बारावीला 3,१५१ विद्यार्थी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जून-**

फेब्रुवारी, मार्च महिन्यात अनुत्तीर्ण झालेल्या दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने दहावी आणि बारावीच्या पुरवणी परीक्षेला मंगळवार २४ जूनपासून शहर-जिल्ह्यातील आठ केंद्रावर सुरुवात झाली आहे.

बारावीसाठी तीन हजार १५१ तर दहावीसाठी एक हजार ४६५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. चार हजार ६१६ विद्यार्थ्यांनी विविध परीक्षा केंद्रावर परीक्षा दिली आहे. शहरात छत्रपती शिवाजी महाराज नाईट कॉलेज केंद्रावर दहावीची तर ए. डी. जोशी कॉलेजच्या केंद्रावर बारावीची परीक्षा घेण्यात आली. बार्शी तालुक्यात एस. जे. मॉडेल स्कूल केंद्रावर दहावी, बार्शीच्या महाराष्ट्र विद्यालय केंद्रावर बारावीची परीक्षा पार पडली आहे. सांगोला येथे न्यू इंग्लिश स्कूल केंद्रावर बारावी, सांगोला विद्यामंदिर केंद्रावर दहावी, पंढरपूर येथील कासेगाव येथे दौलतराव विद्यालय केंद्रावर बारावी, गादेगाव येथील न्यू इंग्लिश स्कूल केंद्रावर दहावी, कुडूवाडी येथील नूतन विद्यालय येथे बारावी, करमाळा येथील महात्मा गांधी विद्यालय येथे दहावी, अभिनव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांनी पुरवणी परीक्षा दिली आहे. दहावीची परीक्षा २४ जूनपासून आठ जुलैपर्यंत तर बारावीची परीक्षा २४ जून ते १६ जुलैपर्यंत सुरू राहणार आहेत.

शहरासह जिल्ह्यात दहावी व बारावीच्या पुरवणी परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पडाव्यात यासाठी प्रत्येक परीक्षा केंद्रावर बैठे पथकाची नियुक्ती केली आहे. भरारी पथकही नेमले आहेत. सोलापूर शहरातील एका केंद्राच्या विद्यार्थ्यावर कॉफी केस करण्यात आली आहे. ज्या केंद्रावर गैरप्रकार आढळेल तेथील पर्यवेक्षकासह संबंधितावर कारवाई करण्यात येणार आहे.

**- सचिन जगताप,**
**माध्यमिक शिक्षणाधिकारी सोलापूर.**

# पालखी सोहळ्यांसाठी अकलूज नगरी सज्ज

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २५ जून-**

महाराष्ट्रातील मानाच्या दहा पालखी सोहळ्या पैकी तीन पालखी सोहळे एकाच दिवशी अकलूज मुक्कामी येत असून त्यांच्या सोयी सुविधा करिता अकलूज नगरपरिषदेला मोठी कसरत करावी लागणार असली तरी अकलूज नगरपरिषदेने पालखी सोहळ्यांच्या सुविधेसाठी विशेष नियोजन केले आहे. यावर्षी अकलूज नगर परिषदेला जिल्हा नियोजन समिती मार्फत सुवर्ण जयंती नगरॉथन योजनेतून पालखी मार्ग परिसरात मुरमीकरण करण्यासाठी १० लाख रु. व विद्युत पुरवठा करीता ५ लाख रु. असा केवळ १५ लाख रुपयाचा निधी मंजूर झाला आहे.

दि.१ जुलै रोजी जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा सकाळी ८ वाजता, श्री सोपानकाका यांचा पालखी सोहळा सायं. ४ वाजता व श्री चांगवाटेश्वर पालखी सोहळा सायं. ५ वाजता अकलूज मुक्कामी येत आहेत.या सोहळ्या सोबत संत नाथ महाराज संत, गोरोबाकाका, छत्रपती



शिवाजी महाराज, गवार शेठ लिंगायत वाणी, आदी पालख्या अकलूजमधून मार्गस्थ होत असतात लाखो वैष्णवांची मांदियाळीही अकलूज येथे मुक्कामी असते.

श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचा अकलूज येथे एकच दिवस मुक्काम असला तरी आदल्या दिवशी सदरचा पालखी सोहळा सराटी (जि. पुणे) येथे मुक्कामी असतो. सराटी व अकलूज ( जि. सोलापूर) हे अंतर केवळ तीन किलोमीटर असल्याने हजारो वैष्णव आदल्या दिवशीच अकलूज मुक्कामी येतात. यामुळे अकलूजकरांवर दोन दिवस मुक्कामाची जबाबदारी येते. नियोजीत मुक्कामाच्या दिवशी वैष्णवांना अकलूज परिसरात ठीकठिकाणी अन्नदान होते. परंतु आदल्या दिवशीही त्यांना अन्नदानाची सुविधा मिळावी या उद्देशाने जयसिंह मोहिते पाटील यांनी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने अन्नदानाची परंपरा सुरू केली.

अकलूज नगरपरिषदेने पाणी पुरवठा,वीज,स्वच्छता, रस्ते, आरोग्य, बेरेगेटींग, मंडप, दिवाबत्ती आदी विभागातील कामाचे नियोजन केले आहे. महिलांसाठी तीन हिरकणी कक्ष उभारण्यात येणार आहेत. शहरामध्ये दिंडी मुक्कामाची ठिकाणं असलेले तोरसकर वस्ती व काळा ओढा माळेवाडी अकलाई मंदिर परिसर, बहुउद्देशीय हॉल, जूने पोलिस स्टेशन, क्रीडा संकुल अशा सहा ठिकाणी पिण्याच्या पाण्याचे व वापराच्या पाण्याचे टँकर उपलब्ध करण्यात येत आहेत. तर बौद्ध विहार , अकालाई मंदिर परिसर, कृषी उत्पन्न बाजार समिती, मच्छी मार्केट, क्रीडा संकुल या पाच ठिकाणी महिलांना स्नानगृहाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. संपूर्ण शहरातील हातपंप व विहीरीमध्ये टी.सी.एल.चे नियोजन केले आहे. वाहनांची गर्दी होवू नये म्हणून योग्य ६ ठिकाणी बॅरेगेटींग लावून मार्गावर वाहनांना प्रवेश बंद करण्यात येणार आहे. पालखी मार्गावरील रस्त्यांची दुरुस्तीचे व डांबरीकरणाचे काम सुरु आहे. सराटी पूल, गांधी चौक येथे स्वागत कमान, रिंगण सोहळ्याकरीता सदाशिवराव माने विद्यालय येथे लाकडी बेरेगेटींग व मंडपाची व्यवस्था करण्यात येणार आहे.

मुक्कामाचे ठिकाणी आपत्कालीन कक्ष, २ हिरकणी कक्ष, चौकशी कक्ष व आरोग्य कक्षाची उभारणी करण्यात येत आहे. पथदिव्यांची दुरूस्ती करण्यात आली आहे. पालखी मुक्काम व आवश्यक १३ ठिकाणी १५०० फिरते शौचालये उभारण्यात येणार आहेत. ठिकठिकाणी जंतुनाशक फवारणी करण्यात येणार आहे. आषाढी कामांकरिता १३३ सफाई कामगार, २० लिपिक व अधिकारी असे जवळपास १५३ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.तर १ हजार१३ घन मीटर मुरमीकरण व सात हजार चौ. फूट वॉटर प्रूफ मंडप करण्यात येणार असल्याचे अकलूज नगरपरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दयानंद गोरे यांनी सांगितले.

## महत्वाचे...



### सेवासदन प्रशालेत पालक प्रतिनिधींची निवड

**सोलापूर, दि. २५ जून-**

सेवासदन प्रशालेत पालकसभा संपन्न झाली. सभेचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका राजेश्री रणपिसे यांनी केले. यावेळी मुख्याध्यापिकांच्या परवानगीने प्रत्येक दहावीच्या वर्गातून पालक प्रतिनिधींची निवड करण्यात आली. पालकांच्या शंकांचे निरसन मुख्याध्यापक व दहावीच्या शिक्षकांनी केले. पालक सभेत प्रशालेत राबवण्यात येणारे विविध उपक्रम याचा अहवाल पीपीटी द्वारे पालकांना दाखवण्यात आला. त्यासाठी प्रशालेतील शिक्षक रेवणसिद्ध कट्टे यांनी सहाय्य केले. दहावी बोर्ड संबंधीचे सर्व नियम तसेच सर्व विषयांच्या गुणदानाविषयी माहिती दिली तसेच दहावीचा अभ्यास विद्यार्थिनींनी कसा करावा व पालकांनी त्याकडे कसे लक्ष द्यावे यासंबंधी मार्गदर्शन प्रशालेच्या सहशिक्षिका संध्या सुतार यांनी केले. प्रशालेची शालेय शिस्त व खेळाविषयीचे नियम आणि ग्रेड परीक्षा विषयी माहित, खेळ कला या विषयांचे मिळणारे अतिरिक्त मार्क याविषयी माहिती प्रशालेतील क्रीडाप्रमुख ज्ञानेश्वर काळे यांनी सांगितली. गणित विषयासाठी पालकांचे उद्बोधन प्रशालेतील गणित शिक्षक सुधीर देशमुख यांनी केले. सभेस प्रशालेच्या पर्यवेक्षिका स्वाती पोतदार उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार सहशिक्षिका मीनल उदनूर यांनी केले.



### एम.जे. प्रतिष्ठानतर्फे वृक्षारोपण व रक्तदान शिबीर

**सोलापूर, दि. २५ जून-**

नीलम नगर येथील एम.जे. प्रतिष्ठान आणि आप्पा तालीम सामाजिक व बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने कैलासवासी मारुती जमादार यांच्या स्मरणार्थ प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अनिल जमादार यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण आणि रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन माजी नगरसेवक गुरुशांत दुत्तरगावकर, पृथ्वीराज माने, सिद्धाराम खजूरगी, राहुल गंदुरे, प्रसाद कदम, श्रीकांत उडासे, देवा विटकर, सुनील अरळीकट्टी, देविदास कोळी, सुशांत कांबळे, संजू नायकोडे, दीपक बेळे, पांडू जमादार, कुमार पायणी यांच्या उपस्थितीत स्व. मारुती जमादार यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलनाने करण्यात आले. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. २०० अधिक वृक्षांचे वृक्षारोपण यावेळी करण्यात आले. यावेळी सोलापूर सिद्धेश्वर ब्लड बँक आणि शिवशंभो रक्तपेढी यांच्या वतीने रक्त संकलन करण्यात आले या रक्तदान शिबिरात २०० हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केले.



### उमाबाई श्राविका विद्यालयात विद्यार्थ्यांनीना एसटी पासचे वितरण

**सोलापूर, दि. २५ मे-**

उमाबाई श्राविका विद्यालयात विद्यार्थ्यांनीना मोफत एसटी पासचे वितरण करण्यात आले. राज्य शासनाच्या वतीने ग्रामीण भागातील विद्यार्थिनीचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मोफत प्रवास योजनेअंतर्गत सोलापूर एसटी आगाराच्या वतीने २० विद्यार्थिनींना मोफत एसटी पासचे वाटप याचे वाटप करण्यात आले. यावेळी वाहतूक नियंत्रक चंद्रकांत वाघमारे, प्रशालेचे वरिष्ठ दीप्ती शहा, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पोळ, अनुप कस्तुरे, क्रीडाशिक्षक सुहास छंचुरे आदी उपस्थित होते.

### जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी मोहीम आजपासून

**सोलापूर, दि. २५ जून-**

राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय सोलापूर यांचे मार्फत २६ जून ते ४ जुलै या काळात विशेष मोहीम राबवली जाणार आहे. याअंतर्गत अकरावी आणि बारावी विज्ञान शाखेतील सर्व प्रवेशित मागासवर्गीय विद्यार्थ्यांना तसेच सीईटी परीक्षा पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी विशेष मोहीम या सप्ताहात राबविली जाणार आहे. याकरिता पात्र विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र शासनाच्या CCVIS या वेबसाईटवर ऑनलाइन परिपूर्ण अर्ज दाखल करावेत असे आवाहन उपायुक्त, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

### रेल्वेच्या धडकेत हिरज येथील व्यक्तीचा मृत्यू

**सोलापूर, दि. २५ जून-**

रेल्वेच्या धडकेत उत्तर सोलापूर तालुक्यातील हिरज येथील ८५ वर्षाच्या व्यक्तीचा मृत्यू झाला. हा प्रकार हिरज शिवारातील रेल्वे रुळावरील पोल क्रमांक ४४३ जवळ बुधवारी घडला. विष्णु तुकाराम सुरवसे (वय ८५, रा. हिरज ता. उ. सोलापूर) असे मृत पावलेल्या व्यकतीचे नाव आहे. बुधवारी मध्यरात्री २.३० वाजता अज्ञात रेल्वेच्या धडकेत जखमी झालेले विष्णु हे बेशुध्द अवस्थेत आढळून आले. त्यांना तालुका पोलीस ठाण्याकडील हवालदार क्षीरसागर यांनी पहाटे ४.३० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच ते मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## डॉ. वळसंगकर आत्महत्या प्रकरण

# मनीषा मुसळेस जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जून-**



येथील डॉक्टर शिरीष वळसंगकर यांचे आत्महत्या प्रकरणी मनीषा महेश माने मुसळे हिचेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता, सदर गुन्ह्याकामी तिस आजरोजी मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री जयदीप मोहिते साहेब यांनी जामीन मंजूर केला.

यात हकीकत अशी की, दिनांक १७ एप्रिल २०२५ रोजी मनीषा माने हिने डॉक्टर शिरीष वळसंगकर, उमा वळसंगकर व इतर दोघांना ईमेल पाठवला होता, सदर ई-मेल मध्ये मनीषा हिने डॉक्टरांवर घाणेरडे आरोप केले होते, त्यामुळे डॉक्टर शिरीष हे व्यथीत झाले होते, त्यानंतर मनीषा हिने डॉक्टरांना लेखी माफीनामा लिहून दिला होता, लेखी माफीनामा लिहून दिला तरी मनीषा हीने ती तिच्या निर्णयावर ठाम असल्याचे धमकी दिली होती, त्यामुळे दिनांक १८ एप्रिल २०२५ रोजी डॉक्टर शिरीष यांनी स्वतःचे बंदुकीतून गोळी झाडून आत्महत्या केली व आत्महत्येस मनीषा ही जबाबदार आहे अशा आशयाची फिर्याद फिर्यादी अश्विन वळसंगकर यांनी सदर बझार पोलिसात दाखल केली होती. तदनंतर पोलिसांनी मनीषा माने हीस अटक केली होती. न्यायालयाने मनीषा हीस पोलीस कोठडी सुनावली होती, त्यानंतर मा. न्यायालयाने मनीषा हीस न्यायालयीन कोठडी सुनावली होती. त्यानंतर मनीषा माने हिने ड. प्रशांत नवगिरे यांचे मार्फत मा.सत्र न्यायालयात जामीन मिळणेकरिता अर्ज दाखल केला होता. दरम्यान पोलिसांनी मनीषा हिचे विरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. तदनंतर दिनांक २३ जून २०२५ रोजी मनीषा हिचे जामीन अर्जावर असा युक्तिवाद करण्यात आला की, सदर प्रकरणातील आरोपाप्रमाणे दिनांक १७ एप्रिल २०२५ रोजी पाठवलेल्या ई-मेलच्या प्रतीचे अवलोकन केले असता त्यामध्ये कोणतेही घाणेरडे आरोप केलेले नव्हते, तो ई-मेल एका कर्मचाऱ्याने दाद मागण्याकरिता मालकाकडे केलेला होता, सदर ईमेलमुळे डॉक्टरांनी आत्महत्या करावी अशी परिस्थिती नव्हती, ई-मेल पाठवल्यानंतर मनीषाने माफीनामा दिला होता, त्यामुळे तो विषय तिथेच संपला होता, प्रकरणातील सुसाईड नोट ही दुसऱ्या दिवशी जप्त करण्याचे दाखवण्यात आली, वास्तविकता मयताच्या अंगावरील कपडे त्याच दिवशी ताब्यात घेतले होते, त्यामुळे सुसाईड नोट दुसऱ्या दिवशी सापडली ही बाब संशयास्पद दिसते, सुसाईड नोट मधील हस्ताक्षर मराठीत असून दोषारोप पत्रातील कागदपत्राप्रमाणे २००१ नंतर डॉक्टरांनी मराठीत लिखाण केले नव्हते, यावरून सुसाईड नोट ही बनावट असल्याची शक्यता नाकारता येत नाही, अपहारा बाबतचे आरोप हे जुलै २०२४ पूर्वीचे असून त्याचा डॉक्टरांच्या आत्महत्याशी संबंध दिसून येत नाही, दोषारोप पत्रातील एकूण ४४ साक्षीदार हे दवाखान्यातील कर्मचारी आहेत, त्यामुळे त्यांचे जबाब चे अवलोकन केले असता म नीषाचे वागणुकीबद्दल तक्रारी दिसतात, त्याचा देखील संबंध आत्महत्याशी दिसून येत नाही, दोषारोपपत्रात सी.डी.आर दाखल नाहीत, दिनांक १७ एप्रिल २०२५ रोजी रात्री ७ नंतरचे सी.सी.टी.व्ही जप्त नाहीत, यावरूनच कोणालातरी वाचवण्यासाठी मनीषा हिस बळीचा बकरा करण्यात आला असा युक्तिवाद करण्यात आला. यात आरोपीतर्फे मनीषा हिचे वतीने अॅड. प्रशांत नवगिरे अॅड. श्रीपाद देशक, अॅड. सिद्धाराम पाटील तर सरकार तर्फे जिल्हा सरकारी वकील अॅड. प्रदीपसिंग राजपूत यांनी काम पाहिले.

# ३४ हजार मिळकतदारांनी भरला ३२ कोटी कर

### छापील बिले वाटपास सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जून-**



आत्तापर्यंत सुमारे ३४ हजार मिळकतदारांनी ३२ कोटी रुपये मिळकत कर भरला आहे. यामध्ये ७० टक्के ऑनलाईन कर जमा झाला आहे. ३० जून पर्यंत मिळकतदारांनी आपला कर भरून सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी केले आहे.

सोलापूर महापालिकेचा मिळकत कर भरण्यासाठी महापालिका मिळकत कर संकलन विभागाकडून मेसेज द्वारे मिळकतदारांना सूचना केल्या होत्या. आतापर्यंत एकूण ३४ हजार मिळकतदारांनी ३२ कोटी रुपये कर भरणा केला आहे. यातील सुमारे ७० टक्के मिळकतदारांनी आपला मिळकत कर ऑनलाईन भरला आहे.आज दिवसभरात ८०० मिळकतदारांनी ऑनलाईन पद्धतीने दीड कोटी कर भरणा केला आहे. महापालिकेकडून मिळकतदारांना छापील बिले वाटपास सुरुवात करण्यात आली आहे. येत्या ३० जून पर्यंत संबंधित मिळकतदारांनी आपला कर भरणा करून सवलतीचा लाभ घेण्याचे आवाहन उपायुक्त लोकरे यांनी केले आहे. मिळकत कराची थकबाकी न भरल्याने एकूण १४ मिळकतींवर महापालिकेचा बोजा चढविण्यात येणार होता त्यापैकी आठ मिळकतदारांनी आपली थकबाकी भरली आहे. उर्वरित सहा थकबाकीदारांवर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. यासाठी ई लिलाव करण्यात येणार आहे. या लिलाव प्रक्रियेत इच्छुकांनी सहभागी व्हावे. या या प्रक्रियेमध्ये महापालिका कराची थकबाकी सोडून उर्वरित रक्कम ही सहा महिने महापालिकेच्या ताब्यात ठेवण्यात येणार आहे.

### विनापरवाना डिजिटल; दोन गुन्हे दाखल

सोलापूर शहरात विनापरवाना डिजिटल फलक लावल्या प्रकरणी महापालिकेच्या माध्यमातून दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. नो डिजिटल झोन मध्ये डिजिटल लावण्या सक्त मनाई आहे. इतर ठिकाणी विनापरवाना डिजिटल फलक लावल्यास संबंधितांवर गुन्हा दाखल करून दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. यामुळे संबंधितांनी आवश्यक ती परवानगी घेऊनच डिजिटल फलक नियमानुसार लावावेत, असे आवाहन उपायुक्त आशिष लोकरे यांनी केले आहे.

### शहरातील दोन आयलँड देखभाल दुरुस्ती होणार

सोलापूर शहरात राष्ट्रीय स्वच्छ वायु कार्यक्रमांतर्गत विकसित करण्यात आलेली छत्रपती संभाजी महाराज चौक येथील आणि अक्कलकोट रोड येथील आयलँड देखभाल दुरुस्तीसाठी पंचरत्न फाउंडेशन कडे तीन वर्षासाठी जबाबदारी दिली आहे. यामुळे येथील महापालिकेचा देखभालीचा खर्च वाचणार आहे, असेही उपायुक्त आशिष लोकरे यांनी सांगितले.




# सोलापूर, धाराशिव, लातूरकरांना आता 'स्टार' विमानसेवेची प्रतिक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जून-**

गेल्या अनेक वर्षांपासून शहर-जिल्ह्यातील नागरिकांच्या जिव्हाळ्याचा आणि प्रलंबित असलेला विमानसेवेचा विषय दि. ९ जूनला मार्गी लागला आणि सोलापूर-गोवा विमानसेवा सुरू झाली. प्लाय ९१ या विमानसेवा कंपनीला सोलापूर, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यातून चांगला प्रतिसाद मिळत असून, या सर्वांना आता स्टार विमानसेवेचे म्हणजेच सोलापूर-मुंबई हवाई मार्गाचे वेध लागले आहेत. येत्या ऑगस्टमध्ये ही सेवा सुरू होण्याचे संकेत असून, यानंतर बेंगलोर, तिरूपती, हैदराबाद ही विमासेवा कार्यान्वित होणार आहे.

गेल्या ४ ते ६ महिन्यापासून सोलापूरकरांनी विमानसेवा लवकर चालू करावी, यासाठी वारंवार आवाज उठविला होता. यामुळे सोलापूर-गोवा ही विमानसेवा चालू झाली असून, या विमानसेवेमुळे अवघ्या विश्वाला सोलापूरकर जोडले गेले आहेत. सध्या ऑफ सिजन असतानाही या विमानासाठी प्रवाशीही चांगल्या प्रमाणात उपलब्ध होत असल्याने प्लाय ९१ कर्मचाऱ्यांतूनही समाधानाचे वातावरण आहे. या विमानाद्वारे आता फॉरेनर लोकही सोलापुरात पर्यटनासाठी येत आहेत. परदेशी पाहुणे पर्यटनासाठी आल्यावर सोलापुरातील धार्मिक, औद्योगिक विकासाला चालना मिळणार आहे. याचबरोबर मराठवाड्यातील काही जिल्हे, पश्चिम महाराष्ट्र अन् कर्नाटकालाही या विमानसेवेचा फायदा होणार आहे. सोलापूर येथे उद्योग वाढल्यास बेरोजगार युवकांना रोजगारवृध्दी होणार आहे. तसेच आर्थिक उलाढाली वाढणार आहेत. ही सेवा आठवड्यातून ४ दिवस चालणार असून, या विमानातून स्थानिक उद्योजक, युवक आणि प्रगतशील शेतकरी प्रवास करीत आहेत. गोव्यातून इतर काही देशातही जाता येत असल्याने याचा फायदा उद्योजकांना व विदेशात शिक्षण घेणाऱ्या युवकांना होत आहे.

### ऑगस्टच्या पहिल्याच आठवड्यापासून सोलापूर-मुंबई सेवा

सध्या सोलापूर गोवा ही विमानसेवा चालू केल्याने सर्वांनी गोवा पर्यटनाचा आनंद घ्यावा; यानंतर ऑगस्टच्या पहिल्याच आठवड्यात सोलापूर-मुंबई या मार्गावरील सेवा चालू होणार आहे. यानंतर नाईट लँडींग होवून तिरूपती, हैदराबाद, बेंगलोर, कोलकाता आदी विविध ठिकाणच्या सेवा चालू होणार असल्याची माहिती मंत्री मोहोळ यांनी दिली होती.

## ठाकरे सेनेच्या महिला जिल्हा संघटकपदी अमिता जगदाळे

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२५ जून-**



ठाकरे शिवसेनेच्या महिला जिल्हा संघटकपदी अमिता जगदाळे यांची निवड करण्यात आली आहे. पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने ही नियुक्ती झाली आहे. अमिता जगदाळे यांनी तरुण भारत कार्यालयास बुधवारी सदिच्छा भेट दिली. यावेळी सुवर्णा दांडगे, अनिता बिराजदार मीनल कांबळे, नाना मोरे, नागेश सोळंके, पंकज गजकोश, गिरीश मोरे हे शिवसैनिक उपस्थित होते. येत्या महापालिका निवडणुकीत उबाठा शिवसेनेच्या ५० महिला निवडून आणण्याचा निर्धार याप्रसंगी अमिता जगदाळे यांनी व्यक्त केला.

# पोषम्मा चौक परिसरात दुषित पाणीपुरवठा

### इंडोस्कोपी कॅमेराद्वारे तपासणीअंती केली दुरुस्ती

### ड्रेनेजचे पाणी पिण्याच्या पाइपलाईनमध्ये शिरत असल्याचे आले निदर्शनास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जून-**







पोषम्मा चौक परिसरातील शंभो मारुती मंदिर समोर दुषित पाणी येत असलेल्या तक्रारीनंतर येथे इंडोस्कोपी कॅमेराद्वारे तपासणीअंती जलवाहिनी नवीन

व्हॉल्व बसवून दुरुस्ती करण्यात आली. ड्रेनेजचे पाणी कुजलेल्या बेंड मधून पिण्याच्या पाण्याच्या पाइपलाईन मध्ये शिरत असल्याचे निदर्शनास आले. महापालिका आयुक्तांच्या आदेशानंतर तातडीने कार्यवाही झाली. महापालिकेच्या विभागीय कार्यालय २ च्या कार्यक्षेत्रातील प्रभाग क्रमांक १० मधील ई ग्रुप विडी घरकुल, पोषम्मा चौक परिसरातील शंभो मारुती मंदिर समोर दुषित पाणी येत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने महापालिकेचे मक्तेदार सगर यांच्या कडून इंडोस्कॉपी कॅमेराद्वारे तपासणी केली. त्यावेळी पाण्याची पाईपलाइन आतून पूर्णपणे गंजलेली व गाठी असल्याचे निदर्शनास आले आहे. पाइपलाईनच्या शेवटी ३ मिटर मध्ये ४ टॅप कनेक्शन पैकी २ बंद बुच व २ चालू कनेक्शन आढळून आले. त्यापैकी एका कनेक्शनचे बेंड कुजलेले असून जुने ड्रेनेज घरगुती कनेक्शन शेजारी असल्याने ड्रेनेजचे पाणी कुजलेल्या बेंड मधून पिण्याच्या पाण्याच्या पाइपलाईन मध्ये शिरत होते. त्यामुळे दूषित पाणी येत होते. या ठिकाणी पाणी पुरवठा निगेटिव्ह फिडींगने होत असल्यामुळे इंडोस्कॉपी करताना ८ मीटर ते १२ मीटर मध्ये कॅमेरा पूर्णपणे पिण्याच्या पाण्याची पाइपलाइन मध्ये पाण्यात बुडालेले निदर्शनास आले. ८ मीटर ते १२ मीटर पिण्याच्या पाण्याची पाइपलाइनमध्ये थांबलेले पाणी आढळून आले. या ठिकाणी दूषित पाणी येत असल्यामुळे तसेच निगेटिव्ह फिडींगने पाणी पुरवठा असल्याने ४ इंची वॉश आऊट व्हॉल्व बसवण्यात आलेले आहे.या ठिकाणी पिण्याचे पाण्याची पाइपलाइन जुने व जीर्ण झाल्याचे निदर्शनास आले आहे.

### दूषित पाणी पुरवठा होत असल्यास प्राधान्याने निधी दिला जाईल

सोलापूर शहरातील दूषित पाणी पुरवठा होणाऱ्या पाईप लाईनची इंडोस्कॉपी कॅमेराद्वारे तपासणी करण्याच्या सूचना सर्व विभागीय अधिकारी यांना दिल्या. दूषित पाणी पुरवठा होत असल्यास ते पाईप लाईन बदलण्यासाठी प्राधान्याने निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी माहिती आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी दिले.

# लोकनेते कै. प्रतापसिंह मोहिते-पाटील यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २५ जून-**






लोकनेते कै. प्रतापसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांच्या ७० व्या जयंतीनिमित्त अकलूज व परिसरातील विविध संस्थांच्या वतीने विविध उपक्रम घेण्यात येऊन त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले

महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटना व छत्रपती गणेशोत्सव मंडळ यांच्यावतीने अकलूज येथे गोळीबार चौक येथे भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले उद्घाटन डॉ धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले या शिबिरात १८७ रक्तदान केले. यावेळी जनसेवा संघटनेचे सतीश पालकर, सुधीर रास्ते, अण्णासाहेब इनामदार., राजाभाऊ गुळवे, विठ्ठल इंगळे, बापू मगर, नवनाथ साठे, मयूर माने, ज्योती कुंभार संजय गाडे राहुल शहाणे प्रताप कोकिळ, सागर साळुंखे अरुण शहाणे शेखर शेंडे अनिल सोनार रघुनाथ साठे, उपस्थित होते.

यानिमित्त जुने पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र राज्य जनसेवा कामगार संघटना शाखेचे उद्घाटन डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भारत हणवते, आप्पा अवघडे, गोविंद पवार, रोहिदास हनवते, साधू खंडागळे, किशोर साठे, दत्ता काळोखे ,अनिल बनपट्टे दीपक लोंढे उपस्थित होते. तसेच उपजिल्हा रुग्णालय येथे गरोदर महिलांना पोषण आहार वाटप करण्यात आला. तसेच सद्भाऊ चौक येथे धवलसिंह रिक्षा स्टॉप यांच्यावतीने स्वर्गीय प्रतापसिंह मोहिते-पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन तसेच जिलेबी व केळी वाटप करण्यात आले. यावेळी तात्या गुळवे, किशोर चव्हाण, गंगाधर माने, साखळकर, रणजीत सुसलाले, चंद्रकांत कोळी, शिवदत्त नामदास, हतीश चंद्र पंडित, आसिफ काझी, नागेश सोनवणे, मच्छिंद्र पगारे, गौरव बाबर, महादेव जगताप, मनोहर कोळी, नितीन नाटेकर देविदास जाधव, अभी भारती उपस्थित होते.अकलूज येथील स्वर्गीय प्रतापसिंह मोहिते पाटील इंग्लिश स्कूल येथे प्राचार्य डॉ. उर्वशी राजे, धवलसिह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर येथील पालवी आश्रमातील मुलांना गरजे उपयोगी वस्तूंचे वाटप करण्यासाठी रवाना करण्यात आले. तसेच यावेळी प्रमुख पाहुण्या उत्कर्षा गोपाळ गुळवे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात येऊन प्रतापसिंह मोहिते-पाटील यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांचे विविध गुणदर्शनचे कार्यक्रम झाले

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/**. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शहराचा पाणीपुरवठा एक दिवस लांबणीवर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ जून -**

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जुन्या पाईपलाईनवरील व्हॉल्वचे टेलपीस नादुरुस्त झाल्याने ते दुरुस्त करण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे, परिणामी शहराचा पाणीपुरवठा गुरुवार दि. २६ जूनपासून एका रोटेशनकरता एक दिवस उशिरा होणार आहे.

सोलापूर शहरास पाणीपुरवठा करणाऱ्या पाकणी-सोलापूर दरम्यानच्या मुख्य जुन्या पाईपलाईनवरील सब मेनलाईनचे व्हॉल्वचे टेलपीस नादुरुस्त झाले आहे. त्याच्या दुरुस्तीचे काम महानगरपालिकेमार्फत गुरुवार दि. २६ जून रोजी हाती घेण्यात येणार आहे. दुरुस्तीच्या कामासाठी उजनी व पाकणी येथील पंप बंद राहणार असल्याने या ठिकाणाहून पाण्याचा उपसा होणार नाही. दुरुस्ती कामाकरीता बराच कालावधी लागणार असल्याने भवानी पेठ पंपगृहावरुन अवलंबून असलेल्या परिसरात गुरुवार दि. २६ जून रोजीचा पाणी पुरवठा उशीरा, कमी वेळ, कमी दाबाने होईल. यामुळे शहर परिसरात चार दिवसाआड सुरु असलेला पाणीपुरवठा एक रोटेशनसाठी एक दिवस उशिरा होणार आहे. नागरीकांनी उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी केले आहे.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## महत्वाचे...

### 'सैनिकी सेवा-प्रवास, संधी' यावर शनिवारी व्याख्यान

**सोलापूर, दि. २५ जून-**

सैनिक स्कूल सातारा माजी विद्यार्थी संघटना सोलापूर चाप्टर तर्फे शनिवार दि. २८ जून रोजी सायंकाळी ६ वाजता हुतात्मा स्मृती मंदिर येथे लष्करातील निवृत्त वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये प्रमुख वक्त्यांची व्याख्याने होणार आहेत, अशी माहिती अध्यक्ष गंगाधर थळंगे यांनी पत्रकार परिषदेत दिली. सेवानिवृत्त एअर मार्शल अरुण गरुड यांचे सैनिकी सेवा-एक गौरवशाली प्रवास आणि संधी या विषयावर व्याख्यान होईल. लष्करी लढाऊ नेतृत्वाच्या धड्यांची नागरी जीवनात प्रासंगिकता या विषयावर सेवानिवृत्त ब्रिगेडियर अरविंद कुंडलकर हे मार्गदर्शन करणार आहेत. सेवानिवृत्त लेफ्टनंट कर्नल रणजीतसिंह नलावडे हे भारतीय सेनेतील तांत्रिक सेवांमधील करिअर संधी- एक मार्गदर्शन या विषयावर व्याख्यान देणार आहेत. या कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य आहे. विद्यार्थ्यांना संरक्षण क्षेत्रासंदर्भात माहिती मिळावी या उद्देशातून हा उपक्रम आयोजित केला आहे. यावेळी विद्यार्थी, पालक, शिक्षक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### शिवधर्म फाउंडेशनतर्फे उद्या मोटरसायकल रॅली

**सोलापूर, दि. २५ जून-**

संभाजी ब्रिगेड संघटनेच्या नावात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावाचा एकेरी उल्लेख करण्यात आला आहे. या विरोधात सांगली येथील शिवधर्म फाउंडेशनच्या वतीने सोलापुरात शुक्रवार दि. २७ जून २०२५ रोजी दुपारी १२ वाजता मोटरसायकल रॅली काढण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष दीपक काटे यांनी पत्रकार परिषदेत दिली. संभाजी ब्रिगेड संघटना व पक्षाने त्यांच्या नावात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज असा उल्लेख करावा. तशी दुरुस्ती न केल्यास तत्काळ या संघटनेची नोंदणी रद्द करावी. छत्रपती संभाजी महाराज यांचा सन्मान कायम राखण्यासाठी महाराष्ट्र शासनाने कठोर भूमिका घ्यावी. या मागणीसाठी ही रॅली काढण्यात येणार आहे. सोलापूर येथे छत्रपती संभाजी महाराज चौक येथून या रॅलीस सुरुवात होणार आहे. त्यानंतर पुढे छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, रंग भवन, सात रस्ता ते जिल्हाधिकारी कार्यालय येथे या रॅलीचा समारोप होईल. या पत्रकार परिषदेस प्रथमेश पवार, बाळासाहेब सरवदे, विकास जाधव, विशाल कलशेट्टी, रविराज स्वामी आदी उपस्थित होते.

### लांबोटीत अज्ञात कारणातून तरुणाला मारहाण


**सोलापूर, दि. २५ जून-**

मोहोळ तालुक्यातील लांबोटी येथे मंगळवारी सायंकाळी पाचच्या सुमारास अज्ञात कारणातून तरुणाला लाकूड तसेच लाथाबुकयांनी मारहाण करण्यात आली.बालाजी बिभिषन पुजारी (वय २७, रा. लांबोटी) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. मंगळवारी सायंकाळी पाचच्या सुमारास बालाजी गावात असताना, त्याला राहुल युवराज चंदनशिवे तसेच इतर चार जणांनी अज्ञात कारणातून बदडले. या मारहाणीत बालाजीच्या डोक्याला जखम झाली तसेच सर्वांगास मुकामार लागल्याने मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार नातेवाईक अमोल बंडगर याने सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### बांधाच्या कारणावरून परमेश्वर पिंपरीत एकाला मारहाण

**सोलापूर, दि. २५ जून-**

शेतीच्या बांधाच्या कारणावरून मोहोळ तालुक्यातील परमेश्वर पिंपरी येथील रमेश गंगाराम पुजारी (वय ५०) यांना मंगळवारी दुपारी १२ च्या सुमारास त्यांच्या राहत्या घराजवळ मारहाण केली. मंगळवारी दुपारी बाराच्या सुमारास रमेश हे गावातील त्यांच्या घराजवळ थांबले होते. त्यावेळी शेतीच्या बांधाच्या कारणावरून



त्यांचा बाबासाहेब गंगाराम पुजारी व दिगंबर बाबासाहेब पुजारी व इतर तीन जणांसोबत वाद झाला. या झालेल्या वादातून बाबासाहेब पुजारी, दिगंबर पुजारी यांच्यासह तिन जणांनी दगडाने मारहाण केली. यामुळे त्याच्या डोक्याला जखम झाली. तसेच लाथाबुकयांनी मारहाण केल्याने सर्वांगास मुकामार लागल्याने मुकामार लागल्याने रात्री ७.३० वाजता मुलगा अक्षय पुजारी याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# महापालिकेच्या इमारतीत पाणी थेंब-थेंब गळं!

- नागरिकांच्या धोकादायक इमारतीवर हातोडा मारणाऱ्या पालिकेच्या इमारतीकडे मात्र प्रशासनाचे दुर्लक्ष
- जुन्या एम्प्लॉयमेंट चौकातील पालिकेच्या इमारतीची दुरवस्था

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.२५ जून-**

सोलापूर महानगरपालिकेचा सावळा गोंधळ हा नेहमीच नागरिकांच्या चर्चेचा विषय ठरतो. विविध प्रसंगांमुळे महापालिका प्रशासनावर कठीण नामुष्की वाढवते. प्रशासनात कार्यरत असणाऱ्या विविध अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे शहराचा कानाकोपरा माहित नसलेल्या नवीन आलेल्या अधिकाऱ्यांवर याचा ठपका पडतो. अशीच घटना घडलेली आहे.

शहरातील विविध धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण करून त्यांच्यावर हातोडा चालवणाऱ्या महापालिका प्रशासनाने स्वतःच्या घराकडे पाहिले नाही. महापालिकेच्या घनकचरा विभागातील इमारतीला व त्यावरील स्लॅबला मोठमोठे तडे गेल्याने पावसाचे साचलेले पाणी टप...टप... टपकत आहे. आणि विशेष म्हणजे ही बाब येथील अधिकाऱ्यांना अवगत असताना देखील यावर कोणतीही उपाययोजनात्मक कार्यवाही केलेली दिसत नाही. दरम्यान शहराच्या प्रमुख व्हीआयपी रस्त्यावर असणाऱ्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे ऑफिस धोकादायक इमारतीच्या गर्तेत सापडलेले आहे. मात्र याकडे कोणत्याही अधिकाऱ्याचे व कर्मचाऱ्यांचे लक्ष गेले नसावे का ? प्रश्न वारंवार उपस्थित होत आहे. यापूर्वी महापालिका प्रशासकीय इमारतीमध्ये अत्यंत धक्कादायक घटना घडली होती. प्रशासकीय इमारतीमधील एका कार्यालयात इमारतीची स्लॅब कोसळली होती. सुदैवाने तो दिवस रविवारचा होता. त्यामुळे त्या टेबलवर कार्यरत असणारे अधिकारी बालमबाल बचावले. मात्र हीच सुदैवाची गोष्ट वारंवार घडत नाही. त्यातून महापालिका प्रशासनाने किंबहुना संबंधित विभागातील अधिकाऱ्यांनी धडा घेणे गरजेचे होते. मात्र कित्येक दिवसापासून धोकादायक इमारतीचे नूतनीकरण किंवा इतर डागडूजी झालेली दिसत नाही. त्यामुळे घनकचरा व्यवस्थापन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीवर शंकेची सुई येत आहे. येणाऱ्या जाणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या नजरेस पडेल, अशी धोकादायक इमारत महापालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना कशी काय दिसली नाही. त्याच प्रमाणे या विभागात दररोज अनेक नागरिकांची आवक-जावक आहे. यांची कोणाचेही नजर जिन्यावरून वर जाताना पडलेल्या मोठमोठ्या भेगांवर आणि त्यातून टप टप टपकणाऱ्या पाण्यावर पडली नसावी का? असा यक्षप्रश्न उपस्थित होत आहे.






### नगर अभियंता कार्यालयाकडे सदरचे काम येते

पालिकेच्या नगर अभियंता कार्यालयाकडे निधी, मनुष्यबळ असते. देखभाल दुरुस्ती विभागाकडे मनुष्यबळ व निधी कमी प्रमाणात असतो. नगर अभियंता कार्यालय आणि झोन कार्यालयकडेच याचे कामकाज येते.

**- नीलकंठ मठपती,**
प्रमुख देखभाल दुरुस्ती विभाग

### वर घनकचरा व्यवस्थापन; खाली अस्वच्छता आणि दुर्गंधी

व्हीआयपी रस्त्यावर असणाऱ्या या कॉम्प्लेक्समध्ये वरच्या मजल्यावर पालिकेचे घनकचरा व्यवस्थापन कार्यालय आहे. तर खालच्या बाजूला मेजर व मिनी गाळे असून ते गाळे विविध व्यवसायिकांना देण्यात आलेले आहेत. मात्र येथील कॉम्प्लेक्सच्या आवारामध्ये सर्वत्र स्वच्छता, दुर्गंधी, चिखल आणि पाणी दिसून येते. वरील मजला धोकादायक स्थितीत आल्याने, सहाजिकच खालच्या लोकांना देखील याचा दाह बसणार आहेत. शहरात दुसरे एखादी दुर्दैवी घटना घडण्याअगोदर महापालिकेच्या संबंधित विभागाने तसेच अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष द्यावे. असा सूर आता नागरिक आणि व्यवसायिकांमधून उमटत आहेत.

### सदरचा विषय देखभाल दुरुस्ती विभागाकडे येतो

महापालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या कार्यालयच्या स्लॅबला तडे गेलेले आहे. सदरची इमारत धोकादायक स्थितीत आहे का नाही हे काम आमच्या नगर अभियंता कार्यालयाच्या अधिकारक्षेत्रात येत नाही. हे धोकादायक इमारतीचे कामकाज हे झोन कार्यालय आणि देखभाल दुरुस्ती विभागाकडे येते.

**- सारिका अकुलवार,**
नगर अभियंता महापालिका

### महापालिकेच्या इमारतींच्या सर्वेक्षणाची गरज



शहरात महापालिका प्रशासनाच्या अधिकारात असणाऱ्या व महापालिकेच्या स्वतःच्या इमारतींचे सर्वेक्षण करणे गरजेचे आहे. कधीकाळी उभारलेल्या या इमारती आजच्या घडीला धोकादायक अवस्थेत आलेल्या आहेत. यापूर्वी महापालिकेच्या स्वतःच्या विविध शाळांना देखील अशाच प्रकारे तडे धोकादायक स्थितीत असलेले इमारतींचे वृत्त दैनिक तरुण भारतने प्रसिद्ध केले होते. न्यू बुधवार पेठ येथील महापालिकेची शाळा तसेच तुळजापूर वेस येथील महापालिका शाळा क्रमांक दोन यांची देखील अत्यंत दुर्दशा झालेली आहे. अशा अत्यंत धोकादायक बनलेल्या इमारतीचे नूतनीकरण किंवा पाडकाम करणे काळाची गरज बनलेली आहे. त्यामुळे प्रशासनाच्या संबंधित विभागाने आणि अधिकाऱ्यांनी अशा इमारतींचे सर्वे करावे अशी मागणी आता सोलापूर शहरातील सुजाण नागरिकांकडून केली जात आहे.

## नगरसेवक पुत्राकडून मारहाण व जीवे मारण्याची धमकी

- जोडभावी पेठ ठाण्यात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ जून-**

रस्ता देण्याकरीता हॉर्न वाजविल्याच्या कारणावरून फरशीने डोक्यात मारून तसेच लाथाबुक्यांनी मारहाण करून नगरसेवक पुत्राने जीवे ठार मारण्याची धमकी दिली. ही मारहाण २२ जून रोजी रात्री १०.१५ वाजता घोंगडे वस्ती गणपती मंदिरा जवळील रस्त्यावर झाली.

याबाबत रऊफ अय्युब इनामदार (वय २२, रा. घोंगडे वस्ती, भवानी पेठ, सोलापूर) या तरुणाने दिलेल्या फिर्यादीरून जोडभावी पोलीस ठाण्यात बिपीन पाटील, संदिप पाटील, रवि मंदकल, पवन तगादे, विनायक पाटील, नवीन गोटीमुकूल व तीन अनोळखी लोकांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २२ जून रोजी रात्री १०.१५ वाजता फिर्यादी हा मित्र रियाजबरोबर दुचाकीवरून घोंगडे वस्ती येथून मित्रनगरकडे जात होता. दरम्यान गणपती मंदिराजवळील रस्त्यावर दोन ते तीन वाहने थांबलेली होती. त्यावेळी रस्ता मिळावा यासाठी रियाज नदाफ याने दोन ते तीनवेळा दुचाकीचा हॉर्न वाजविला. तेव्हा बिपीन पाटील थांब बे तुला कळत नाही का, गाड्या थांबलेल्या आहेत. त्या गाड्या अगोदर जाऊ दे, कश्याला हॉर्न वाजवितो असे म्हणाला. त्यावर मला बे म्हणू नका असे फिर्यादी म्हणाला असता, बिपीन पाटील याने तु लई मोठा झाला का? असे म्हणून चापट मारली. त्यानंतर फिर्यादी त्याच्या काकाला फोन लावत असताना, त्याला बिपीन पाटील, संदीप पाटील, रवि मंदकल यांनी फिर्यादीला मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यावेळी बिपीन पाटील याने तेथे पडलेला फरशीचा तुकडा डोक्यात मारून फिर्यादीला जखमी केले. हे पाहून मित्र रियाज हा तेथून निघून जाताना त्याच्या मानेवर चाकूने बिपीन पाटील याने वार केला. ही मारहाण २२ जून रोजी रात्री १०.१५ वाजता घोंगडे वस्ती गणपती मंदिरा जवळील रस्त्यावर झाली. यादरम्यान तेथे आलेले फिर्यादीचे काका युसूफ इनामदार हे बिपीन पाटील यास समजावून सांगत असताना,त्याने त्यांना शिवीगाळ करून ढकलून दिले. त्यानंतर आरोपींनी फिर्यादी, त्याचे नातेवाईक व मित्रांना खाली पाडून मारहाण केली. या गुनह्याचा तपास पोसई येळे करत आहेत.

### महिलेची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर :** ताई चौक परिसरातील रविंद्र नगर येथे बुधवारी दुपारी १२ च्या सुमारास महिलेने राहत्या घरात पंख्याला साडीने गळफास घेऊन आत्महत्या केली. मुक्ताबाई मोहन चन्ना (वय ६९, रा. ताई चौक, रविंद्र नगर) असे महिलेचे नाव आहे. ही बाब पती मोहन यांना समजताच, त्यांनी नातेवाईकांच्या मदतीने त्यांना खाली उतरविले. त्यानंतर हवालदार गायकवाड यांनी त्यांना बेशुध्द अवस्थेत शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच त्या मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

## वाहनाच्या धडकेत दोघे जखमी

### बोरामणी आरोग्य केंद्राजवळील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ जून-**

मंगळवारी सकाळी झालेल्या भीषण अपघातात मुस्ती येथील तिघांचा मृत्यू झाला. त्यानंतर बुधवारी दुपारी १२.३० वाजता बोरामणी येथील आरोग्य केंद्राजवळ पाठीमागून आलेल्या चार चाकी वाहनाच्या धडकेत मुस्ती येथीलच दोघे जखमी झाले. यातील एकजण बेशुध्द असल्याची नोंद पोलिसात झाली आहे.

दत्तात्रय रोहिदास राजगुरू (वय ६०) व गणेश दत्तु जगताप (वय ४५, दोघे रा. मुस्ती ता. द. सोलापूर) असे अपघातात जखमी झालेल्याची नावे आहेत. बुधवारी दुपारी १२.३० वाजता दत्तात्रय आणि गणेश हे मुस्ती येथून सोलापूकडे दुचाकीवर बसून निघाले होते. बोरामणी येथील आरोग्य केंद्राजवळ आल्यानंतर त्यांच्या दुचाकीला पाठीमागून आलेल्या चार चाकी वाहनाने धडक दिली. यात दत्तात्रय यांच्या चेह-याला खरचटले तसेच सर्वांगास मुकामार लागला. तर गणेशच्या चेह-याला जखम झाली तर पायाला खरचटले आहे. त्यांच्यावर बोरामणी येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून दुपारी १.१५ वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. यात दत्तात्रय हे यांची शुध्द हरपली असल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# चित्र प्रदर्शनातून आणीबाणी काळातील घटनांना उजाळा!

- गणेश निऱ्हाळी, रोहिणी तडवळकर, गुरुराज कुलकर्णी व किशोर देशपांडे यांनी दिली आणीबाणी काळाची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जून-**

देशात दि. २५ जून १९७५ रोजी आणीबाणी लागू करण्यात आली होती. या घटनेला आज दि. २५ जून रोजी ५० वर्ष पूर्ण झाले, त्यानिमित्ताने केंद्र व राज्य शासनाच्या सूचनेप्रमाणे जिल्हास्तरावर त्या काळातील घडामोडींबाबत तसेच सक्षम लोकशाहीच्या अनुषंगाने चित्र प्रदर्शन भरवण्यात आलेले आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून आणीबाणीच्या काळातील घटनांना उजाळा मिळणार आहे. तरी सोलापूर शहर-जिल्ह्यातील नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी केले.

देशात आणीबाणी जाहीर केल्याच्या घटनेला ५० वर्षे पूर्ण झाली त्यानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा माहिती कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रम प्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी निऱ्हाळी मार्गदर्शन करत होते. यावेळी आणीबाणी विरोधात लढा दिलेल्या संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी असलेले गुरुराज कुलकर्णी, किशोर देशपांडे, पंचागकर्ते मोहन दाते, शिरीष कुलकर्णी, सुधाकर कुलकर्णी, बाळासाहेब राऊत, संभाजी आदट, विलास पोरे, रामचंद्र तडवळकर, भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, जिल्हा माहिती अधिकारी सुनिल सोनटक्के, जिल्हाधिकारी व जिल्हा माहिती कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. निवासी उपजिल्हाधिकारी निऱ्हाळी पुढे म्हणाले की, देशातील सन १९७५ ते १९७७ मधील आणीबाणीच्या घटनेला ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. आणीबाणीचा इतिहास चित्रफीत व चित्रप्रदर्शनातून लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी मध्यवर्ती इमारतीमध्ये हे प्रदर्शन ठेवण्यात आले आहे. तरी जिल्ह्यातील नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन आणीबाणीच्या घटनांचे विविध पैलू जाणून घ्यावेत, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी पडळकर यांनी लोकशाही वाचविण्यासाठी जिल्ह्यातील ज्या लोकांनी लढा दिला त्यांचा आयोजित चित्रप्रदर्शनातून आणीबाणी काळात झालेल्या घटनांचा ऊहापोह होणार असल्याचे नमूद केले. प्रारंभी या चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, किशोर देशपांडे, गिरीराज कुलकर्णी व अन्य सर्व मान्यवरांच्या हस्ते फीत कापून तसेच दीप प्रज्वलन करून करण्यात आले. त्यानंतर जिल्हा प्रशासनाच्या वतीने या कार्यक्रमास उपस्थित आणीबाणी कालावधीत बंदीवास भोगलेल्या मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला. प्रास्ताविकात जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के यांनी या कार्यक्रमाचा आयोजनाचा उद्देश सांगितला. सूत्रसंचालन व आभार तहसीलदार शिल्पा ओसवाल यांनी मानले.




### २५ जून ते २४ जुलैपर्यंत चालणार चित्रप्रदर्शन

या प्रदर्शनात आणीबाणीच्या अनुषंगाने देशात व जिल्ह्यात घडलेल्या विविध घटना-घडामोडींची तसेच आणीबाणीविरोधी संघर्षात सहभागी झालेल्या विविध कार्यकर्ते-नागरिकांची नावे छायाचित्रे समाविष्ट आहेत. या प्रदर्शनातून आणीबाणीच्या कालावधीतील संपूर्ण संघर्ष आणि त्याचे विविध पैलू सर्वसामान्य नागरिकासमोर मांडले जात आहेत. हे प्रदर्शन जुने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील प्रशासकीय इमारतीमध्ये दि. २५ जून ते २४ जुलै २०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.२५ वाजता या कालावधीत सर्वांसाठी विनामूल्य सुरू राहणार आहे.

### आणीबाणी काळात आमच्यासह कुटुंबियांचे खूप हाल : कुलकर्णी

यावेळी गुरुराज कुलकर्णी यांनी आपल्या भाषणाची सुरुवात भारत माता की जय व भारतीय लोकशाही अमर रहे या घोषणा देऊन केली. देशाची लोकशाही चिरतरुण रहावी यासाठी आणीबाणीच्या कालावधीत त्या विरोधात संघर्ष उभा करण्यात आला. आणीबाणीच्या घटनेने राज्यघटनेची पायमल्ली होऊन लोकांच्या मूलभूत हक्कावर गदा आणण्यात आली. आणीबाणी विरोधात संघर्ष करणाऱ्या लोकांना बंदीवास भोगावा लागला व त्यांच्या कुटुंबीयांचे खूप हाल झाले. त्याकाळी देश सेवेने प्रेरित झालेल्या लोकांनी लोकशाही संरक्षणासाठी जो लढा निर्माण केला आज त्या लोकांचा योग्य सन्मान शासन करत असल्याबद्दल त्यांनी शासनाचे आभार व्यक्त केले.

### समाजजागृती केली की मिळायचा कारावास : देशपांडे

किशोर देशपांडे म्हणाले, देशात आणीबाणी लागू करण्यात आलेल्या घटनेला आज पन्नास वर्षे पूर्ण होत आहेत. देशात आणीबाणी लागू झाली याचा निषेध करण्यासाठी जिल्ह्यातील देशसेवेने प्रेरित तरुणांनी भितीपत्रके, पत्रके, समाजजागृतीसाठी वाटली. या लोकांना कारावास भोगावा लागला. यावेळी त्यांनी आणीबाणीच्या विरोधात केलेल्या विविध घटनांची माहिती सविस्तरपणे दिली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११५८

**कां कमळावरी भ्रमर श्र पाय ठेविती हळूवार ।**
**कुचंबेल केसर श्र इया शंका ।।**

अहिंसेबद्दल असणारी विविध मते भगवंतानी आतापर्यंत स्पष्ट केली आहेत, व्यवहाराने आपणांस जी हिंसा वाटते ती शास्त्रदृष्टया अहिंसा असते. कर्मकांडात जी अहिंसा, ती ज्ञानकांडात हिंसा समजली जाते. स्वमतांची खात्री करुन घेण्यासाठी प्राप्त झालेल्या अन्य मतांचे, अन्य दर्शनकारांच्या मतांचे विवेचण केलेच पाहीजे, असेही भगवंत म्हणाले. आपल्या मनाप्रमाणेच लोक वागत असतात दुसऱ्यांचे योग्य मतही अजिबात विचारात न घेण्याची प्रवृत्ती जास्त असते. आपण आपल्या मता बरोबर इतराची मते पताळून पाहिली असता योग्य मत समोर येऊ शकते, म्हणून माझेच खरे न म्हणता, दुसऱ्याच्याही विचाराचा, मनाचा विचार करावा. कसोटीमुळे सोन्याचा कस जसा समजतो, तसे अहिंसाधारण करणा-या शरीरावरुन आणि इंद्रियांच्या व्यवहाराच्या



प्रकारावरुन अहिंसेचे रुप जाणले जाते. ज्ञानाची आणि मनाची भेट झाली असता त्या मनात अंहिसेचे जे प्रतिबिंब उमटते त्यावरच आता भगवंत बोलत आहेत. लाटांच्या तरंगाना धक्का न लावता, लहरींना न फोडता तसेच पाण्याचा साठा न ढवळता, गतीने आणि अत्यंत हळूवारपणे भक्षावर नजर ठेवून बगळा जसा हळूवारपणे पाण्यात पाऊल ठेवतो, तसे अहिंसेचा पुजारी असणारा ज्ञानी कोणालाही, कसलाही त्रास होणार नाही, याची काळजी घेऊन चालत, बोलत असतो. ज्ञानी व्यक्तीचे दैनंदिन वर्तन कोणालाही कसलाही त्रास देणारे नसते.

ज्ञानी व्यक्ति अहिंसेच्या बाबतीत किती बारकाईने , काळजीपूर्वक वागतो, हे सांगताना भगवंत म्हणाले, कां कमळावरी भ्रमर श्र पाय ठेविती हळूवार श्र कुचंबेल केसर श्र इया शंका श्रश्र. अर्थात, भ्रमर जसे कमळपुस्पावर कमळांतील नाजूक पराग विस्कळीत होऊ नये म्हणून अत्यंत नाजूकपणे फुलावर पाय ठेवतो. अगदी त्याप्रमाणे ज्ञानी पुरुषाचे चालणे असते. आपला पाय ठेवण्याने किडा, मुंगीला सुध्दा त्रास होणार नाही असे तो पाहतो. माऊलींनी भ्रमराचे व कमळाचे अत्यंत सुरेख उदाहरण या ओवीत दिले आहे. आपले चालणे, बोलणे, वागणे जर या भ्रमर व कमळाच्या संबंधाप्रमाणे झाले तर चोहीकडे सुखच सुख दिसेल. कमळातील पराग विस्कळीत होऊ नयेत याची काळजी भ्रमर घेतो, अगदी त्याच प्रमाणे आपल्या वागण्यामुळे कोणाचेही नाजूक मन दुखावले जाणार नाही, कोणाच्या मनाला ठेच पोहचणार नाही याची दक्षता आपण घ्यायला हवी. मोठ मोठी लाकडे कोरणारा भुंगा किंवा माणसाला प्रसंगी फोडून काढणारा भुंगा कमळाशी इतका नाजूकपणे वागतो. हे पाहिल्यावर प्रेमाचे महत्व आपल्या लक्षात येते. प्रेम, आवड किती नाजूकपणे जपायची असते हे भ्रमराकडून शिकण्यासारखे आहे. थोडक्यात आपल्या चालण्या बोलण्याचा, वर्तनाचा कसलाही विपरीत परिणाम किंवा त्रास कोणाला होणार नाही याची दक्षता आपण वागलो तर कळतनकळत ज्ञानी भक्तांचे गुण आपल्यात उतरल्याचे आपल्या लक्षात येईल. ज्ञानी भक्ताचे गुण आपणा सर्वात उतरण्याची आज नितांत गरज गरज आहे. ही आपल्या वर्तनातून पूर्ण होईल असे आपण पहावे. यामुळे आपल्याबरोबर इतरांनाही आनंद मिळेल. खरे म्हणजे जीवनाचा आनंद आपणाला आपल्या वर्तनातून घेता आला पाहीजे. कारण एकदा का वेळ निघून गेली की काहींना तर पश्चाताप करायलाही संधी मिळत नाही.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरुवार | दिनविशेष- चांगला दिवस |
| दि. २६ जून २०२५ | राजर्षी शाहु महाराज जयंती |
| विक्रम संवत् २०८१ | श्री टेंबेस्वामी पुण्यतिथी |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - ज्येष्ठ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. प्रतिपदा (१३.२४) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - ग्रीष्म | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - आर्द्रा (८.४६) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - ध्रुव (२३.३९) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बालव (२४.१७) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** व्यापारातील विचार सार्थक ठरतील. कार्यकुशलता, परिश्रमचे मिळेल. उत्तरदायित्वाची पूर्तता करु शकाल.

**वृषभ :** नोकरीत अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभेल. सहचरणी सोबतच्या संबंधात गोडवा येईल.

**मिथुन :** उद्योग-धंद्यात निष्काजीपणा, उतावळेपणा करु नका. डोके शांत ठेवावे लागेल. आर्थिक स्थिती चिंता वाढवणारी होऊ शकते. आईच्या प्रकृतीची काळजी घ्यावी लागेल.

**कर्क :** धैर्य आणि सहनशीलता राखा. तसेच बुद्धिमतेने कामे हताळा. नवीन योजना तयार होतील. उधारी मिळेल. व्यापार-व्यवसाय चांगला राहिल.

**सिंह :** अनेक दिवसांपासून रेंगाळलेली कामे पूर्ण होतील. धार्मिक आस्था वाढेल. संपत्तीच्या खरेदी-विक्रीतून फायदा होईल. खर्चात कपात करा.

**कन्या :** विश्वासाचे वातावरण राहिल. कुटूंबात योग्य ती कामे होतील. कामाच्या प्रशंसतेचे योग संभवतील. उतावळपणाने कोणतेही काम करु नका.

**तुळ :** कष्टाला यश मिळेल. कामातील अडचणी दूर होण्याचे योग आहेत. मोठया लोकांशी भेटी होतील.

**वृश्चिक :** विद्यार्थ्यांनी अभ्यासावर लक्ष दिले पाहिजे. विनाकारण एखाद्याशी वाद होऊ शकतो. कामकाज साधारण राहील.

**धनु :** कठिण तसेच जबाबदारीच्या कामात विशेष सावधानतेचा परिचय द्यावा लागेल.

**मकर :** लाभाच्या संधी येतील. कामाविषयी उत्साह काय राहिल.

**कुंभ :** कामकाजात वाढ होईल, परंतू कामाचे योग्य फळ पदरात पडेल. कौटूंबिक परिस्थिती सम ाधानी राहील.

**मीन :** महत्तवाकांक्षा पूर्ण होतील. कामकाजात विस्तार होऊ शकेल. वेळेचा दुरुपयोग करु नका. मोठया लोकांशी भेटी-गाठी वाढतील.

# व्हीआयपी रस्त्यावरील फूटपाथला मोठे खड्डे

## ● होटगी रोडवरील ड्रेनेज चेंबर लाईनचे काम झाले; मात्र फूटपाथ दुरुस्तीकडे दुर्लक्ष





सोलापूर : शहरातील व्हीआयपी रस्त्यावरील फुटपाथ पुलाची बनलेले दयनीय अवस्थाचे टिपलेले छायाचित्र.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ जून-**

सोलापूर शहरातील महत्त्वाचा मानला जाणारा व्हीआयपी रस्ता विविध समस्यांच्या गर्तेत सापडला आहे. सदरचा रस्ता शासकीय विश्रामगृह ते विमानतळ पर्यंत जोडला जातो. या रस्त्याचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. मात्र या रस्त्याच्या फुटपाथ पुलाची गेल्या अनेक वर्षांपासूनची दुरावस्था आजतागायत कायम आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी असू देत, किंवा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वा मंत्री अन् आमदार सर्वजण याच व्हीआयपी रस्त्यांवरून जातात आणि येतात. तेव्हा मात्र हा फुटपाथचे विदारक चित्र दिसते. यासाठी पीएम, सीएम दौरा आला की, येथे तात्काळ पडदा लावला जातो. कारण सोलापूरच्या या फुटपाथची झालेली लाजिरवाणी अशी अवस्था लपवली जाते. मात्र यामध्ये कोणत्याही प्रकारची सुधारणा किंवा नूतनीकरण केले जात नाही, हेच खरे वास्तव आहे.

दरम्यान, सोलापूर शहरातील महत्त्वाच्या गनल्या जाणाऱ्या रस्त्यांपैकी एक रस्ता आहे. त्यामुळे हा रस्ता चकाचक आणि देखणा असला पाहिजे. परंतु या रस्त्यांवरून जाताना अस्वच्छता दुर्गंधी आणि सर्वत्र पसरलेले झाडाझुडपांचे साम्राज्य नजरेस पडते. या रस्त्यावर असलेला फूटपाथ पूल गेल्या कित्येक वर्षापासून नादुरुस्त अवस्थेत आहे. या पुलावरील बाजूला असलेल्या लोखंडे बार आणि सुरक्षाभिंत पडलेली आहे. रस्त्याच्या बाजूला असलेली झाडे देखील वाळुन गेलेली आहेत. येथे काही दिवसापूर्वी झालेले ड्रेनेज चेंबर लाईनचे काम मनपाने वेळेच्या आत केले. परंतु काम पूर्ण झाल्यानंतर रस्ता डांबरीकरण करण्यात आलेले नाही .या सर्व गोष्टीचा विचार करून स्मार्ट सोलापूर सुंदर सोलापूर असताना व्हिआयपी रस्त्याकडे दुर्लक्ष करू नये, असे वाटते. वर्षानुवर्षे येथे हीच समस्या कायम असून लोकप्रतिनिधी प्रशासन शहराच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या या रस्त्याचे आणि फुटपाथ फुलाचे नूतनीकरण कधी करणार हा प्रश्न स्मार्ट सिटीच्या सुजान नागरिकांना सतावत आहे.

### मॉर्निंग वॉकला जाणाऱ्यांना त्रास

शहराच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या छत्रपती संभाजी तलावात ड्रेनेजचे सांडपाणी मिसळत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर येथील ड्रेनेज चेंबरचे लाईन बदलण्यात आली. सदरचे सांडपाणी वळवण्यात आले. मात्र येथील फुटपाथ पूल जैसे थेच राहिला असून त्यामुळे मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या पादचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे.

**- दशरथ पाटील, पादचारी**

### होटगी रोडवरील पूल जैसे थे

हतबल प्रशासन आणि उदासीन लोकप्रतिनिधी यांच्यामुळे सोलापूरच्या विकासाच्या वाटा खुंटलेल्या दिसत आहेत. वास्तविक पाहता आमदार खासदार आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी गेले किती वर्षांपासून शहराच्या सौंदर्यात भर घालण्याऐवजी विद्रुपिकीरण करणाऱ्या या रस्त्याची आणि फुटपाथ पुलाचे नूतनीकरण करावे.

**- फैय्याज शेख,**
अध्यक्ष सोलापूर जिल्हा वृत्तपत्र लेखक मंच

# धूत सारीजतर्फे शुक्रवारपासून साडी महोत्सव

## साडी खरेदीवर मिळणार तब्बल ७० टक्क्यांपर्यंत सूट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जून-**

धूत सारीजतर्फे शुक्रवारपासून (दि.२७) बाळीवेस मधील कावळे मेडिकलच्या बोळात असलेल्या श्री धूत सारीजमध्ये साडी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून या महोत्सवांतर्गत साडी खरेदीवर तब्बल ७० टक्क्यांपर्यंत सूट देण्यात येणार असल्याची माहिती श्री धूत सारीजचे पुरुषोत्तम धूत यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

साडी खरेदीवर भरघोस सूट मिळणार असल्याने धूत साडी महोत्सवाला महिला वर्गाची मोठी गर्दी होणार आहे. धूत साडी महोत्सवाचे उद्घाटन शुक्रवारी (दि.२७) दुपारी ठीक १२ वाजता होणार आहे. यावेळी पोलीस उपायुक्त दिपाली काळे, भाजपा शहर अध्यक्षा रोहिणी तडवळकर, रम्या एम. राजकुमार, संयोजिनी राजेनिंबाळकर, शितल मोहिते पाटील, मोनिका कोठे, डॉ. निकिता देशमुख, शुभांगी पाटील, अनिता चव्हाण, राजवर्धिनी पाटील, विजयश्री पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी आ. देवेंद्र कोठे यांचा मानपत्र देऊन विशेष सन्मान धूत परिवारातर्फे करण्यात येणार आहे. गेल्या तीन पिढ्यांपासून धूत सारीजने दर्जेदार साड्या वाजवी दर आणि ग्राहकाभिमुख सेवेच्या जोरावर सोलापूर शहर जिल्ह्यासह महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेश, तेलंगणातील प्रचंड मोठ्या संख्येने ग्राहक जोडला आहे. साडी विक्री करणाऱ्या धूत सारीजच्या तिसऱ्या पिढीप्रमाणे ग्राहकांचीही तिसरी पिढी धूत सारीजमधील साडी खरेदीलाच प्राधान्य देत आहे. शेकडो प्रकारच्या अत्यंत दर्जेदार साड्या, घागरा, ओढणी यंदा धूत सारीजच्या धूत साडी महोत्सवामध्ये मिळणार आहे. विशेष म्हणजे यंदाच्या धूत साडी महोत्सवामध्ये देशभरातील विविध राज्यातील साडी मिलचे व्यवस्थापकही येणार असून थेट साडी मिलकडून ग्राहकांना वाजवी दरात अत्यंत दर्जेदार साड्या मिळणार आहेत. लग्न बस्ता, घरगुती समारंभ, तसेच इतर समारंभासाठी लागणाऱ्या साडी खरेदी करिता ग्राहकांनी धूत साडी महोत्सवास भेट द्यावी आणि दर्जेदार साड्यांवर भरघोस सूट मिळवावी, असे आवाहन धूत बंधू यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस नंदकिशोर धूत, राजगोपाल धूत उपस्थित होते.

## श्रीराम ज्येष्ठ नागरिक संघातर्फे मारुती चित्तमपल्ली यांना श्रध्दांजली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जून-**

नुकत्याच झालेल्या श्रीराम ज्येष्ठ नागरिक संघाच्या बैठकीत अरण्यऋषी मारुती चित्तनपल्ली यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. त्याच वेळी सोलापूरातील ज्येष्ठ पत्रकार गाताडे यांचे मारुती चित्तनपल्लींच्या जीवनावर व्याख्यान झाले. त्यात त्यांनी त्यांच्या पर्यावरण, वन्यजीवी अभ्यासक, साहित्यिक, सामाजिक इत्यादी क्षेत्रात केलेल्या कार्याचा आढावा घेतला.

सर्वच क्षेत्रात त्यांनी किती मोलाचे योगदान केले याविषयी त्यांनी प्रभावी असे मार्गदर्शन केले. याशिवाय गाताडे सोमपा तील सेवेत असताना महात्मा गांधी प्राणी संग्रहालयात काम करताना प्राणी व पक्षी याविषयी आलेले अनुभव कथन केले. त्यानंतर रामकृष्ण अघोर यांनी त्यांचे आभार मानले. याप्रसंगी वल्लभ करकमकर, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी दुरुगकर व कुलकर्णी, वेदमुर्ती जयंत फडके यांची देखील उपस्थिती होती.

# विशिष्ट दुकानातून शालेय साहित्य खरेदीची सक्ती थांबवा

## सोलापूर शिक्षणाधिकारी यांनी काढले आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जून-**

विशिष्ट दुकानातून शालेय साहित्य, गणवेश इत्यादी खरेदीसाठी शाळांकडून होणारी सक्ती थांबवा अशी आग्रही मागणी केल्यानंतर या सक्तीविरोधात सोलापूर शिक्षणाधिकाऱ्यांनी आदेश काढले आहेत. सुराज्य अभियानच्या या मागणीला यश आले आहे, अशी माहिती सम न्वयक दत्तात्रय पिसे यांनी पत्रकार परिषदेत दिली

काही शाळांमध्ये शालेय साहित्य विशिष्ट दुकानातून खरेदी करण्याची सक्ती केली जात आहे. त्याचा फटका पालकांना बसतो. या पार्श्वभूमीवर सुराज्य अभियाना अंतर्गत सोलापूर शिक्षणाधिकारी आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना निवेदन देण्यात आले होते. त्याची तातडीने दखल घेत शिक्षणाधिकाऱ्यांनी या सक्ती विरोधात आदेश काढले आहेत अशा प्रकारच्या तक्रारी तत्काळ नोंदवण्याचे आवाहन केले आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात अशा स्वरूपाचे स्पष्ट आदेश शिक्षणाधिकाऱ्यांनी द्यावेत. या आदेशाचे पालन होते की नाही याची तपासणी करावी. पालन न झाल्यास संबंधित शाळांवर दंडात्मक कारवाई करावी. अशा तक्रारीसाठी हेल्पलाइन क्रमांक सुरू करावा. या अभियानच्या मागण्या आहेत, असेही यावेळी दत्तात्रय पिसे यांनी सांगितले. पत्रकार परिषदेत माजी नगरसेवक चंद्रकांत रमणशेट्टी, सतीश गाजूल, राजन बुणगे, विक्रम घोडके आदी उपस्थित होते.

# पद्म नगर बास्केटबॉल स्पोर्ट्स अकॅडमीचा योग दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जून-**

पद्म नगर बास्केटबॉल स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने अकादमीच्या क्रीडांगणावर जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी योग गुरु नागेश कन्नूरकर यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. यावेळी अंजली विटकर, मुख्याध्यापक योग गुरु श्रीशैल गुरव, आनंद वल्लाकाटी, प्रबुद्ध चिंचोलीकर, श्रीधर गायकवाड विशाल बनसोडे, अश्विनी येदूर, श्रीधर ताटीपामुल, खेळाडू आणि



आणि पालक उपस्थित होते

# श्रीवास्तव नाभिक समाज अध्यक्षपदी सिद्राम रुद्रार

## ● सचिवपदी प्रकाश जोगीपेठकर, १९ जुलै रोजी पुरस्कार वितरण सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जून-**

श्रीवास्तव नाभिक समाजाच्या संचालक मंडळाची सभा समाजमंदिर येथे मावळते अध्यक्ष सायबण्णा शेडम यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेमध्ये नूतन अध्यक्ष म्हणून सिद्राम रुद्रार, सचिव प्रकाश जोगीपेठकर, उपाध्यक्ष राजू शुक्लवार, सहसचिव महेश श्रीमंगले, खजिनदार विजय शुक्लवार यांची बहुमताने निवड करण्यात आली.

संस्थेच्या वतीने शनिवार १९ जुलै रोजी दुपारी १२ वाजता सात रस्ता येतील ईरण्णा उपलप मंगल कार्यालयात शैक्षणिक साहित्य वाटप, ज्येष्ठ नागरिक व सेवानिवृत्तांचा सत्कार





तसेच गुणवंत विद्यार्थी पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती अध्यक्ष सिद्राम रुद्रार यांनी पत्रकार परिषदेत दिली. या पुरस्कार वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी समाजअध्यक्ष सिद्राम रुद्रार हे राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून खा. प्रणिती शिंदे, काँग्रेसचे शहर अध्यक्ष चेतन नरुटे, श्री संतसेना सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष हिंदूराव गोरे, जेष्ठ सल्लागार निलकंठ हल्लाळीकर, सुशांत क्षिरसागर, गणेश कोळी, अनिल कोंडूर, शिवराज हडपद, शेखर कोंडापूरे उपस्थित राहणार आहेत. समाजातील विद्यार्थ्यांनी मार्कलिस्ट उपाध्यक्ष राजू शुक्लवार (मो. ८६२५०७४०५७) आणि सहसचिव महेश श्रीमंगले (मो. ७२१८९०८५२७), मनोज म्याकलवार (मो. ९१७५३४३२२५) यांच्याकडे जमा करावी, असे आवाहन अध्यक्ष रुद्रार यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस प्रकाश जोगीपेठकर, राजू शुक्लवार, महेश श्रीमंगले, विजय शुक्लवार, परशुराम श्रीमंगले, नंदकिशोर सद्गुरे आदी उपस्थित होते.

# जिल्ह्यातील नेत्यांना विश्वासात घेवून कार्यकारिणी निवडणार

**नूतन जिल्हाध्यक्ष उमेश पाटील**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ जून-**

भीमा साखर कारखान्याच्या मल्टीस्टेटला आणि जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीला तीव्र विरोध दर्शवला. तसेच येत्या दोन आठवड्यात जिल्ह्याची नवीन कार्यकारिणी जाहीर करणार असून जिल्ह्याचे पदे देताना सामान्य कुटुंबातील धडपणाऱ्या, पक्षाला वेळ देणाऱ्या, झटणाऱ्या, निवडून आणण्याची ताकद आहे आणि जनमानसात लोकप्रिय असणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी देणार असल्याचे सांगितले. जिह्यातील विविध तालुक्यातील नेत्यांना विश्वासात घेऊनच सदरची निवड केली जाणार असल्याचे अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पक्षाचे नूतन जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी सांगितले.

श्री. पाटील यांनी या पदावर निवड झाल्यानंतर शहरात प्रथमच पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी सभापती कल्पना क्षीरसागर, बिज्जू प्रधाने, सुहास कदम, किरण माशाळकर, किशोर पाटील, रामेश्वर माशाळ, सायरा शेख, रियाज शेख, दशरथ कसबे, कुबेर फुलारी उपस्थित होते. श्री. पाटील म्हणाले, जिल्हा मध्यवर्ती बँक ही शेतकऱ्यांची आहे. ती बँक प्रशासकाच्या ताब्यात राहू द्यावी, जिल्ह्यातील प्रस्थापित पुढारी हे निवडणुका घेऊन आपल्या मुलांना बँकेवर आणण्याचा



**सोलापूर : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार पक्षाचे नूतन जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी दै. तरूण भारत कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी मुख्य संपादक प्रशांत माने यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी उपस्थित वृत्तसंपादक अजित संगवे व राष्ट्रवादीचे पदाधिकारी.**

घाट घातला जात आहे. त्याला आपला विरोध असून सहकार मंत्र्यांना पत्र देऊन जिल्हा बँकेची सुनावणी तातडीने लावावी अशी मागणी करणार आहे. भीमा सहकारी साखर कारखान्याचे २२ हजार कुटुंब आणि एक लाख शेतकरी यांचा विषय आहे. मोहोळ तालुक्यातील एकमेव सहकारी साखर कारखाना असून तो जर घशात घालण्याचा घाट घातला असेल, तर आपण शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहू. याबाबत, समाधान शेळके यांच्या मुलगा व सतीश जगताप हे देखील उच्च न्यायालयात गेले आहेत. त्यामुळे मल्टीस्टेटला विरोध कायम आहे. सोलापूर मुंबई, सोलापूर तिरुपती, सोलापूर हैदराबाद, दिल्ली अशा शहरात विमानसेवा सुरु व्हावी अशी मागणी करणार आहोत. मी कोणतेही लाभाचे पद घेतले नाही, पक्ष वाढीसाठी पदे घेऊन काम करीत आहे. पक्ष संघटनेच्या बांधणीचा मला अनुभव आहे. यशवंत माने हे माझ्या कार्यकारिणीत उपाध्यक्ष होते. प्राजक्ता तनपुरे, संजय बनसोडे हे माझ्या कार्यकारिणीत असणारे अनेक नेते आमदार झाले.




# श्री सिद्धेश्वर हायस्कूलमध्ये योग दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जून-**

श्री सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम हायस्कूल येथे योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रम ाची सुरुवात इशिता गुमडेल हिच्या ईशस्तवन व स्वागत गीताने झाली. योग दिनाचे भौगोलिक दृष्ट्या महत्त्व इयत्ता नववीचे विद्यार्थी नक्षत्रा माने व संकेत पायमल्ले यांनी सांगितले.

योग दिनाचे काव्यात्मक वक्तृत्व अखिलेश कोरे याने हिंदीतून सांगितले तर इयत्ता दहावीची विद्यार्थिनी स्निग्धा कलशेट्टी हिने योगशास्त्र आधुनिक काळाची गरज हे वक्तृत्व सादर केले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून योग प्रशिक्षक धनाजी धेंडे लाभले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक योगेश राऊत पर्यवेक्षिका नीता तमशेट्टी ज्येष्ठ शिक्षिका रेणुका अरोरा सांस्कृतिक विभाग प्रमुख रजनी महाजन तसेच सांस्कृतिक विभाग सदस्य विजयालक्ष्मी नष्टे श्रुती कुलकर्णी, नीलावती खरात होते. कार्यक्रमास क्रीडा शिक्षक सोहम साठे व कलाशिक्षक सहदेव भालेकर यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन इयत्ता नववीच्या विद्यार्थिनी शलाका मठ व अवनी उंबरजे यांनी केले. तसेच आभार अनन्या केगावकर हिने केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत

# एक वर्षापासून 'दक्षिण'चा कारभार रामभरोसे

## पूर्णवेळ बीडीओंची प्रतिक्षा, प्रभारीमुळे कर्मचाऱ्यांची मनमानी; नारगरिकांची होतेय गैरसोय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जून-**

एक वर्षापूर्वी दक्षिण सोलापूरचे गटविकास अधिकारी बाळासाहेब वाघ यांची लातूर येथे उपमुख्य कार्यकारी अधिकारीपदी बदली झाल्यानंतर एक वर्षापासून दक्षिण पंचायत समितीचा कारभार प्रभारी गटविकास अधिकाऱ्यांवर सुरू असल्याने येथील कामकाज रामभरोसेच सुरू आहे. सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ अक्कलकोटचे गटविकास अधिकारी शंकर कवितके यांच्याकडे अतिरिक्त पदभार आहे. बीडीओ कवितके यांच्याकडे अतिरिक्त पदभार असल्याने दक्षिण पंचायत समितीच्या प्रशासनावर वचक नसल्याचे दिसून येते. यामुळे विस्तार अधिकारीसह इतर कर्मचाऱ्यांचे मनमानी कामकाज सुरू आहे.

### प्रतिक्रियेसाठी बीडीओंचा प्रतिसाद नाही

दक्षिणमधील विस्तार अधिकाऱ्यांसह ग्राम पंचायत अधिकाऱ्यांची तक्रार करण्यास बीडीओ शंकर कवितके यांच्याशी भ्रमणध्वनीवरून वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही. यामुळे ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचे मनोबल वाढत आहे. तर नागरीकांची कामे खोळंबत आहेत. शिवाय विस्तार अधिकाऱ्यांच्या कामकाजाकडे दुर्लक्ष होत आहे. विस्तार अधिकारी अनेक ग्रामपंचायतीचे दप्तर तपासणी करण्याऐवजी टाळाटाळ करीत असल्याने संशय व्यक्त करण्यात येत आहे.

### कायम बीडीओ कधी मिळणार

एक वर्षापासून दक्षिणचे गटविकास अधिकारी पद रिक्त आहे. यामुळे तालुक्याच्या विकासावर परीणाम होत आहे. घरकुलसारख्या महत्वकांक्षी योजनांवर परीणाम होत आहे. दक्षिणच्या विकासाला व नागरीकांच्या विकासाला प्राधान्य देणारे आमदार सुभाष देशमुख यांनी पाठपुरावा करण्याची मागणी होत आहे.

बाळासाहेब वाघ बीडीओ असताना प्रशासनावर वचक होता. शिवाय विस्तार अधिकारीसह सर्व विभाग प्रमुख यांच्या कामकाजात गतिमानता होती. अनेक काम चुकार कर्मचाऱ्यांवर कारवाई झाली होती. मात्र प्रभारी बीडीओ आल्यापासून घरकूल लाभार्थ्यांसह अनेकांची कामे खसेळंबली आहेत. विस्तार अधिकाऱ्यांचा मुख्यालय व कार्यक्षेत्र सोडून जिल्हा परीषदेत ठिया दिसून येत आहे. शिवाय अनेक ग्रामपंचायतला भेट देऊन ग्रामपंचायत अधिकारी यांच्या कामकाजाची तपासणी व पाहणी करण्याकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत असल्याची चर्चा सुरू आहे. बीडीओंकडे तक्रार करण्यासाठी वारंवार चकरा मारल्यानंतरही भेट दुर्मिळच आहे. दक्षिणच्या कार्यालयात भेटीचे वार ठरले असताना बीडीओंसह विभागप्रमुख गैरहजर असल्याने लाभार्थी व नागरीकांना भेट होत नसल्याने आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. जिल्हा प्रशासनाकडून दक्षिणसाठी मोठया प्रमाणात घरकुल मंजूर करण्यात आले आहेत. मात्र दक्षिणच्या प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे घरकुल बांधकाम अपूर्ण आहेत. त्यामुळे शासनाची योजना अयशस्वी ठरत आहे. शिवाय अनेक काम चुकार ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना पाठीशी घालत आहेत. त्यामुळे ग्रामपंचायतीमध्ये भ्रष्टाचार वाढण्यास हातभार लागत आहे. ग्रामीणच्या विकासाला हातभार लावण्यात विस्तार अधिकाऱ्यांचा सिंहाचा वाटा असतो. मात्र दक्षिणमधील विस्तार अधिकारी शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करून स्वहित साधण्यात व्यस्त आहेत. त्यामुळे गावांच्या विकासावर परीणाम होत आहे. वरीष्ठांनी कामकाजात हलगर्जीपणा करणाऱ्या विस्तार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

---

## महत्वाचे...





### गणपती फार्मसीचे तीन विद्यार्थी नायपर परिक्षा उत्तीर्ण

**टेंभुर्णी, दि. २५ जून-**

श्री गणपती इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस अँड रिसर्च, अकोले खुर्द, टेंभुर्णी महाविद्यालयातील तीन विद्यार्थी नायपर जेईई २०२५ मध्ये उत्तीर्ण झालेत यामध्ये अमरसिंग शिंदे (नॅशनल रँक १२००), स्नेहल मोरे (नॅशनल रँक १७७३) व आनंद काशिद (नॅशनल रँक २८५०) यांनी यश संपादन केले असून देशातील नामांकित नायपर महाविद्यालयामध्ये एम. फार्मसी कोर्ससाठी ही परिक्षा महत्वाची आहे. या यशाबद्दल प्राचार्या डॉ. रुपाली बेंदगुडे, डॉ. प्रशांत मिसाळ, प्रा. नामदेव शिंदे, प्रा. शिवराज ढगे, स्पर्धा परिक्षा विभाग प्रमुख प्रा. कोमल साळुंखे, समन्वयक प्रा. पूजा शिरसकर सर्व शिक्षक यांनी सर्वांचे अभिनंदन करून भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.संस्थेचे सचिव डॉ. आर.डी. बेंदगुडे, अध्यक्ष ॲड. विजयराव हिरवे, उपाध्यक्ष बाबा येडगे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### अधिक रक्कम वसूल करणाऱ्या शाळांवर कारवाई करा

**सोलापूर, दि. २५ जून-**

**स्वराज्य माहीती अधिकार संघटनेचे शिक्षण अधिकाऱ्यांना निवेदन**

जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयाकडून शाळा सोडल्याचा दाखला व मार्कलिष्ट देताना ठराविक रक्कम बेकायदेशीरपणे वसूली करण्यात येत आहे. शाळा, महाविद्यालयाकडून होणारी विद्यार्थ्यांची आर्थिक लूट थांबविण्यात यावे, अन्यथा प्रशासनाकडे कायदेशीर कारवाई करण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे स्वराज्य माहीती अधिकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत वेदपाठक यांनी सांगितले. याबाबत शिष्टमंडळाकडून जिल्हाधिकारी व शिक्षण अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. यावेळी स्वराज्य पोलिस मित्र , पत्रकार संरक्षण आणि माहीती अधिकार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दिपक कांबळे, महासचिव कमलेश शेवाळे, प्रदेश अध्यक्षा धनश्री उत्पात , जल्हाध्यक्ष चंद्रकांत वेदपाठक, विनोद भोसले, इप्तेकार कामतीकर, उमेश काशीकर, दिनेश काटकर, अशोक मैंदर्गीकर, संतोष पोतदार, दिपक कुरूलकर, दत्तगुरू वेदपाठक, किशोर बेजगम, सुधिर सलगर, सुनिल बेंद्रे, गजानन सोनार, संतोष दिक्षित, मिराबाई बुद्रुक, स्मिता पाठक, प्रेमलता वैद्य आदी उपस्थित होते.



### आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांचा रस्त्यावर बसून आजीशी संवाद

**सांगोला, दि. २५ जून-**

सांगोल्याचे आ. डॉ. बाबासाहेब देशमुख हे नुकतेच मतदारसंघातील नियोजित कार्यक्रमासाठी चिकमहुद येथे जात होते. यावेळी चिकमहुद येथे वयोवृद्ध आजी आ. देशमुख यांची वाट पाहत उन्हात बसल्या होत्या. ही बाब कार्यकर्त्यांकडून समजताच आ.देशमुख यांनी स्वतः गाडीतून उतरून रस्त्यावरच बसून आजी सोबत संवाद साधला. या दरम्यान आजीने जागेविषयीचा समस्येचा प्रश्न आ. देशमुख यांच्यापुढे मांडला. आ.देशमुख यांनी तत्परतेने आजीच्या प्रश्नाची दखल घेत आजीचा प्रश्न निकाली मांडला. त्याचवेळी गावातील जे वयोवृध्द नागरिक असतात त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी गावातील कार्यकर्त्यांकडेही जबाबदारी दिली. अत्यंत साधेपणाने रस्त्यावरच बसून आजीच्या अडचणी जाणून घेतल्यामुळे आ. देशमुख यांच्या साधेपणाचे पुन्हा एकदा दर्शन सर्वसामान्य जनतेला पाहण्यास मिळाले. स्व.आ. गणपतराव देशमुख यांनी आयुष्यभर साधेपणा जपला होता. आबासाहेब यांचा साधेपणा आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनीही जपला आहे.



### लोकमंगल समृध्द गाव अभियानांतर्गत सावळेश्वर येथा गुणवंतांचा सत्कार

**सोलापूर, दि. २५ जून-**

लोकमंगल समृद्ध गाव अभियानांतर्गत सावळेश्वर येथील समता हायस्कूल व जुनिअर कॉलेज येथे इ. १० वी व इयत्ता १२ वी मध्ये उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. लोकमंगल समूहाचे अध्यक्ष आ. सुभाष देशमुख, लोकमंगल डेव्हलपमेंट फाउंडेशनचे अध्यक्ष अलका देवडकर व सचिव सचिन परमशेट्टी त्यांच्या मार्गदर्शनाखाली गुणवंत विद्यार्थ्यांचा हा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमासाठी सावळेश्वरचे सरपंच सखाराम साठे, सभापती धनाजी गावडे, समता हायस्कूलचे मुख्याध्यापक धनाजी पाटील, कालिदास गावडे, समता गावडे उपस्थित होते. प्रथमतः आलेल्या सर्व शिक्षक मान्यवरांचे स्वागत केले व गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार करण्यात आले. प्रास्ताविक संजय बागल यांनी केले. यावेळी इयत्ता १२वी कला शाखा- प्रथम क्रमांक सृष्टी शिंदे, द्वितीय अस्मिता जगताप, तृतीय पायल कांबळे, इयत्ता १२ वी सायन्स शाखा-प्रथम क्रमांक सुकन्या माळी, द्वितीय प्रणिती निळ, तृतीय ऋतुजा गुंड, इयत्ता १० वी समता हायस्कूल-प्रथम समृद्धी चव्हाण, द्वितीय वैष्णवी टेकाळे, तृतीय हर्षदा एडके, तसेच इयत्ता १० वी गावातील इतर शाळांमधून-प्रथम क्रमांक मंजिरी मसलकर, द्वितीय साक्षी निळ, तृतीय अर्चित सोनटक्के या सत्कारमूर्तींचे सत्कार मानचिन्ह प्रमाणपत्र व बुके देऊन सत्कार करण्यात आले.

---

## जलसंधारण ही काळाची गरज : प्रा. अजित कुरे



### लोकमंगल कृषी महाविद्यालयामार्फत राजूर येथे झाले व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जून-**

जलसंधारणासाठी जलतारा शोषखड्डे, बांधबंधिस्ती, ठिबक सिंचन, वृक्ष संवर्धन, पाणी आडवा पाणी जिरवा इत्यादी सर्व बाबी तंत्रशुद्ध पद्धतीने सांगून जलसंधारण ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन प्रा. अजित कुरे यांनी केले.

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा यांच्यामार्फत दि. २३ जून रोजी दक्षिण सोलापूर तालुक्यातील राजूर येथे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. राजूर या गावात लोक मंगल कृषी महाविद्यालयाचे अंतिम वर्षातील विद्यार्थी ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत कार्यरत असून त्यांच्यामार्फत गावातील शेतकरी बांधवांसाठी सदरील व्याख्यानाचे आयोजन केले होते. या व्याख्यानासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळाचे कृषी अभियांत्रिकी विभागातील सहाय्यक प्राध्यापक प्रा. अजित कुरे हे लाभले होते. यावेळी अशोक देवकाते, सरपंच लक्ष्मण गडदे, उपसरपंच सतीश देवकाते, तंटा समिती अध्यक्ष अभिमन्यू पाटील, सोसायटी माजी चेअरमन हनुमंतराव बिराजदार व कृष्णाप्पा बिराजदार आणि गावातील प्रगतशील शेतकरी शंकरराव बिराजदार आणि मल्लिकार्जुन बिराजदार इत्यादी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. यावेळी माती व पाणी परीक्षण आणि जलसंधारण या विषयावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. अजित कुरे यांनी सर्वप्रथम पिकांच्या दृष्टिकोनातून माती व पाण्याचे महत्व यावरती भाष्य केले. माती व पाणी तपासणीची गरज, त्याचे फायदे, मातीची आरोग्य पत्रिका, मातीतील उपलब्ध मूलद्रव्य, माती व पाणीचा नमुना गोळा करावयाची शास्त्रोक्त पद्धत याबाबत त्यांनी चित्रफितीच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांनी प्रश्नोत्तराच्या माध्यमातून देखील आपल्या प्रश्नांची उकल जाणून घेतली. यावेळी प्राचार्य डॉ. अमोल शिंदे, सरपंच लक्ष्मण गडदे आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक देवकाते यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शेवटी विद्यार्थी प्रतिनिधी विक्रम घोडके यांनी आभार मानले. सूत्रसंचालन मयूर दळवे याने केले. सदरील व्याख्यानास राजुर गावातील बहुसंख्य शेतकरी बांधवांनी आपली उपस्थिती दर्शवली.

## एस.टी.चालकाला दमदाटी; बार्शीत एका विरुद्ध तक्रार

**बार्शी, दि. २५ जून-**

माझ्यावर धूळ का उडवली? या कारणावरुन एस.टी. बस समोर दुचाकी आडवी लावून चालकाला शिवीगाळ व झटापट केल्याची घटना मंगळवारी सकाळी भन्साळे गावात घडली. एस.टी. चालकाने संबंधित दुचाकीस्वाराविरुद्ध बार्शी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

चालक शिवाजी रामचंद्र जाधवर (वय ५३, रा. विठ्ठलनगर, बार्शी) हे २४ जून रोजी सकाळी ८ वाजता बार्शी-चुंब मार्गावर एस.टी. बस (MH१४ BT ४२७३) सेवेवर होते. त्यावेळी एक दुचाकीस्वार बससमोर येऊन चालकास शिवीगाळ करु लागला. चालकाने समजूत घातली. परंतू त्याने त्यांची कॉलर पकडून झटापट केली. याचा व्हिडीओ वाहक उमा काळे यांनी शूट केला. गावकऱ्यांनी हस्तक्षेप करुन चालकाची सुटका केली. दुचाकीस्वाराचे नाव योगेश शिंदे असल्याचे नागरिकांनी सांगितले. चालक जाधवर यांनी बार्शी आगारात वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिली. त्यानुसार त्यांनी बार्शी पोलीसांत फिर्याद दाखल केली. योगेश शिंदे विरुद्ध सरकारी कामात अडथळा, शिवीगाळ व दमदाटी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात येण्याची शक्यता आहे.



## शेतकऱ्यांनी आता सेंद्रिय शेतीकडे वळावे : आमदार कल्याणशेट्टी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २५ जून-**

शेतकऱ्यांनी रासायनिक खतांचा वापर बंद करावा. आजच्या पिढीमध्ये आजारांचे प्रमाण वाढण्याचे कारण रासायनिक खतांचा भरमसाठ वापर आहे. हजारो वर्षापासून शेतकऱ्यांनी सेंद्रिय खताचाच वापर केला. शेणखतामुळे पीक येत नाही ही चुकीची भावना शेतकऱ्यांमध्ये आहे. सेंद्रिय खत व गोमूत्रामुळे उत्पन्नात दीडपट वाढ होते. त्यामुळे शेतकऱ्यांनी पुन्हा सेंद्रिय शेतीकडे वळावे असे आवाहन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी पानमंगरुळ (ता. अक्कलकोट) येथील सभेत केले.

पानमंगरुळ येथील नूतन विद्यालयाच्या प्रांगणात अजित बाबू सुतार व स्त्री प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने सेवानिवृत्त सैनिक, प्रगतीशील शेतकरी व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित केला होता. श्री.म.नि.प्र.ब्र. शिवानंद शिवाचार्य महास्वामी विरक्त मठ करजगी, श्री. ष. शिवयोगी शिवाचार्य महास्वामी मंगरुळ यांच्या हस्ते व आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. अशोक हिप्परगी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी उद्योजक अजित सुतार, स्त्री प्रतिष्ठानच्या अध्यक्षा रश्मी हिप्परगी, डॉ. सागर हिप्परगी, रामचंद्र अरवत, प्रकाश हिप्परगी, परमेश्वर यादवाड, सुरेश गड्डी, बाबु करपे, शिवशंकर जमादार, सतीश पवार, मुख्याध्यापक पुजारी, लक्ष्मण पुजारी, चिदानंद कुंभार, संतोष पवार, शरणप्पा बनसोडे आदी उपस्थित होते. यावेळी श्री. म. नि. प्र. ब्र. शिवानंद शिवाचार्य महास्वामी विरक्त मठ करजगी, श्री.ष.शिवयोगी शिवाचार्य महास्वामी मंगरुळ यांचे आशीर्वचन झाले. सूत्रसंचालन बाबूराव पवार यांनी केले. तर आभार राहुल हिप्परगी यांनी मानले.

---

## बार्शीचा अमृत योजनेत समावेश करा

### खासदार निंबाळकर यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२५ जून-**

बार्शी रेल्वे स्थानकाचा अमृत भारत योजनेत समावेश करावा,

लातूर-मुंबई वंदे भारत एक्सप्रेस सुरु करावी, लातूर-पुणे इंटरसिटी एक्सप्रेस सुरु करावी, हडपसर-काझीपेठ व कोल्हापूर-नागपूर एक्सप्रेस रोज सुरु करावी, फेअर स्पेशल गाड्यांचा दर्जा काढून मेल एक्सप्रेस दर्जा द्यावा, नांदेड-पनवेल एक्सप्रेस मधील रिमोट कोटा हटवावा आदिसह धाराशिव व बार्शी परिसराच्या दळणवळणाच्या दृष्टीने या मागण्या अत्यंत महत्त्वाच्या असून प्रवाशांची गैरसोय थांबवण्यासाठी प्रशासनाने त्वरित पावले उचलावीत अशी मागणी खासदार ओमराजे निंबाळकर यांनी केली.

मध्य रेल्वेच्या पुणे व सोलापूर विभागांची विभागीय खासदार समिती बैठक पुणे येथे पार पडली. या बैठकीस मध्य रेल्वेचे जनरल मॅनेजर धरमवीर मीना, पुणे व सोलापूर विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच विविध लोकसभा मतदारसंघांचे खासदार उपस्थित होते. या बैठकीत खासदार ओमराजे निंबाळकर यांनी धाराशिव-बार्शी भागाच्या समस्या ठोसपणे मांडल्या. बैठकीस रेल्वे प्रवासी सेलतर्फे शैलेश वखारिया व कनिष्क बोकेफोडेही उपस्थित होते.

## अरळीत होणार मल्लिकार्जुन शिक्षण मंडळाचा रौप्य महोत्सव

### व्याख्यान, मेळावा, पुरस्कार अन् सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ जून-**

अरळी (ता. मंगळवेढा) येथील श्री मल्लिकार्जुन शिक्षण प्रसारक मंडळाच्या रौप्य महोत्सवानिमित्त दि. २६ जून ते १ जुलै दरम्यान व्याख्यान, माजी विद्यार्थी मेळावा, पुरस्कार अन् सांस्कृतिक कार्यक्रम होणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. शिवानंद भांजे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोहळ्याचे उद्घाटन गुरुवारी (दि.२६) सकाळी ९ वाजता माजी खासदार श्री. ष. ब्र. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी आ. समाधान आवताडे, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांची प्रमुख उपस्थिती आहे. सकाळी ११ वाजता शिक्षक सुरेश पवार यांचे व्याख्यान, शुक्रवारी (दि.२७) सकाळी ९ वाजता शिक्षक सेवापूर्ती समारंभ आणि माजी विद्यार्थी मेळावा तर सायंकाळी ७ वाजता वेदमूर्ती महांतेश स्वामी हे कन्नड नाटक होईल. शनिवारी (दि.२८) सकाळी ९ वाजता डॉ. शिवरत्न शेटे यांचे 'श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रेरणादायी कार्य' या विषयावर व्याख्यान, सकाळी १०.३० वाजता सांस्कृतिक कार्यक्रम हाईल. रविवारी (दि.२९) सायंकाळी ७ वाजता मुचंडी दरिदेव हे कन्नड नाटक सादर होईल. सोमवारी (दि.३०) सकाळी ९ वाजता कन्नड साहित्य सांस्कृतिक उत्सव व सकाळी ११ वाजता कन्नड सांस्कृतिक कार्यक्रम होईल.

दुपारी ४ वाजता पुरस्कार वितरण सोहळा हाईल. यावेळी के.एल.ई. संस्था, महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था, अपूर्वा अभिमत ज्ञानपीठ संस्था, श्री रामलिंगेश्वर समाजसेवा मंडळ संस्था, ड्रीम फाउंडेशन यासह डॉ. पुष्पांजली शिंदे, सिद्धाराम पाटील, डॉ. पंचप्पा वाघमारे, विकास मोरे, श्रीकांत कोठगी, शिवशंकर भांजे, प्रशांत बिराजदार, समाधान भोरकडे, स्वप्निल काळुंगे, प्रशांत यादव, विकास केसकर यांना पुरस्कार देण्यात येणार आहे. मंगळवारी (दि. १ जुलै)सोहळ्याचा समारोप होणार असून सकाळी ९.३० वाजता रेणुका बागलकोटी यांचे व्याख्यान होईल. सकाळी १०.३० वाजता संगमेश बबलेश्वर यांच्या प्रमुख उपस्थितीत समारोपाचा कार्यक्रम होणार आहे. दुपारी २ वाजता कवी संमेलन तर दुपारी ३ वाजता प्रा. जवाहर मोरे यांचे विशेष व्याख्यान होणार आहे. या पत्रकार परिषदेस मल्लिकार्जुन भांजे, प्राचार्य नागनाथ बिरादार, रेणुका बागलकोटी, प्रा. रविकुमार सोलापुरे उपस्थित होते.

---

## भगवंताच्या सभामंडपात भक्तिरंगाचा अविष्कार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २५ जून-**

रविवारी भागवत एकादशीनिमित्त बार्शीतील गायक कलाकरांनी श्री भगवंत चरणी गायनाच्या स्वरुपात सेवा अर्पण केली. नादब्रम्हाची उपासना करत भक्तिरंगाची नवनवीन अविष्कार दाखवत श्री भगवंताच्या सभामंडपात भाविक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केली. आत्माचा परमात्याशी संवाद साधणाऱ्या भक्तिगीतांची ही पर्वणी 'स्वरसंध्या' या ग्रुपने बार्शीकरांना दिली.

सौ. लक्ष्मी तोरड यांनी आपल्या सुरेल आवाजात गायलेल्या 'दर्शन दे रे, दे रे भंगवता' या भक्तिगीतातून भगवतांची विनवणी करुन कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. श्री. मधुसुदन चांडक यांनी 'टाळ बोली चिपळीला' हा अभंग गावून भगवंताच्या दारी रंग भरला. सौ. दिपाली सहस्त्रबुध्दे यांनी आपल्या गोड आवाजात 'विठूचा गजर करीत हरिनामाचा झेंडा रोवला. डॉ. मदन देगावकर यांनी 'माझे माहेरी पंढरी' म्हणत अवघ्या पंढरीचे दर्शन घडविले. रुपाली पवार यांनी 'मन लगोरे' हे भक्तगीत



आपल्या मधूर आवाजात सादर करुन श्रोत्यांची मने जिंकली. सूर्यकांत वायकर यांच्या 'कान्हा वाजवितो बासरी' गवळीवर रसिक श्रोत्यांनी उस्फूर्तपणे ठेका धरला. तर प्रसाद सहस्त्रबुध्दी यांनी आपल्या पहाडी दमदार आवाजात गोकुळाच्या कान्हाचा गोड धिंगाणा 'हा नंदाचा कान्हा' या गवळणीतून सादर केला.

अबीर गुलाल, कौशल्याचा राम, दत्त दिगंबर दैवत, चंद्रभागेच्या तिरी, संपत्ती सोहळा, गोविंद गोविंद, शोधीसी मानवा, देवा तुझा मी सोनार, नित्यवाचे प्रभूनाम, छुनुक छुनुक टाळ वाजवी, भक्त पुंडलिकासाठी, घोंगडीवाला, विठ्ठलाच्या पायी अशा विविध अभंग, गवळण, भक्तीगितांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. भागवत एकादशीच्या दिवशी 'भक्तिरंग' या कार्यक्रमाची सांगता 'आषाढी पंढरी' या भैरवीने प्रसाद सहस्त्रबुध्दे यांनी केली. प्रसाद सहस्त्रबुध्दे यांनी हार्मोनियमवर आणि तुषार गदगी यांनी तबल्यावर अतिशय उत्तम साथ संगत केली. कार्यक्रमाचे निवेदन माधुरी शिंदे यांनी केली. 'स्वरसंध्या' ग्रुपने भगवंत महोत्सवामध्ये सादर केलेली 'भक्तिरंग' कार्यक्रम पुनश्चः व्हावा ही रसिक श्रोत्यांची साद होती, त्याला प्रतिसाद देत 'स्वरसंध्या' ग्रुपने भागवत एकादशीच्या दिवशी खास लोकाग्रहास्तव 'भक्तिरंग' कार्यक्रम पुनश्चः सादर केला आणि भक्तिमय वातावरण निर्माण केले.

## मसाप अक्कलकोट शाखेकडून मारुती चित्तमपल्ली यांना श्रद्धांजली

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२५ जून-**

अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष, अरण्यऋषी, सोलापूरचे सुपुत्र मारुती चित्तमपल्ली यांना महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा अक्कलकोटच्यावतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.

मारुती चित्तमपल्ली हे खरोखर अरण्यऋषी होते. शासकीय सेवेत वन अधिकारी असताना त्यांचा जंगलाशी संबंध आला. त्यांनी त्यांचा उपयोग करून त्यावर त्यांनी अनेक पुस्तके लिहिली यामध्ये, केशराचा पाऊस, रानवाटा, चैत्रपालवी, शब्दाचे धन, रातवा, चकवा चांदणे, जंगलाचे धडे, घरच्या पलीकडे, पाखर माया, पक्षीजाय दिगंतरा यांचा समावेश आहे. असे साहित्य परिषदेच्या अध्यक्षा शैलशिल्पा जाधव यांनी सांगितले.

मारुती चित्तमपल्ली यांच्या रूपाने सोलापूरला अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान मिळाला हे अभिमानाची गोष्ट आहे. असा अरण्यऋषी होणे कठीण आहे, असे आरती काळे यांनी सांगितले. याप्रसंगी ग्रंथपाल दत्तात्रय बाबर, दिनकर शिंपी, सुभाष सुरवसे, बापूजी निंबाळकर, लक्ष्मण पाटील, पुष्पा हरवाळकर आदी उपस्थित होते.






महत्वाचे...



## वारीच्या पार्श्वभूमीवर पिलीव येथील प्रशासकीय यंत्रणा सज्ज

**पिलीव, दि. २५ जून -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथून छोट्या-मोठ्या ३० ते ४० पालख्या पिलीवमधून जातात तर जवळपास २१ पालख्यांचा पिलीव येथे मुक्काम असतो. या पार्श्वभूमीवर पिलीव येथे प्रशासक मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली सर्व विभागाची आढावा बैठक घेणयात आली. यावेळी पिलीव प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैदयकीय अधिकारी डॉ. विलास जाधव यांनी पिलीव प्राथमिक आरोग्य केंद्राकडून दरवर्षी प्रमाणे यंदाही चांगली आरोग्य सेवा देण्यास कटीबद्ध असल्याचे सांगितले. महावितरणमार्फत चोवीस तास अखंडीत व सुरळीत वीजपुरवठा करण्यात येणार आहे. ग्रामपंचायतमार्फत वारकऱ्यांना स्वच्छ पाणीपुरवठा, राहण्याची सोय कर्मवीर भाऊराव पाटील विदयालय, जवाहरलाल शेतकी विदयालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तसेच मंदिरे व इतर ठिकाणी सोय उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचे बाबर यांनी सांगितले. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. विलास जाधव, कर्मवीर विदयालयाचे वाघमारे, जवाहरलाल शेतकी विद्यालयाचे जहागिरदार, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक साळुंखे, महावितरणचे शाहरुख मुलाणी, ग्रामसेवक बाबर, पत्रकार प्रमोद भैस, संजय पाटील उपस्थित होते. ग्रामसेवक बाबर यांनी आभार मानले.



## दिंडीसाठी मोडनिंबकरांचा एकत्रित पुढाकार; वारकऱ्यांच्या सोयीसाठी निवेदन

**मोडनिंब, दि. २५ जून-**

आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या श्री क्षेत्र नारायणगड तसेच येथून वारकरी दिंडीचा मोडनिंब (ता.माढा) येथे मुक्काम असतो. या पार्श्वभूमीवर गावातील ग्रामस्थांनी एकत्र येत ग्रामपंचायतीकडे लेखी निवेदन सादर केले आहे. दिंडीच्या मुक्कामावेळी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी सामूहिक मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे. सदर निवेदनात रात्री मुक्कामासाठी वारकऱ्यांना निवास, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, प्रकाश व्यवस्था, आरोग्य तपासणी, आदी सुविधा मिळाव्यात अशी विनंती करण्यात आली आहे. गावातील मंदिरे, शाळा परिसरात निवासासाठी व्यवस्था करण्याची मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर गावातील नागरिक, तरुण मंडळे, वारकरी भक्तगण आणि विविध सामाजिक संस्थांचे लोकांचे स्वाक्षरीसह समर्थन केले आहे.दरवर्षीप्रमाणे यंदाही या दिंडीचे जल्लोषात स्वागत करण्यासाठी गाव सज्ज असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

## जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाकडून स्वच्छ वारीचे होतेय नियोजन

**सोलापूर, दि. २५ जून -**

जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून निर्मल व स्वच्छ वारीसाठी व्यवसायांचे सर्वेक्षण व त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय तपासणीसाठी प्राधान्य देण्यात येत असल्याचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव यांनी सांगितले. १५ दिवस अगोदर पाणी स्त्रोतांचे सर्वेक्षण व पाणी नमुने तपासणी व फेर तपासणी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. टँकर व तात्पुरते शौचालयाकरीता रस्त्यांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. १५ दिवस अगोदर पालखीतळ, रस्ते सुधारणा व जंतुनाशक फवारणी पावडर धुरळणी करण्यात येत आहे. आठ दिवस अगोदर स्वच्छतेविषयी हॉटेल तपासणी, पाणी स्त्रोतांचे व टँकर भरणा ठिकाणाचे शुध्दीकरण करण्यात येणार आहे. पाच दिवस आगोदर हॉटेल कामगारांची वैद्यकिय तपासणी, बेटींग व गटार आणि घाण पाण्यावर डस्टींग आदि कामे तीन दिवस आगोदर, हॉटेल पाण्याची ओ.टी. तपासणी, स्नानगृह, हिरकणी कक्ष, आपत्ती व्यवस्थापन कक्ष, आरोग्य केंद्र स्थापना करण्यात आले आहे. मुक्काम व विसाव्याच्या ठिकाणी जलावरोधक मंडप व वारीच्या एक दिवस अगोदर दिंडी प्रमुखांना औषधोपचार किटचे वाटप करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पालखीतळ सजावट रांगोळी, दिशा, दर्शक फलक, विद्युत रोषणाई आदिचे नियोजन करण्यात आले आहे.

## पालखी सोहळ्यातील तीन दिड्यांना श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार

**पंढरपूर, दि. २५ जून-**

आषाढी यात्रेतील दिंड्यांद्वारे सोहळा स्वच्छ, निरोगी व निरामय राखण्यासाठी पर्यावरण, वृक्ष संवर्धन, प्लॅस्टिक मुक्ती, व्यसनमुक्ती, स्त्रीभ्रूण हत्या यासारखे सामाजिक विषयांच्या प्रबोधनाचे कार्य केले जाते. त्यांच्या कार्याचा उचित सन्मान व्हावा. त्याचप्रमाणे इतर दिंड्यानीही त्यांचा आदर्श घेवून या निर्मल वारी, हरीत वारी अभियानामध्ये सहभाग घ्यावा. या जाणिवेतून, श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीमार्फत आषाढी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार सन २०१८ पासून सुरू करण्यात आला आहे. आषाढी पालखी सोहळ्यातील पहिल्या तीन क्रमांकाच्या दिंड्यांना आषाढी एकादशी दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान चिन्ह व रक्कमेचा (प्रथम रू.१ लक्ष, द्वितीय रू.७५ हजार व तृतीय रू.५० हजार) धनादेश देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. त्यासाठी ॲड.माधवी निगडे, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, वृक्षमित्र ह.भ.प. शिवाजीराव मोरे या मंदिर समितीच्या तीन सदस्यांची समिती गठीत करण्यात आली असल्याचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगीतले.

# तुटपुंज्या अनुदानावर होतोय पंढरीचा वारी सोहळा

### पैशाचा ताळमेळ लावताना प्रशासनाची दमछाक

### अनुदान वाढविण्यासाठी पालकमंत्र्यांनी प्रयत्न करावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जून-**

पंढरीतील आषाढी सोहळ्यासाठी श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज या मोठ्या पालखी सोहळ्यासह अन्य संतांच्या पालखीसोबत लाखो वारकरी भावीक पंढरीत पायी चालत येतात. इतकेच नाहीतर एस. टी. महामंडळाच्या बसेस, खाजगी वाहने, रेल्वेद्वारेही लाखो भावीक आषाढी वारीसाठी पंढरीत येतात आणि श्री विठ्ठल चरणी लीन होतात. जवळपास २२ लाख वारकरी यंदाही आषाढीत येण्याची शक्यता जिल्हा प्रशासनाकडून वर्तविण्यात येत असून, मात्र या वारकऱ्यांना विविध सोयी पुरविण्यासाठी शासनाकडून तोकडेच अनुदान मिळाले आहे. यामुळे आहे त्या पैशातून विविध सुखसोई पुरविताना प्रशासनातील अधिकाऱ्यांची चांगलीच दमछाक होत असल्यामुळे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी वारी सोहळ्यासाठी शासनाकडून वाढीव अन् भरीव अनुदान मिळवून द्यावे, अशी मागणी पुढे येत आहे.

दाही दिशातून आलेल्या लाखो भाविकांना सुलभ दर्शन व्हावे, त्यांची कोणतीही गैरसोय होणार याची काळजी जिल्हा प्रशासन घेत आहे. या आलेल्या वारकऱ्यांना पंढरीत कसलीही अडचण येवू नये अशी तयारीही शासनाचे संबंधित अधिकारी करीत आहेत. मात्र त्यांना आताच पावलोपावली पैशाची चणचण भासू लागली आहे. शासनाकडून वारीचे अनुदान नगरपालिका विभागाकडून अवघे ५ कोटी असते. गतवर्षीपासून १० कोटीचे विशेष अनुदान चालू झाले आहे. आजतागायत डिपीसीतून ८ ते १० कोटीचा खर्च झाला आहे. तर ग्रामीण भागासाठी (दिंडीतील वारकऱ्यांसाठी) ३६ कोटीचे अनुदान प्राप्त आहे. इतक्या तुटपुंज्या अनुदानातून वारीचे नियोजन करताना वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नाकीनऊ येत आहेत.



मिळालेल्या पैशातून पावसाळ्याचा भाविकांना त्रास होवू नये म्हणून वॉटरप्रुफ मंडप गतवर्षी ३ लाख १५ हजार चौरस फूट होता तर यंदा ७ लाख १२ हजार चौरस फूटाची उभारणी चालू आहे. आरोग्याची काळजी घेण्यासाठी ३ कोटीच्या शुध्द पाणीबॉटल, लिंबू शरबत वाटप, ओआरएसची भाविकांना सोय केली आहे. फिरती शौचालये गतवर्षीच्या दुपटीने वाढविली आहेत. जेटींग, सक्शन मशीन, सफाई कर्मचारी वाढविले आहेत. मोठ्या पावसाने चिखल होवू नये यासाठी पंढरीत अन् पालखी मार्गावर तब्बल ७५ हजार घनमीटर मुरमीकरण केले आहे. गतवर्षी हेच मुरम ीकरण ३० हजार घनमिटर इतकेच केले होते. पावसाचा अंदाज पाहून यंदा हे मुरमीकरण अडीच पटीने वाढविले आहे. यामुळे पालखी मार्गही यंदा चकाचक झाले आहेत.

भाविकांच्या आरोग्यसेवेसाठी १४३ बाईक ॲम्बुलन्स, ४५०० मेडिसीन कीट, दक्षता कक्ष, ॲम्बुलन्सची सोय केली आहे. आयएमए असोशिएशन आणि प्रशासनाने नेमलेले डॉक्टर्सही उपलब्ध राहणार आहेत. इतकेच नाहीतर २१ दक्षता कक्ष, व्हिआयपी कक्ष, यात्रा नियंत्रण कक्षही निर्माण केले आहेत. भाविकांची गर्दी होवून चेंगराचेंगरी होवू नये यासाठी १३ हॉटस्पॉट शोधून त्या ठिकाणी प्रत्येकी २२ पोलिस कर्मचारी तैनात करण्याचे नियोजन केले आहे. ओव्हरलोड होडीधारकांवर कारवाई करण्यासाठी कर्मचारी नेमले आहेत, ४५० लाईफ जॅकेट दिली आहेत. वारकऱ्यांना गॅस कनेक्शन नीट जोडून देणे, वीज कनेक्शनसाठी वीज कर्मचारी आणि विजेचे साहित्य उपलब्ध करून देणे, भाविकांसाठी २० ठिकाणी विनामुल्य वायरलेस टेलिफोन बुथ, ५० ठिकाणी वायफाय सुविधा देण्यात येणार आहेत. ५५ इंची ३३ मोठे टिव्हीचा स्क्रीनसाठी वापर होणार आहे. इंटिग्रेटेड कंट्रोल रूम, १५० वायरलेस टेलिफोन (२ जी) आमच्या अधिकाऱ्यांकडे देण्यात येणार आहेत. पुजेच्या वेळी व्हिआयपींबरोबर २ ते ४ लोकच सोडण्यात येणार आहेत. यामुळे दर्शन रांगेतील भाविकांनाही जास्तीचा त्रास होणार नाही. एकंदरीत, शासनाकडून वारीसाठी मंजूर झालेल्या कमी अनुदानावर सध्या आम्ही काम करीत असलो तरी पंढरीतील या मोठ्या वारीसाठी हा निधी तोकडाच आहे. हा निधी भरीव करावा, अशी अपेक्षा प्रशासनातील जेष्ठ अधिकाऱ्यांची आहे.

## आषाढी वारीसाठी महावितरण सज्ज; पंढरपूर विभागाने केली उपाययोजना

### अधीक्षक अभियंता सुनील माने यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ जून-**

पंढरपूर येथे आषाढी वारीच्या अनुषंगाने वारी कालावधीमध्ये अखंडित व सुरळीत वीज पुरवठा करण्याच्या दृष्टिने महावितरण पंढरपूर विभागीय कार्यलयाकडून विठ्ठल मंदिर परिसर, वाळवंट तसेच संपूर्ण पंढरपूर शहर, पिराची कुरोली पालखी तळ, वाखरी पालखी तळ, बाजीराव विहीर, रिंगण परिसर, गोपाळपूर, ६५ एकर आदीं ठिकाणी महावितरण कंपनीचे कर्मचारी व विद्युत ठेकेदारांमार्फत शाखा व उपविभागीय अभियंता यांच्या देखरेखीने विविध कामे हाती घेऊन त्यावर योग्य त्या उपाय योजना करून देखभाल व दुरुस्तीची कामे पूर्ण केल्याची माहिती अधीक्षय अभियंता सुनिल माने यांनी 'दै. तरूण भारत' ला दिली.




आषाढी सोहळ्यासाठी राज्यातून विविध संतांच्या पालखी सोहळ्यांसह लाखो वारकरी येतात. पालखी मार्गासह पंढरपूरात महावितरण कडून जय्यत तयारी करण्यात आल्याचे माने यांनी सांगितले. विभागीय कार्यालयातर्फे अभियंते व जनमित्र कर्मचारी यांना सुरक्षा साधने पुरविण्यात आलेली आहेत. तसेच विद्युत सुरक्षिततेचे पालन करून संपूर्ण आषाढी यात्रा कालावधीत अखंडीत व सुरळीत विज पुरवठा करण्यासंबंधी त्यांना योग्य ते प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. ३३ के.व्ही उच्चदाब विज वाहिनी, पद्मावती, लिंक रोड, पिराची कुरोली, खेड भाळवणी, भंडीशेगाव, गादेगाव, वाखरी, गुरसाळे, देगाव व करकंब येथील ३३/११ केव्ही उपकेंद्र तसेच ११० केव्ही पंढरपूर, शहरातील सर्व ११ केव्ही उच्चविज, लघुदाब उपरी व भूमिगत वाहिन्यांची देखभाल दुरुस्ती करण्यात आल्याचे महावितरणचे पंढरपूर विभागाचे कार्यकारी अभियंता विजय पाटील यांनी सांगितले. त्याचप्रमाणे पालखी तळ व गर्दीच्या आवश्यक त्याठिकाणी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून ए.बी.केबल टाकलेली आहे. तसेच स्पेसर्स बसविण्यात आलेले आहेत. यांसह लोखंडी पोल स्टे वायर यांना प्लास्टिक पाईपचे आवरण केलेले आहे. रस्त्याच्या कडेला असलेले फीडर पिलर व मिनी पिलर यांना प्लास्टिकच्या शीटचे आवरण घातलेले आहे. त्याच पद्धतीने उच्च व लघुदाब विज वाहिन्यांना गर्दीच्या आवश्यक त्या ठिकाणी तसेच रस्त्याच्या क्रॉसिंगच्या ठिकाणी गार्डिंग करण्यात आल्याने वारीतील दुर्दैवी घटना टाळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### वारकऱ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य

गर्दीच्या ठिकाणी लोखंडी पोल व विद्युत उपकरणे यांना अर्थिंग केलेले आहे. साधारण १५० रोहीत्रांना तारेचे व लोखंडी ग्रीलचे संरक्षित कुंपण केलेले आहे.साधारण २०० रोहीत्रांणा पत्र्याच्या आवरणाने संरक्षित केलेले आहे. साधारण २५० रोहित्रांचे ६ के.एल.इन्सुलेटिंग ऑईल टॉपअप केले. एखाद्या भागाचा विजपुरवठा खंडित झाल्यास त्या ठिकाणी पर्यायी विज पुरवठा करण्याची उपाययोजना केलेली आहे. गर्दीच्या व आवश्यक त्या ठिकाणी विद्यत सुरक्षितते संबंधी घ्यावयाची काळजी याची माहिती प्रदर्शित करण्यात आलेली आहे.

**- सुनील माने, अधीक्षक अभियंता सोलापूर विभाग महावितरण**



### आगमन तयारी शेगावीच्या राणाची ...

**सोलापूर : श्रीक्षेत्र शेगावहून आषाढीसाठी पंढरपूरकडे निघालेल्या श्री गजानन महाराजांच्या पालखीचे शहरात दि. २९ रोजी आगमन होत आहे. पालखीचा दुपारी येथील श्री प्रभाकर महाराज मठात विसावा असणार आहे. त्यासाठी मंदीरात शामियाना उभारण्यात आला आहे. (छायाचित्र केवल तिवारी)**

## पालखी मार्गावर गॅस वितरणाचे केले नियोजन

### तहसीलदार शेजूळ यांची माहिती

**सदाशिवनगर, दि.२५ जून -**

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा ३० जून व श्री संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा १ जुलै रोजी माळशिरस तालुक्यात येत आहे. यामधील वारकरी, भाविक व विक्रेते यांना गॅस सिलेंडर वाटपाचे नियोजन केल्याची माहिती माळशिरसचे तहसीलदार सुरेश शेजूळ यांनी दिली.



३० जून ते ३ जुलै या कालावधीत गॅस पुरवठा केला जाणार आहे. यासाठी गॅस वितरकांना ठिकाणे, वेळ निश्चित करून दिली असून यावर नियंत्रण ठेवण्यासाठी मंडल अधिकारी, तलाठी यांच्या नेमणुका करण्यात आल्याचेही तहसीलदार शेजूळ यांनी सांगितले. यावेळी पुरवठा निरीक्षण अधिकारी रविकिरण शेट, पुरवठा निरीक्षक सुशांत केमकर उपस्थित होते. दिनांक, ठिकाण व वेळ पुढील प्रमाणे :

**श्री संत ज्ञानेश्वर पालखी मार्ग :** दि ३० जून रोजी धर्मपुरी पालखीतळ शेजारी सकाळी आठ ते दुपारी एक वाजेपर्यंत तसेच दाते पेट्रोल पंप नातेपुते दुपारी २ पासून रात्री २ वाजेपर्यंत. १ जुलै रोजी शहा धारशी जीवन पेट्रोल पंपाजवळ सकाळी आठ ते रात्री १२ वाजेपर्यंत तसेच ईश्वरा पेट्रोल पंप माळशिरस सकाळी ८ ते रात्री १२ वाजेपर्यंत. २ जुलै रोजी पुष्कराज पेट्रोल पंप वेळापूर सकाळी आठ ते रात्री १२ वाजेपर्यंत. ३ जुलै बोंडले दुध डेअरी शेजारी सकाळी आठ ते दुपारी ४ वाजेपर्यंत.

**श्री संत तुकाराम पालखी मार्ग :** दि १ जुलै गणेश मंदिरा जवळ अकलूज सकाळी ८ ते रात्री १२ वाजेपर्यंत तसेच सदाभाऊ चौक व सहकार महर्षी साखर कारखाना पेट्रोल पंप अकलूज. सकाळी ८ ते रात्री १ वाजेपर्यंत. दि २ जुलै श्रीहरी नगर माळीनगर सकाळी ८ ते दुपारी २ वाजेपर्यंत तसेच साखर कारखाना पेट्रोल पंप श्रीपूर सायंकाळी ४ ते रात्री १२ वाजेपर्यंत व बोरगाव दुध डेअरी जवळ सायंकाळी ४ ते रात्री १२ वाजेपर्यंत.

**नेमलेले पर्यवेक्षक (मंडळ अधिकारी) :** सी.बी.लोखंडे नातेपुते९६३७५८०५८२. एस.के.खंडागळे,माळशिरस९४२०५४४९९१, एस.टी.चव्हाण,वेळापूर७३५००१२५८३, एस. ए. भोसले, अकलूज ९७६६००९६५५, विजय जाधव, लवंग ९९२१३७०७०१, व्ही.टी.लोखंडे महाळुंग ९६५७३८४५२०.

# मंदिर परिसरातील भिक्षेकऱ्यांना चाप कधी बसणार ?

### रस्त्यांवर झोपून भिक्षेची याचना करण्यामुळे अपघाताची शक्यता

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२५ जून -**

विठ्ठल मंदिर परिसरात भिक्षेची याचना करणाऱ्या भिक्षेकरी मंडळींच्या संख्येत वाढ झाल्याचे दिसत आहे. शरीराला अपंगत्व आल्यामुळे काही भिक्षेकरी चक्क मंदिर परिसरात रस्त्यावर झोपून भिक्षेची याचना करताना दिसतात. मात्र अशा भिक्षेकऱ्यांमुळे वारकरी भाविकांना मंदिर परिसरात गर्दीतून चालताना अडचण निर्माण होते. एखाद्या वेळेस गर्दीतून वाट काढत असताना हे झोपलेले भिक्षेकरी न दिसल्यामुळे एखादा अपघात सुध्दा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मंदिर परिसरात भिक्षेची याचना करणाऱ्या भिक्षेकऱ्यांवर प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारण्याची गरज असल्याचे बोलले जात आहे.

येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात यात्रेच्या काळात भिक्षेकऱ्यांच्या संख्येत मोठी वाढ होते. सध्या देखील विठ्ठल मंदिराच्या पश्चिमव्दार आणि महाव्दार भागात शरीराला असलेल्या अपंगत्वामुळे भिक्षेकरी चक्क रस्त्यांवर झोपून वारकरी भाविकांकडे भिक्षेची याचना करताना दिसतात. एकीकडे गर्दीमुळे वारकऱ्यांना मंदिर परिसरात चालताना अडचणी येतात. त्या येऊ नयेत म्हणून मंदिर परिसरात जिल्हा प्रशासनाकडून नो व्हेईकल झोन, एकेरी वाहतूक अशा प्रकारचे आदेश काढले जातात. या बरोबरच मंदिर परिसरातील दुकानदार तसेच व्यापारी मंडळींना आपल्या दुकानांपुढे अतिक्रमण करु नये यासाठी देखील वारंवार तंबी दिली जात आहे. जेणे करुन मंदिर परिसर वारकऱ्यांना चालण्यासाठी प्रशस्त आणि मोकळा रहावा. प्रशासनाकडून प्रयत्नांची शिकस्त केली जात आहे. तर दुसरीकडे मात्र मंदिर परिसरातील रस्त्यांवर झोपून चक्क भिक्षेकरी वारकरी भाविकांकडे भिक्षेची याचना करताना दिसून येत आहेत. दरम्यान आता अजून यात्रेला काही दिवस बाकी आहेत. त्यामुळे मंदिर परिसरातील रस्ते सध्या मोकळे दिसत आहेत. सध्या भाविकांची संख्या तुलनेने कमी असल्याने भिक्षेकरी रस्त्यावर झोपून भिक्षा मागत असले तरी काही अनुचित घटना घडत नाही. मात्र यात्रेच्या काळात भाविकांची गर्दी वाढल्यावर भिक्षेकरी मंडळी अशीच मंदिर परिसरातील रस्त्यांवर झोपून भिक्षा मागत असतील तर एखादी अनुचित घटना किंवा अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मंदिर परिसरातील भिक्षेकऱ्यांवर पोलिस प्रशासनाकडून वेळीच कारवाईचा बडगा उगारावा अशी मागणी मंदिर परिसरातील व्यापारी तसेच वारकरी भाविकांकडून केली जात आहे.

### बेघर निवारा येथे भिक्षेकऱ्यांच्या पुर्वसनाची गरज

मंदिर परिसरासह चंद्रभागेच्या वाळवंटात देखील विविध घाटांवर अशा भिक्षेकरी मंडळींची संख्या मोठी आहे. शहरातील स्टेशनरस्ता, गजानन महाराज मठा समोरील रस्ता, रेल्वे स्टेशन परिसर, कैकाडी महाराज मठ, तनुपरे महाराज मठ, नगरप्रदक्षिणा रस्ता या प्रमुख रस्त्यांवर देखील भिक्षेकरी मंडळी वारंवार दृष्टीस पडतात. त्यामुळे यात्रेच्या अगोदर या सर्व भिक्षेकरी मंडळींची बेघर निवार येथे पुनर्वसन करण्याची मागणी शहरातील नागरिक आणि वारकरी भाविकांमधून केली जात आहे.



**पंढरपूर : येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरासह चंद्रभागेच्या वाळवंटात तसेच रस्त्याच्या बाजूला याचना करणारे भिक्षेकरी. (छायाचित्र: उमेश टोमके, पंढरपूर)**